

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय



आज धनत्रयोदशी

✦ अमरावती, शुक्रवार ६ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


स्वस्त झालं गोल्ड

मुंबई/प्रतिनिधी- सणासुदीचा हंगाम सुरू झाला असून, धनत्रयोदशी आणि दिवाळीच्या आधीच सोने-चांदीच्या किमतीत मोठी घसरण पाहायला मिळत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून दोन्ही मौल्यवान धातूंचे दर सातत्यानं कमी होत आहेत. जागतिक बाजारात सोन्याच्या किमतीत १.५ टक्के, तर चांदीच्या दरात तब्बल ३.५० टक्क्यांपर्यंत घसरण झाली. देशांतर्गत बाजारातही सोन्याचा दर मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर १.३८ लाख रुपये प्रति १० ग्रॅमच्या खाली आला. त्यामुळे सणासुदीच्या काळात खरेदी करणाऱ्या ग्राहकांचे लक्ष आता सोन्या-चांदीच्या ताज्या दरांकडे लागले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील कॉमेक्सवर सोन्याच्या किमतीत किंचित वाढ झाली, तर चांदीच्या दरात पुन्हा घसरण नोंदवण्यात आली. कॉमेक्सवर सोन्याचा भाव ०.२६ टक्क्यांनी वाढून ३,९५०.५० डॉलर प्रति औंसवर व्यवहार करत होता. याउलट चांदीच्या किमतीत ०.८० टक्क्यांची घसरण झाली. त्यामुळे चांदीचा दर ४९.३५५ डॉलर प्रति औंसवर आला. भारतीय बाजारातही सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. सोन्याचा भाव कमी होऊन प्रति १० ग्रॅम सुमारे १.३९ लाख रुपयांच्या आसपास व्यवहार करताना दिसला. चांदीच्या किमतीतही मोठी घसरण झाली असून, तिचा दर प्रति किलो सुमारे १.७८ लाख रुपयांवर आला आहे.

राहुल गांधी हे संविधानचोर

देशाची व्यवस्था उलथविण्याचे षडयंत्र : फडणवीस यांचा घणाघात

नागपूर/प्रतिनिधी- देशातील लोकशाही रक्षणाच्या नावाखाली काँग्रेस नेते राहुल गांधी हे प्रत्यक्षात संविधानाने निर्माण केलेली व्यवस्था उलथवून टाकण्याचे षडयंत्र रचत आहेत. त्यांना केवळ सत्तापरिवर्तन



करायचे नसून देशातील संवैधानिक संस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणून अती डावी व्यवस्था प्रस्थापित करायची आहे. मतचोरीचे आरोप करणारे राहुल गांधी हेच खरे संविधानचोर आहेत, असा घणाघाती आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. निवडणूक आयोगासह देशातील संवैधानिक संस्थांविरोधात विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांच्या निषेधार्थ गुरुवारी, ५ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने 'लोकतंत्र वाचवा, अराजकता हटवा' मोर्चा काढण्यात आला. यावेळी आयोजित सभेदरम्यान ते बोलत होते.सभेदरम्यान मंचावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर, आ. प्रवीण दटके, आ.परिणय फुके, भाजयुमोचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमांग जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. जोपर्यंत देशात संविधान आहे, तोपर्यंत ही लढाई संसदेतील चर्चेच्या माध्यमातूनच लढली जाईल. मात्र, वेळ आली तर रस्त्यावर उतरून लढण्याचीही आमची तयारी आहे. तुम्ही एक लाख लोक आणाल तर आम्ही एक कोटी लोक घेऊन येऊ, असा इशाराही त्यांनी दिला. देशात व्यवस्था परिवर्तनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरून प्रयत्न सुरू असून नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंकेतील सत्ताबदलाच्या प्रक्रियेशी संबंधित घटक राहुल गांधींना मदत करत आहेत. संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांना बदनाम करायचे, त्यांच्याविरोधात खोटे नरेटिव्ह तयार करायचे आणि त्यातून विद्यमान व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करायचा, अशी विरोधकांची रणनीती असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात यशवंत स्टेडियम येथून सुरू झालेला मोर्चा संविधान चौकापर्यंत काढण्यात आला.

बांगलादेशी घुसखोरांसाठी काँग्रेसमध्ये अस्वस्थता- लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या त्यांच्या आजीला जे करता आले नाही,



ते करण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत. मतदारयादीत समाविष्ट करण्यात आलेली बांगलादेशी घुसखोरांची चार कोटी नावे हटविली जातील, त्यामुळे विरोधकांमध्ये एसआयआरवरून अस्वस्थता निर्माण झाली आहे, असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

काँग्रेसकडून नक्षलवादाला प्रोत्साहन : गडकरी

काँग्रेसने आणीबाणी लावून नागरिकांचे मूलभूत अधिकार संपुष्टात आणले होते. त्याच काँग्रेसकडून आता देशात अराजकता निर्माण करण्याची भाषा केली जात आहे. संविधान बदलले जाणार असल्याचा अपप्रचार करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला जात आहे. संसद हे चर्चेसाठीचे व्यासपीठ आहे. परंतु संसद आणि संवैधानिक संस्थांविषयी विरोधकांना सन्मान राहिलेला नाही. काँग्रेसकडून तर बांगलादेशी घुसखोर आणि नक्षलवादाला प्रोत्साहन दिले जात असल्याचा आरोप गडकरी यांनी केला.

काँग्रेसला सकारात्मक राजकारण जमत नाही : बावनकुळे

२०२४ मध्ये ईव्हीएममध्ये बिघाड असल्याचा आरोप विरोधकांनी केला. मात्र, त्याच मशीनवर झालेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत ते जिंकले तेव्हा मशीन चांगली होती. विरोधकांकडून सातत्याने अशा प्रकारचे तथ्यहीन आरोप केले जात आहेत. काँग्रेसला सकारात्मक राजकारण करता येत नाही, अशी टीका बावनकुळे यांनी केली.

दूध उत्पादकांच्या मतांची चोरी

महाराष्ट्रातील गोकुळ सहकारी निवडणुकीत भाजपवर 'भेसळ' केल्याचा राहुल गांधींचा आरोप

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी भाजपवर महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील गोकुळ दूध सहकारी संस्थेच्या निवडणुकीतील जनादेश उलथवून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील समितीने भाजप-समर्थित महायुतीचा पराभव केल्यानंतर नियम बदलण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये, राहुल गांधी यांनी आरोप केला की भाजपने संचालक मंडळावर बहुमत मिळवण्यासाठी निवडणुकीनंतर नियम बदलले आणि याला 'दूध उत्पादकांच्या मतांची चोरी' म्हटले. 'गोकुळमध्ये दूध उत्पादकांनी भाजपला हरवले आहे. त्यामुळे भाजपने निवडणुकीनंतर नियम बदलले - ४ संचालक नेमले, १२ चे १६ केले आणि बहुमत चोरले. ही दूध उत्पादकांच्या मतांची चोरी आहे - जनादेशातील भेसळ आहे. भाजप इतका हताश झाला आहे की सत्ता वाचवण्यासाठी तो कुठेही कोणत्याही थराला जात आहे. जे दूध उत्पादकांची मते चोरतात, त्यांनी हे लक्षात ठेवावे - शेतकरी विसरत नाहीत,' असे राहुल गांधी म्हणाले.



काँग्रेस नेते पवन खेरा यांनीही प्रस्तावित बदलांवरून महाराष्ट्र सरकारवर टीका केली असून, दूध उत्पादकांचा जनादेश कमी करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. बुधवारी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये खेरा म्हणाले, 'महाराष्ट्र सरकार, कायद्यातील बदलांचा वापर करून निर्वाचित मंडळाच्या रचनेत फेरफार करून, गोकुळ मिल्क फेडरेशनमधील दूध उत्पादकांच्या लोकशाही जनादेशाला उघडपणे पायदळी तुडवण्याचा प्रयत्न करत आहे. १९ ऑक्टोबरच्या निवडणुकीत, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील समितीने २५ पैकी १३ जागा जिंकून, महायुतीच्या १२ जागांवर बहुमत मिळवले.

आई-वडिलांच्या डोळ्यादेखत बिबट्याने ५ वर्षाच्या मुलाला नेले उचलून

लाखांदूर/प्रतिनिधी- कापणी केलेले धान पीक गोळा करण्यासाठी आई-वडिलांसोबत शेतात गेलेल्या ५ वर्षांच्या बालकावर बिबट्याने हल्ला करून उचलून नेल्याची खळबळजनक घटना दोनाड (ता. लाखांदूर) गुरूवारी सायंकाळी घडली. चक्क आई-वडिलांसमोरच हा प्रकार घडल्याने संपूर्ण गाव हादरून गेले आहे. ही घटना गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी, सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली. मोक्ष सचिन बुरडे असे मृत बालकाचे नाव आहे. सचिन बुरडे यांची दोनाड येथील वैनगंगा नदी घाट परिसरात काही एकर शेती आहे. या शेतीत कुटुंबीयांनी धानाची पेरणी केली होती. काही दिवसांपूर्वी धान कापणी झाल्याने बुरडे यांचे कुटुंबीय कापलेले पीक गोळा करण्यासाठी शेतात गेले होते. आई-वडीलांसोबत ५ वर्षांचा मोक्षही गेला होता. आईवडील कामात व्यस्त असताना त्यांच्या जवळच मोक्षही उभा होता. या दरम्यान अचानकपणे आलेल्या बिबट्याने अचानकपणे झेप घेऊन त्याच्यावर हल्ला केला. मान जबड्यात पकडून सुमारे ३०० मीटर अंतरापर्यंत उचलून व फरफटत नेले.

अन् काळजाचा ठोका चुकला- जवळच उभ्या असलेल्या आपल्या मुलाला बिबट्याने उचलून नेल्याचे लक्षात घेताच आई-वडिलांसह शेतातील सर्वांच्याच काळजाचा ठोका चुकला. उपस्थितांनी आरडाओरडा केला. आवाज ऐकून बिबट्याने बालकाला शेताशिवारातच सोडले आणि घटनास्थळावरून पळ काढला. सर्वांनी धाव घेत बिबट्याचा पाठलाग केला, मात्र जबड्यात पकडून नेल्याने बालकाचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती होताच पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. सायंकाळी ७ वाजता शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

भारतीय हॉकी संघाची ऐतिहासिक कामगिरी

जपानला ४-१ ने नमवून एशियन चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरलं नाव


नवी दिल्ली/वृत्तसंस्था- भारताने जालंधर येथे खेळल्या गेलेल्या एशियन चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जपानचा ४-१ अशा दणदणीत फरकाने पराभव करत ऐतिहासिक विजय मिळवला. भारताचे हे सलग तिसरे आणि एकूण सहावे आशियाई विजेतेपद ठरले आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघ अजिंक्य राहिला असून, लीग फेरीतही त्यांनी जपानला याच फरकाने (४-१) मात दिली आहे. जालंधरमधील खचाखच भरलेल्या 'ओलंपियन बलबीर सिंह स्टेडियम'वर झालेल्या या अंतिम सामन्याची सुरुवात जपानने आक्रमक केली. सामन्याच्या तिसऱ्याच मिनिटला कजुमासा मात्सुमोतोने तोमाहॉक शॉटद्वारे गोल करत जपानला १-० ची आघाडी मिळवून दिली आणि भारताला सुरुवातीचा धक्का दिला. पहिल्या दोन क्वार्टरमध्ये जपानने भारतीय संघाला कडवी टक्कर दिली. २० व्या मिनिटात जपानला सलग



दोन पेनल्टी कॉर्नर मिळाले. परंतु, भारताच्या मजबूत डिफेन्सने जापानचा कर्णधार रायकी फुजिशिमा यांना गोल करू दिला नाही. दरम्यान, २०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळणारा उपकर्णधार हार्दिक सिंह मिडफील्डमध्ये आणि जरमनप्रीत सिंह जबरदस्त कामगिरी केली.मध्यंतराच्या ब्रेकनंतर भारतीय संघ पूर्णपणे नव्या रणनीतीसह मैदानात उतरला आणि सामन्याची सूत्रे आपल्या हातात घेतली.

रोनाल्डोची आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- क्रिस्तियानो रोनाल्डोने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतली आहे. ४१ वर्षीय रोनाल्डोने गुरुवारी सोशल मीडिया पोस्टद्वारे आपल्या निर्णयाची माहिती दिली. नोव्हेंबरच्या आंतरराष्ट्रीय ब्रेकनंतर तो पोर्तुगालची क्रमांक-७ची जर्सी संघाकडे परत करेल, असे त्याने सांगितले. रोनाल्डोचा प्रवास २० ऑगस्ट २००३ रोजी कझाकस्तानविरुद्ध सुरू झाला होता. त्यावेळी तो केवळ १८ वर्षांचा होता. त्यानंतरच्या २३ वर्षांत त्याने पोर्तुगालसाठी २३४ सामने खेळले आणि सर्वाधिक १४६ गोल केले. त्याच्या नावावर ४६ असिस्टही आहेत. असिस्ट म्हणजे गोल करणाऱ्या खेळाडूला शेवटचा पास देणे.रोनाल्डो व्हिडिओमध्ये म्हणाले, राष्ट्रीय संघासोबतचा माझा मैदानातील प्रवास आता संपत आला आहे. मी अभिमानाने निरोप घेत आहे. मी पोर्तुगालसाठी सर्वस्व दिले. ते पुढे म्हणाले की, मागे वळून पाहताना त्याला केवळ सामने, गोल, विक्रम आणि ट्रॉफीच नव्हे, तर ज्या लोकांनी हा प्रवास खास बनवला, ते लोकही आठवतात. रोनाल्डोने २००६ मध्ये जर्मनीत आपला पहिला विश्वचषक खेळला होता. त्यानंतर तो २०१०, २०१४, २०१८, २०२२ आणि २०२६च्या स्पर्धांमध्येही पोर्तुगालच्या संघाचा भाग राहिला. अशा प्रकारे त्याने सलग ६ विश्वचषक खेळले. सहा वेगवेगळ्या विश्वचषकांमध्ये गोल करणारा तो जगातील पहिला खेळाडूही ठरला.



अन्यथा आरोपीची तात्काळ सुटका होणार'; पोलिसांचे कान टोचत सुप्रीम कोर्टाचे महत्वाचे निर्देश

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- संशयित आरोपींच्या अटकेबाबत सुप्रीम कोर्टानं आज महत्वाचा आदेश दिला आहे. त्यामुळं पोलिसांवरील जबाबदारी वाढली असून यासंदर्भात कोर्टाच्या नियमांचं पालन करण्यासाठीचा कालावधी नेमका कधी सुरु होतो, हे स्पष्ट केलं आहे. त्यानुसार, जर संशयित आरोपीला चोवीस तासांच्या आत कोर्टात हजर केलं नाही तर त्याची सुटका करावी लागेल, असे निर्देशच सुप्रीम कोर्टानं दिले आहेत.

नेमका विषय काय?- सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश न्या. उज्ज्वल भुईया आणि न्या. अतुल एस. चांदोरकर यांच्या खंडपीठासमोर चार जणांच्यावतीनं दाखल याचिकेवर सुनावणी पार पडली. यामध्ये मणिपूर हायकोर्टाच्या निर्णयाला आव्हान देण्यात आलं आहे. हायकोर्टानं एनडीपीएस कायद्यांतर्गत त्यांना जामीन देण्यास नकार दिला होता.



२४ तासांची वेळ कधीपासून सुरु होते?

यावर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टानं गुरुवारी म्हटलं की, जर एखाद्या संशयित आरोपीला २४ तासांहून अधिक काळ अटकेत ठेवल्यानंतर त्याला कोर्टात न्यायाधिशांसमोर हजर न केल्यास त्याला सोडून द्यावं लागेल. कारण २४ तासांचा हा कालावधी अटक केल्याच्या क्षणापासून सुरु होतो. यासाठी औपचारिकरित्या अटकेची गरज नाही.

त्रिपुरा उच्च न्यायालयाने आरोपींची याचिका फेटाळली -हे प्रकरण त्रिपुरामध्ये ११.०३ किलो 'याबा' गोळ्या जप्त करण्याशी संबंधित होते. २९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता शोध आणि जप्ती मोहिमेदरम्यान चार जणांना ताब्यात घेण्यात आले होते, परंतु पोलिसांनी दुसऱ्या दिवशी, ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या अटकेची औपचारिक नोंद केली. याचा अर्थ, त्यांना ताब्यात घेतल्यापासून अटकेपर्यंत सुमारे २१ तासांचे अंतर होते. आरोपींनी असा युक्तिवाद केला की, त्यांना ताब्यात घेतल्याच्या २४ तासांच्या आत न्यायाधीशांसमोर हजर करायला हवे होते. हे प्रकरण त्रिपुरा उच्च न्यायालयात पोहोचले, ज्याने त्यांचे जामीन अर्ज फेटाळले. त्यानंतर, आरोपींनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

जागतिक स्तरावर पडसाद

न्यूयॉर्क : जगभरात आर्थिक आणि राजकीय गोंधळ उडवून देणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का बसला आहे. अमेरिकेत झालेल्या मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांचा पराभव झाला. सत्ताधारी रिपब्लिकन पक्ष अल्पमतात गेला असून यामुळे पुढील दोन वर्षे ट्रम्प यांना वर्चस्व गाजवू शकणार नाहीत. ट्रम्प यांच्या या पराभावचे पडसाद आता जागतिक स्थरावर दिसू लागले आहेत.भारतीय शेअर बाजारात तेजी पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १४०० अंकांनी, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक ४०० अंकांनी वधारला आहे. याशिवास सर्वात महत्त्वाचे म्हणजे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. अमेरिकेतील घडामोडींनंतर ब्रेंट क्रूडचे दर थेट १०० डॉलरच्या खाली घसरले आहेत. हे भाव ८ टक्क्यांहून अधिक घसरून ९४.९१ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहेत.



'गोकुळ' चा परिणाम; हसन मुश्रीफ यांच्या विरोधातील 'ईडी'ची फाईल कायमची बंद

मुंबई/प्रतिनिधी- एकीकडे गोकुळ दूध संघातील अध्यक्ष निवडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री हसन मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांसाठी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय समोर आला आहे. मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सादर केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारत, मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांविरोधातील २०२२ चा मनी लॉंड्रिंगची केस अधिकृतपणे बंद केली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील मूळ गुन्हे आधीच रद्दबातल ठरवल्यामुळे मनी लॉंड्रिंग कायद्यांतर्गत ही कारवाई पुढे चालवणे शक्य नसल्याचे न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विशेष पीएमएलए न्यायाधीश



एस. व्ही. सहारे यांनी या प्रकरणावर निर्णय देताना स्पष्ट केले की मनी लॉंड्रिंग कायद्यांतर्गत कारवाई करण्यासाठी मूळ गुन्हा असणे हीं मुख्य अट असते. जेव्हा मूळ गुन्हाच उच्च न्यायालयाकडून रद्द केला गेला आहे, तेव्हा पीएमएलएअंतर्गत कारवाई अस्तित्वात राहू शकत नाही.

या निर्णयाच्या आधारे विशेष न्यायालयाने ४ एप्रिल २०२२ रोजी दाखल केलेला अंमलबजावणी प्रकरण माहिती अहवाल रद्द केला असून प्रकरणाची सर्व कागदपत्रे ईडी अधिका-यांकडे परत करण्याचे निर्देश दिले आहेत. कंपनी नोंदणी कार्यालयाने मार्च २०२२ मध्ये दाखल केलेली तक्रार आणि कोल्हापूरच्या मुरगूड पोलिस ठाण्यात फेब्रुवारी २०२३ मध्ये दाखल झालेला एफआयआर या मूळ गुन्ह्यांच्या आधारे ईडीने हसन मुश्रीफ, त्यांची मुले आणि सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखाना प्रकरणात तपास सुरू केला होता. २०१३-२०१४ या काळात साखर कारखान्याने कोलकात्यातील शेल कंपन्यांमार्फत ११.३५ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मिळवून पैशांची हेराफेरी केल्याचा आरोप ईडीने केला होता. या तपासादरम्यान ईडीने जुलै २०२४ मध्ये २.०७ कोटी रुपयांच्या मुदत ठेवी आणि ७.७० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त केली होती.



दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करा

प्रहार संघटनेचा आंदोलनाचा इशारा

अमरावती/प्रतिनिधीः- दुष्काळी परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील शेतकरी सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. अशातच शासनाच्या धोरणात्मक अडचणीमुळे शेतकऱ्यांना हक्काच्या योजनांपासून वंचित राहावे लागत असून, शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नांवर केवळ आश्वासने नकोत तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. दिवाळी समोर शेतकऱ्यांवर नवीन संकट कोसळले आहे. यामुळे त्यांच्या प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या मागणीसाठी प्रहार संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी मंगेश देशमुख,प्रदिप बंड, आश्विन जळाऊ,माधव धोंडे,संजय देशमुख,मंगेश पाटील,अमोल ठाकूर,परिमल कपिले, चंद्रशेखर तायडे उपस्थित होते.



निवेदनानुसार,अनेक शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर ऑनलाइन पीकपेरा नोंदवलेला नसल्याने पीक विमा आणि फळपीक विम्यापासून शेतकरी वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे तातडीने विशेष मोहीम राबवून पीक पेरा नोंदी पूर्ण करा, रासायनिक खतांच्या खरेदी साठी लादलेली ऑनलाइन सक्ती आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून शेतकऱ्यांना गरजे नुसार वेळेत खत उपलब्ध करून द्यावे,शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात अनेक बँका शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज देण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना विनाविलंब नवीन पीककर्ज मिळवून देण्याची गरज आहे. याशिवाय, दुष्काळसदृश परिस्थितीमुळे कपाशीच्या उत्पादनात मोठी घट झाली असून, व्यापाऱ्यांकडून दर दबावात ठेवले जात आहेत. त्यामुळे शासनाने कपाशीला उत्पादन खर्चावर आधारित रास्त व वाढीव भाव जाहीर करावा आणि शासकीय केंद्रांवरून योग्य दराने खरेदी करावी, जाहीर झालेली हेक्टरी ५,००० रुपयांची मदत अत्यंत अपुरी असून, शासनाने यात वाढ करून किमान हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान सरसकट थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे. तसेच, कामगार कल्याण मंडळाच्या योजना, नोंदणी नूतनीकरण आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत.वरील सर्व मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रहार संघटनेने दिला आहे.

राष्ट्रसंतांच्या मौन श्रद्धांजलीतील वक्तव्यावरून गुरुकुंजात संघर्षाची ठिणगी!

-युवकांना 'अराजकतावादी' ठरवल्याने संताप

गुरूकुंज मोझरी/प्रतिनिधीः- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने गुरुकुंज मोझरी येथे आयोजित 'मौन श्रद्धांजली' कार्यक्रमातील एका भाषणावरून नवा वाद निर्माण झाला आहे.



या कार्यक्रमादरम्यान देशातील तरुण पिढीच्या आंदोलनांना 'अराजकता निर्माण करणारी' प्रक्रिया संबोधल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यावर विविध स्तरातून तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. राष्ट्रसंतांना सामूहिक मौन श्रद्धांजली अर्पण करण्यापूर्वी झालेल्या भाषणात तरुणांची आंदोलने हिंसक स्वरूपाची असून, काही घटकांकडून त्यांची दिशाभूल करून देशात अशांतता पसरवली जात असल्याचे वक्तव्य करण्यात आले. या विधानांतर अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळासारख्या मानवतावादी आणि स्वतंत्र संस्थांची भूमिका एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या प्रभावाखाली चालल्याची चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आयुष्यभर सर्वधर्मसमभाव, मानवता आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. मात्र, याच विचारांचा वारसा सांगणाऱ्या गुरुकुंज मोझरीतील ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवात आता वैचारिक संघर्षाची ठिणगी पडली आहे. ३० ऑक्टोबर रोजी झालेल्या 'मौन श्रद्धांजली' कार्यक्रमात देशभरातील युवकांच्या आंदोलनांना 'अराजकतावादी' संबोधण्यात आल्याचा आरोप करत मोझरीतील युवकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या वक्तव्याचा निषेध म्हणून शुक्रवारी ६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रसंतांच्या समाधीस्थळी आत्मक्लेश आंदोलन करण्याचा निर्णय युवकांच्या बैठकीत घेण्यात आला आहे. राष्ट्रसंतांच्या सर्वधर्मसमभावाच्या विचारांची पायमल्ली करून सेवा मंडळाला जनते पासून परावृत्त करण्याचा डाव रचण्यात आला आहे. सेवा मंडळाला हिंदुत्ववादी संघटनेच्या दावणीला बांधायला सेवा मंडळ निघाले आहे आणि मुळात आज सेवा मंडळ फक्त नावाला आहे, अशी टीका होत आहे. मौन श्रद्धांजली कार्यक्रमातील वादग्रस्त वक्तव्याबद्दल अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाने लेखी स्वरूपात तसेच जाहीर माफी मागावी. प्रार्थना मंदिर आणि पुण्यतिथी महोत्सवाच्या मंचावर दरवर्षीप्रमाणे सर्वधर्मांची प्रतीके लावली जावीत.प्रत्येक धर्माची प्रार्थना संबंधित धर्मगुरूंकडून त्यांच्या धर्मपरंपरेनुसारच करून घेण्यात यावी, या तीन मागण्यासाठी आंदोलन केले जाणार आहे.

वंदनीय राष्ट्रसंतांनी मानवतेचा संदेश दिला मात्र आश्रमातील व्यवस्थापकांकडून त्यांच्याच विचारांना मूठमाती देण्याचा प्रयत्न सुरू आहे. देशातील युवकांच्या आंदोलनाला अराजक संबोधणे म्हणजे राष्ट्रसंतांसह तरुणांचा अपमान आहे. अशी स्क्रिप्ट लिहिणाऱ्यांचे नाव पुढे आणून संबंधितांनी जाहीर माफी मागावी.

-प्रशांत कांबळे (सामाजिक कार्यकर्ते)

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवादरम्यान मौन श्रद्धांजली पूर्वी वाचण्यात आलेल्या स्क्रिप्टमध्ये देशात सुरू असलेल्या युवकांच्या आंदोलनाला अराजकता म्हणणे म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांशी द्रोह करणे होय. आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारणे वंदनीय राष्ट्रसंताना सुध्दा अपेक्षित होते. परंतु भाजपा व आरएसएस चा अजेंडा समोर ठेवून जर अशी मांडणी होत असेल तर हा वंदनीय राष्ट्रसंतांचा समातावादी धर्मनिरपेक्ष राष्ट्रहिताचा विचार नाही.

-सागर भवते, जिल्हा महासचिव, वंचित. अमरावती

१ व १० वरिल उर्वरित

मुथूट फिनकॉर्प घोटाळयात चार

वेगवेगळ्या प्रकरणांचे तपशील आहेत, तर शाखेतील एकूण आर्थिक अनियमिततांचे आकलन होणे बाकी आहे.

माहितीनुसार विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्प शाखेतील ग्राहकांच्या सोन्या-चांदी आणि रोख रकमेच्या कथित हेराफेरीचे प्रकरण एका महिला ग्राहकाच्या तक्रारी नंतर उघडकीस आले. तिने गहाण ठेवलेल्या सोन्याबद्दल आणि जमा रकमेबद्दल अनियमिततेची तक्रार केली होती. यानंतर हळूहळू इतर ग्राहकांनीही तक्रारी दाखल केल्या आणि पोलिसांकडे तक्रारींचा ओघ सुरू झाला.

पोलिसांनी ग्राहकांच्या तक्रारींच्या आधारावर वेगवेगळे गुन्हे दाखल केले. याच प्रकारे प्रकरणात आता पर्यंत एकूण दहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, तक्रारकर्त्यांची संख्या आणि त्यांचे वैयक्तिक नुकसान याबद्दलचे तपशील समोर येऊनही सर्व प्रकरणांमध्ये एकूण किती सोने प्रभावित झाले आणि त्याची बाजारातील किंमत किती आहे, याचा एकत्रित हिशोब अद्याप स्पष्ट झालेला नाही.

जिल्ह्यात अतिवृष्टी बाधित

कायमस्वरूपी जमिनीच्या नुकसानीसाठी ३ लाख ५० हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील २५०६ बाधित शेतकऱ्यांच्या ७६१.२१ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीसाठी १ कोटी ४२ लाख १९ हजारांचा निधी मंजूर झाला आहे.

शासन निर्देशानुसार, मंजूर मदतीची रक्कम डिबीटी प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. ही मदत केवळ अल्प व अत्यंत अल्प भूधारक शेतकऱ्यांना कमाल २ हेक्टरच्या मर्यादेत दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मिळालेला हा मदतीचा निधी बँकांनी कोणत्याही कर्ज खात्यात अथवा इतर वसुलीसाठी वळती करू नये, असे सक्त आदेश निवासी उपजिल्हाधिकारी संतोष कोकडे यांनी संबंधित तहसीलदारांना दिले आहेत. मदत वाटपाची प्रक्रिया पूर्ण होताच लाभार्थ्यांची यादी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे आदेशात म्हटले आहे.

अमरावतीत मुख्य बाजारपेठेत

रस्त्यांच्या दुतर्फा दुकानांचे सामान आणि हातगाड्यांमुळे रस्ते अत्यंत अरुंद झाले आहेत. दुचाकी आणि चारचाकी वाहने कुठेही अस्ताव्यस्त पार्क केली जात असल्याने इतर वाहनांना जाण्यासाठी जागा उरत नाही. गर्दीच्या वेळी ऑटो-रिक्षा आणि मालवाहू वाहनांची अचानक झालेली भाऊ गर्दी वाहतुकीचा खोळंबा करत आहे.

प्रशासनाने तातडीने रस्ते मोकळे करावेत आणि अनधिकृत पार्किंग तसेच अतिक्रमणावर कठोर कारवाई करून वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

वरुडा एक्सप्रेस हायवेवर भीषण

विरेश रामदास तिबडे (वय ५१) आपले मित्र योगेश गुर्जर यांच्यासोबत दुचाकी वाहनाने एक्सप्रेस हायवे मार्गावरून वरुडा गावाकडे जात होते. याच दरम्यान पुलाजवळ अमरावती एमआयडीसीकडून येणाऱ्या मार्गावर त्यांना दुचाकी वाहन आणि म्हशीचा अपघात झाल्याचा आवाज ऐकू आला.दोघांनी आपले वाहन थांबवून घटनास्थळाकडे पाहिले, तेव्हा युनिकॉर्न मोटारसायकल क्रमांक एमएच-२७ / डीबी-९३९० अपघातग्रस्त अवस्थेत पडलेली होती. वाहनाजवळ दोन युवक आढळले, त्यापैकी एक युवक मृत अवस्थेत होता, तर दुसरा गंभीररित्या जखमी होता. बाजूला एक म्हैसही मृत अवस्थेत पडली होती.

घटनेचे गांभीर्य पाहून विरेश तिबडे यांनी तात्काळ ॲम्ब्युलन्सला फोन करून माहिती दिली. जखमी युवक शुद्धीवर असल्याने त्याने सांगितले की मोटारसायकल तो चालवत होता आणि त्याचा मित्र मागे बसला होता. जखमीची ओळख गौरव देवराव विरुळकर, रा. लोणी टाकळी अशी झाली. त्याने आपल्या मागे बसलेल्या मित्राचे योगेश (वय ३२) असे सांगितले. यानंतर विरेश तिबडे यांनी आपले मित्र अंकुश ढोके, रा. लोणी टाकळी यांनाही फोन करून अपघाताची माहिती दिली.

दोन्ही जखमींना तात्काळ अमरावती येथील इर्विन रुग्णालयात नेण्यात आले. यावेळी विरेश तिबडे, अंकुश ढोके आणि त्यांच्यासोबत आलेल्या इतर मित्रांनीही मदत केली. रुग्णालयात जखमी मोटारसायकल चालक गौरव विरुळकर याच्यावर उपचार सुरू करण्यात आले, तर वैद्यकीय तपासणीनंतर योगेश भारत बालूनेला मृत घोषित केले.

तिर्थक्षेत्र विकास आरखडयातील

महाराज अध्यात्मिक संकुल, ग्राम विकास प्रबोधिनीसाठी,भक्त निवास, अति महत्वाच्या व्यक्तींकरिता विश्रामगृहाच्या १२ इमारतींची दुरुस्ती आणि या सर्व इमारतींना कायमस्वरुपी पाणी पुरवठयाची सोय करण्यासाठी एकूण १६ कोटी ५५ लाखाच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे.

श्री.क्षेत्र कौंडण्यपूर तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत प्रसाधनगृह इमारत,पर्यटक विसावा इमारत, उपहारगृह इमारत, विश्रामगृह इमारत आणि पोहोच मार्गासाठी एकूण १ कोटी ८४ लाख २० हजार रुपयांच्या दुरुस्तीकामांना मंजुरी देण्यात आली आहे.

संत गाडगेबाबा वलगाव तिर्थक्षेत्र विकास आराखडयात अस्तीत्वातील इमारतींमध्ये सुविधा देण्यासाठी मुख्यत्वे आतील व बाहेरील रंगरंगोटी,परिसराची साफसफाई,आवश्यक फ्लोरींग तसेच इतर दुरस्ती, रेन वॉटर हार्वेस्टींग,पाणी पुरवठा,विद्युतीकरण अशा कामांसाठी १ कोटी ८० लाख ६५ हजारांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

सावंगा विठोबात माकडांचा हैदोस

पाठवून अन्नदान कार्यक्रमातील उरलेले अन्न, वेस्टेज भाजीपाला, पत्रावळीवरील अन्नपदार्थ उघड्यावर न टाकता त्यांची योग्य विल्हेवाट लावण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांनाही मंदिर व गाव परिसरात अन्नपदार्थ उघड्यावर न टाकण्याबाबत सूचना देण्यास सांगितले आहे.

एकीकडे तीर्थक्षेत्रात भाविकांची सुरक्षितता धोक्यात आली असताना दुसरीकडे माकडांचा उपद्रव रोखण्याबाबत ठोस कार्यवाही न करता संस्थानलाच सूचना देणारे पत्र पाठविण्यात आल्याने वन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता तरी वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालून सावंगा विठोबा येथील माकडांच्या उपद्रवावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थ व भाविकांकडून व्यक्त होत आहे.

दिवाळीच्या पणत्यांसोबत वंचितांच्या

बांधवांसोबत दिवाळीचा आनंद अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

सन २०१५ पासून सुरू असलेल्या या उपक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता परतवाडा येथील विसावा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या भेटीने झाली, कार्यक्रमाच्या प्रारंभी VIDA संस्थेचे अध्यक्ष प्रितेश वाघमारे यांनी उपस्थितांना विसावा वृद्धाश्रमाच्या कार्याची तसेच VIDA संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. 'समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे आणि माणुसकीची नाती अधिक दृढ करणे, हाच 'शेअर अँड स्माईल' उपक्रमाचा खरा हेतू आहे. याच सामाजिक बांधिलकीतून संस्था गेल्या बारा वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवित आहे,' असे त्यांनी सांगितले. त्यानंतर संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांनी आजी-आजोबांसोबत अंताक्षरी खेळून आनंदाचे क्षण घालविले. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या भोजनाची व्यवस्था व्हावी, यासाठी पुढील दोन ते तीन महिने पुरेल इतके किराणा साहित्य वितरित करण्यात आले.

यामध्ये १०० किलो तांदूळ, २०० किलो गहू, ४० किलो साखर, तूरडाळ, मुंगडाळ, शेंगदाणे, पोहे, रवा, तेल, मीठ, तिखट, हळद, मसाले, बिस्किटांची २०० पाकिटे आणि फळे अश्या एकूण २० प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता तसेच प्रत्येक आजी-आजोबांना साबण, तेल, शाम्पू, पावडर, बॉडी लोशन, टूथपेस्ट, उटणे आणि बाम अशा दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंची वैयक्तिक किट भेट देण्यात आली, यानंतर सर्वांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली. संस्थेचे महासचिव शेख नुरुद्दीन यांनी मनोगत व्यक्त करताना, VIDA संस्था यापुढेही विसावा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठी विविध आनंददायी व मनोरंजनात्मक उपक्रम राबवून त्यांच्या सहवासात वेळ घालविण्याचा आणि त्यांना आनंदाचे क्षण देण्याचा सातत्याने प्रयत्न करेल, अशी ग्वाही दिली तर विसावा वृद्धाश्रमाचे संचालक तथा संस्थापक सचिव भास्करराव कौतिक्कर यांनी VIDA संस्थेला वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सेवाकार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे विशेष आभार व्यक्त केले तसेच या उपक्रमासाठी आर्थिक व वस्तूरूपाने सहकार्य करणारे सर्व दानशूर देणगीदार, उपस्थित पदाधिकारी व सदस्य आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या सहकार्य करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे VIDA चे जेष्ठ सदस्या जया वाघमारे यांनी आभार मानले.

दुपारी ०१.३० वाजताच्या सुमारास 'विडा' संस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांनी लाखनवाडी येथे रस्त्यालगत व तात्पुरत्या झोपड्यांमध्ये वास्तव्यास असलेल्या गरजू कुटुंबांना नवीन साड्या व पारंपरिक दिवाळी फराळाचे वाटप केले. पुढे परतवाडा-अमरावती मार्गावरील निराश्रित, भटकंती करणाऱ्या वृद्ध व्यक्ती, महिला, लहान मुले आणि दिव्यांग बांधवांच्या आश्रयस्थानी जाऊन महिलांना नवीन साड्या, पुरुषांना पॅन्ट-शर्ट आणि दिवाळी फराळाचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमासाठी गिरीश राठी, ॲड. गजानन पाटील, अमर कणसे, पौर्णिमा गवई, नंदिनी शापामोहन, संजय गिरी, रविंद्र उंबरकर, जितेंद्र पुराते, अनिकेत कथळकर, प्रविण विलायतकर, प्रफुल्ल बारसे, गौरव इंगोले, शुभम कलांद्रे, मनोज कुलमेढे, श्रीकांत बोरकर, शरद कोल्हे, विवेक शेरेकर, आदित्य पापडीकर, अशोक फाले, नंदकुमार कणसे यांच्यासह अनेक दानशूर व्यक्तींचे आर्थिक व वस्तूरूपाने सहकार्य लाभले तर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष प्रितेशकुमार वाघमारे, महासचिव शेख नुरुद्दीन, कोषाध्यक्षा ॲड. अंकिता पाथरे-वाघमारे, सचिन शेरेकर, अमर कणसे, अंकित जवंजाळ, आमिर नईम, भूषण दहिकर, देवेश राव, प्राची वाघमारे, जया वाघमारे, सुचिता शेरेकर, अक्षदा शेरेकर, हसरी शेरेकर, आशिष सातपुते, रुग्णसेवक सागर दामेकर, ॲड. यश टेंबळे, ॲड. श्रेयस दौथपुरे, अविनाश वानखडे, सचिन बनसोड, अर्शद मलिक आणि रुग्णसेवक अभी बेले यांनी परिश्रम घेतले. दिवाळीच्या पणत्यांसोबतच गरजूंच्या चेहऱ्यावरही हास्य फुलावे, हाच 'शेअर अँड स्माईल'चा खरा उद्देश असून, माणुसकीचा हाच दीपोत्सव VIDA संस्थेने सलग बाराव्या वर्षी साजरा केला.

अवैध दारू वाहतूक आणि गुटखा

प्रकरणात एका संशयित आरोपीचा सहभाग समोर आला असून तो फरार आहे.

४ नोव्हेंबर रोजी पथकाने परतवाडा, मोर्शी आणि गौरखेडा परिसरात वेगवेगळ्या कारवाया केल्या. परतवाडा येथील कालीमाता नगरात राहणारा शेख अजहर शेख कादर याच्या घरी प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पथकाने पंचांसह त्याच्या घरी छापा टाकला. यावेळी घरात विमल पानमसाल्याची पाकिटे, व्ही-१ तंबाखू आणि पान पराग प्रीमियम असा एकूण १४ हजार ६८८ रुपयांचा प्रतिबंधित साठा आढळून आला. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला. कारवाईदरम्यान शेख अजहर घरी नसून तो करजगावला गेल्याची माहिती त्याच्या वडिलांनी दिली.

दुसऱ्या कारवाईत मोर्शी शहरातील गधेघाटपुरा, वॉर्ड क्रमांक ११ येथे राहणाऱ्या फिरोज खान राजदार खान (वय ४६) याच्या घराची झडती घेण्यात आली. यावेळी पानमसाल्याचे ५० नग, तंबाखूचे १५० नग आणि एन-०५ प्रीमियम तंबाखूची ६० पाकिटे असा एकूण २० हजार ५०० रुपयांचा प्रतिबंधित साठा पोलिसांच्या हाती लागला. हा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, मोर्शी-सिंभोरा मार्गावरील नरीमन पॉईंटजवळून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. यावेळी अवधूत समरत कठाणे (वय ५६, रा. गौरखेडा) हा मोपेडवरून येताना दिसला. त्याच्या वाहनाच्या पायदानाजवळ दोन प्लास्टिक पोत्यांमध्ये देशी दारूच्या ६०० बाटल्या आढळून आल्या. दारूची किंमत ३० हजार रुपये, तर मोपेडची किंमत ६० हजार रुपये, असा एकूण ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत हा दारूसाठा मुकेश श्रीवास या फरार आरोपीकडून आणल्याचे अवधूत कठाणे याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात सहायक पोलीस निरीक्षक संतोष गुर्जर, उपनिरीक्षक आकाश शिवणकर यांच्यासह पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, भूषण पेठे, मंगेश लकडे, गणेश आगोले, निलेश डांगोरे, रूपेश गावंडे, शांताराम सोनोने, विवेक घोरमाडे, चालक नईम शाह आणि प्रणव चिमोटे यांचा सहभाग होता.

पत्नी माहेरी गेल्यानंतर पतीची

मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच चांदूर बाजार पोलिसांनी घटनास्थळी व रुग्णालयात आवश्यक कार्यवाही केली. ठाणेदार आधारसिंह सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस कर्मचारी महेंद्र मारोडकर आणि आकाश व्यवहारे करीत आहेत.

सोन्याची चेन गहाण ठेवण्याच्या

त्यानंतर साईनगर चौकातील एमआरएफ टायर, बडनेरा रोड येथील दुकानात घेऊन जाऊन महिलेला आई म्हणून संबोधित केले. महिलेकडून गळ्यात घातलेली सोन्याची चेन मागितली. मग गहाण ठेवून पैसे आणून देतो, असे सांगून आरोपी चेन घेऊन फरार झाला. बराच वेळ आरोपी परत न आल्याने महिलेला फसवणूक झाल्याची जाणीव झाली आणि तिने राजापेठ पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांनी तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. शहरात अशाच पद्धतीने महिलांना लक्ष्य करणारी टोळी सक्रिय असल्याची चर्चा असल्याने पोलिसांनी नागरिकांना, विशेषतः वृद्ध महिलांना अशा अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

जाहीरनामा

श्रीमती रोहिणी वि.मनोरे, दिवाणी न्यायाधिश (क.स्तर.) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र.२११/२०२६ — ने.ता.३०.११.२०२६

अर्जदार :- 1. **Kishor @Doma s/o. Govinda Meshram,** Aged about 77 yrs., Occu.- Nil, R/o. 1, Ambedkar Ward, Near Samaj Mandir, Gautam Buddh Ward, Bhandara, Tq. & Dist. Bhandara
2. **Kishanrao s/o. Govindrao Meshram,** Aged about 74 yrs., Occu.- Nil, R/o. 1, Vidarbha Housing Board Colony, Takiya Ward, Bhandara, Tq. & Dist. Bhandara- 441904
3. **Ramabai w/o. Ashok Deshbhratar,** Aged about 51 yrs., Occu.- Housewife, R/o. Badnera Road, Behind Rajapeth Police Station, Tarasaheb Bagicha VTC Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 606

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **Nil**

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, किशोर उर्फ डोमा गोविंदा मेश्राम व इतर यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता **APPLICATION U/S 2 OF THE BOMBAY REGULATION VIII OF 1827** अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **गोविंदराव सुखाजी (सुब्बाजी) मेश्राम** यांचा **मृत्यू दिनांक ११/०१/१९९९** रोजी सरकारी दवाखाना, औरंगाबाद येथे झालेला आहे. **गौराबाई गोविंदराव मेश्राम** यांचा **मृत्यू दि.२३/०५/१९९४** रोजी जनरल हॉस्पिटल,भंडारा येथे झालेला आहे. अर्जदार यांचे शिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रमाणे सदहू **गोविंदराव सुखाजी (सुब्बाजी) मेश्राम व गौराबाई गोविंदराव मेश्राम** मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **०५ माहे नोव्हेंबर २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, तिवसा
शिक्का

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७०/२०२६ — ने.ता.२५/११/२०२६

अर्जदार- **रोशन शुभम ठाकरे, (लग्नानंतरचे नांव)**
रोशनी प्रमादे सावदे (लग्नापूर्वीचे नांव)
वय ३२ वर्ष, व्यवसाय - गृहिणी
रा.यादव लेआउट अकोली रोड जवळ, साई नगर, अमरावती
ता.जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- **सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कणी मिर्झापूर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

ज्याअर्थी अर्जदार नामे **रोशनी शुभम ठाकरे** यांचा **जन्म दिनांक २२/११/१९९४** रोजी कणी मिर्झापुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नामे **रोशनी शुभम ठाकरे** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कणी मिर्झापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जादाराने त्याच्या जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक ०५/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २५/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर
शिक्का

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **37/2026 कलम ५० अ (१)** — **पु.ता.११.१०.२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नांव व **श्री दांडेश्वर संस्थान, रहाटगांव, ता.जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक **अे-१५३३**
बाबत अर्जदार - **श्री विनोद वासुदेवराव ठेलकर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० अ (१) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - परिशिष्ट १ प्रमाणे
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- परिशिष्ट १ प्रमाणे

सदर प्रकरण महा.सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५० अ (१) अन्वये न्यायिक बोर्डावर प्रलंबित आहे.

प्रस्तावित योजनेप्रमाणे प्रथम विश्वस्त मंडळ -
०१. श्री विनोद वासुदेवराव ठेलकर — ०२. श्री रुपराव गोविंदराव चर्जन
०३. श्री प्रमोद भिमरावजी मडघे — ०४. श्री सचिन अरविंदराव चर्जन
०५. श्री राजेंद्र सुर्यभानजी अरसडे — ०६. श्री प्रविण वसंतराव चर्जन
०७. श्री संदीप उत्तमराव पांडव — ०८. श्री रविकांत दत्तुजी चर्जन
०९. श्री प्रदीप वसंतराव चर्जन — १०. श्री दामोधर वामनराव गोंगे
११. श्री.सुशांत सुरेशराव चर्जन — १२. श्री धिरज लक्ष्मणराव मोंढे
१३. श्री कमलाकर नारायणराव चर्जन
गैरअर्जदार- कोणी नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०३.११.२०२६ रोजी दिली.

सही/-
अधीक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती
शिक्का

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.४१२/२०२६ — **ने.ता.०५.११.२०२६**

अर्जदार : १. **ज्ञानेश्वर तुळशिरामजी नान्हे (मृतक) तर्फे वारस**
१अ) गं.भा.सविता ज्ञानेश्वर नान्हे, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.गुलजार पेठ, शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
१ब) सौ.निलीमा दिनेश केवदे, वय ३८ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.चांदूर ढोरे, ता.तिवसा, जि.अमरावती
१क) सौ.प्राजक्ता गोकुल कुरवाळे, वय ३३ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.उतखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती
१ड) आशिष ज्ञानेश्वर नान्हे, वय ३० वर्षे, व्यवसाय - मजुरी
१इ) कु.प्रगती ज्ञानेश्वर नान्हे, वय २७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. **अरुण तुळशिराम नान्हे,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजुरी अर्जदार क्र.१ अ), ड) इ) व २ रा.हिरुरपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **सौ.राजकन्या भिमराव अमझरे,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.सुलतानपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **सौ.सुनंदा पंजाबराव अमझरे,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.टाकरखेडा, आसेगाव पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
५. **सौ.वंदना मोहनराव अमझरे,** वय ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक बयनाबाई तुळशीरामजी नान्हे** यांचा **मृत्यू दि.०६/०९/२०२१** रोजी तसेच **मृतक ज्ञानेश्वर तुळशीरामजी नान्हे** यांचा **मृत्यू दि.११/११/२००४** रोजी रा.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४१२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२९.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार
शिक्का

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जलसंधारण कामांसाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घ्यावा- जिल्हाधिकारी

जलसाठ्यांची क्षमता वाढविण्याचा निर्धार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यासोबतच स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उत्तरदायित्व निधीअंतर्गत कार्यरत कंपन्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आज येथे केले.काटेपूर्णा सभागृहात स्वयंसेवी संस्था व सीएसआर भागीदारांच्या बैठकीत ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, मृद व जलसंधारण अभियंता हरेंद्र वाघमारे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, डॉ. हरिष बाहेती, अविनाश मारशेटवार, दीपा वानखेडे, डॉ.अर्चना मेहकर, वृषाली टेकाळे, ॲड भारती सोमाणी आदींची प्रमुख उपस्थिती होती.



मृद व जलसंधारण विभागातर्फे प्रस्तावित कामांचे नियोजन व आवश्यक निधीची माहिती श्री. वाघमारे यांनी सादर केली. जिल्ह्यात जून ते सप्टेंबरदरम्यान ४८५.७८ मि.मी. पाऊस झाला असून, पावसाची तूट ३७.३७ टक्के आहे. त्यामुळे ७९ पैकी ७७ निरीक्षण विहिरींच्या भूजल पातळीत सरासरी १.११ मीटरने घट झाली आहे. जिल्ह्यातील २४७ गावांमध्ये तीन टप्प्यांत पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जलसाठ्यांची क्षमता वाढविणे आणि भूजल पुनर्भरणाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे.

प्रस्तावित आराखड्यात तलावांमधून गाळ काढण्याची १७४ कामे, नाला खोलीकरण व रुंदीकरणाची १७६ कामे आणि पाच सिमेंट साठवण बंधाऱ्यांचा समावेश आहे. तलावांमधून सुमारे ३२.५ लाख घनमीटर गाळ काढण्याचे नियोजन असून, त्यातून अंदाजे ८ हजार १०० एकर शेतजमिनीला सुपीक गाळ उपलब्ध होऊ शकणार आहे. तसेच तलावांची सुमारे ३.२५ दशलक्ष घनमीटर साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. तालुकानिहाय नियोजनानुसार मंगरुळपीर येथे २३ तलाव व ६६ नाला कामे, वाशिम येथे ३६ तलाव व पाच सिमेंट साठवण बंधारे तसेच २४ नाला कामे, रिसोड येथे २९ तलाव व ४२ नाला कामे, कारंजा येथे २६ तलाव व २० नाला कामे, मालेगावमध्ये ३४ तलाव व १८ नाला कामे, तर मानोरा येथे २६ तलाव व तीन नाला कामे प्रस्तावित आहेत.

जिल्ह्यात 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजना राबविण्यात येत आहेत. स्वयंसेवी संस्था व सीएसआर भागीदारांना यंत्रसामग्री आणि इंधन, गाळ उपसा, जनजागृती, प्रकल्प अहवाल व पात्र शेतकऱ्यांना गाळाचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करता येणार आहे. गाळ उपशासाठी यंत्रसामग्री व इंधन खर्चापोटी प्रति घनमीटर ३१ रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना गाळ वाहतुकीसाठी प्रति घनमीटर ३५.७५ रुपये अनुदान देय आहे. यासाठी एकरी १५ हजार रुपये आणि कमाल अडीच एकर क्षेत्रापर्यंत लाभाची तरतूद आहे. नाला खोलीकरणातील गाळ वाहतुकीसाठी मात्र खर्च देय नाही.

स्वयंसेवी संस्थांची निवड जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेतील समितीमार्फत होईल. संस्था नोंदणीकृत, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण, पुरेसे मनुष्यबळ तसेच सनियंत्रण व मूल्यांकनाचा अनुभव असणे आवश्यक आहे. कामांचे जिओटॅगिंग, कामापूर्वी व कामानंतरची छायाचित्रे, दैनंदिन गाळ उपसा आणि यंत्रसामग्रीच्या कामकाजाची नोंद 'अवनी ग्रामीण ?प'वर करण्यात येणार आहे. संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रानुसार तालुका व जलसाठ्यांची निवड करून यंत्रसामग्री अथवा सिएसआर निधीच्या स्वरूपात सहभाग नोंदवावा. संस्थेचा परिचय, नोंदणी तपशील, पूर्वी केलेल्या कामांची माहिती आणि वाशिम जिल्ह्यासाठी प्रस्तावित कृती आराखडा मृद व जलसंधारण विभागाकडे सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी यावेळी केले. बैठकीला पाणी फाउंडेशन, रिलायन्स, पतंजली ,समता फाउंडेशन आदी स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

'आकांक्षा हाट' मध्ये बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ !

मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते शुभारंभ; १० स्टॉल्सची उभारणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमांतर्गत वाशिम येथिल जिल्हा क्रीडा मैदानात ४ ते ७ नोव्हेंबर दरम्यान 'आकांक्षा हाट' (व्होकल फॉर लोकल) विक्री प्रदर्शनाचे गुरुवारी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते उद्घाटन झाले. महिला स्वयंसहाय्यता गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.



यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान यांनी महिला बचत गटांनी शासकीय योजनांचा लाभ घेऊन उद्योगांच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन केले. जिल्हा परिषदेचे अति मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी गटांच्या उत्पादनांचे कौतुक करत वाशिमकरांनी दिवाळी फराळासह इतर शोभेच्या वस्तूंची खरेदी करण्याचे आवाहन केले. उत्पादनांचा दर्जा वाढवून ती राष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.या प्रदर्शनात बचत गटाचे ८ ते १० स्टॉल उभारण्यात आले आहेत. अशीच प्रदर्शने इतरही ५ तालुक्यामध्ये लावण्यात आली आहेत. जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या मार्गदर्शनात मालेगाव येथील 'आकांक्षा हाट' प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये दिवाळी फराळ तसेच विविध शोभेच्या वस्तू यांचा समावेश आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, गटविकास अधिकारी रविंद्र सोनोने, विस्तार अधिकारी सचिन गटलेवार, जिल्हा व्यवस्थापक सुधीर खुजे, संदिप ढाले, प्रफुल्ल इटाळ, दत्ता चव्हाण, गणेश कवर यांची उपस्थिती होती.

जन्माला आले तर चांगले कर्म करा : खोडे महाराज



ह प्रतिनिधी ि मानोरा ह

लालमती (धामणी) येथे झोलेनाथ महाराज यांची पुण्यतिथी सोहळा दिनांक ४ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला. लालमती (धामणी) येथे संत झोलेनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यसनमुक्त सम्राट खोडे महाराज यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना जन्माला आले तर चांगले कर्म करा. असा मोलाचा संदेश दिला. महापूजा संजय अलदर व मनीषा अलदर यांनी केली. यावेळी काल्याचे कीर्तन ह भ प खोडे महाराज यांनी केले नंतर भाविकांनी महाप्रसाद घेतला.या वेळी संस्थांनचे विश्वस्त अण्णासाहेब पाटील, व्हि.बी.पाटील, पुसांडे महाराज, जामदार महाराज,साहेबराव भोयर महाराज,खाडे महाराज, महल्ले पाटील महाराज,राजगुरे महाराज, सीताराम सावदे महाराज, पांडुरंग चौधरी महाराज, गावंडे महाराज, वसंतराव चव्हाण, विजय पाटील ठाकरे,प्रभाकर भोयर,नानासाहेब पाटील,चंदूभाऊ भुजाडे, शिवा ठाकरे,अमोल ठाकरे आदी उपस्थित होते.

वाशिममध्ये 'विकसित भारत युवा संवाद' कार्यक्रम उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■



लोकशाही मूल्ये, मतदानाचा अधिकार आणि जबाबदार नागरिकत्वावर युवकांचे विचारमंथन

युवकांमध्ये लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करणे आणि मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय, भारत सरकारच्या मेरा युवा भारत केंद्र, वाशिम यांच्या वतीने राणी लक्ष्मीबाई कन्या शाळेत 'विकसित भारत युवा संवाद – आपले मत जाणून घ्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी युवक-युवतींनी लोकशाही मूल्ये, मतदानाचा अधिकार, संविधानिक मूल्ये आणि नागरिकांची कर्तव्ये यावर विचारमंथन केले. लोकशाहीची ताकद जागरूकता, विचारशीलता आणि जबाबदारीतून अधिक बळकट होते, असे मार्गदर्शन यूथ आयकॉन डॉ. विजय दराडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकशाही शपथ घेऊन जबाबदार नागरिक बनण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपमुख्याध्यापक राजेश ढाकरके होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा युवा अधिकारी सूरज शिंदे उपस्थित होते. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे विचार, सहभाग आणि कृती महत्त्वाची असल्याचे सूरज शिंदे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद राठोड यांनी केले, तर संजय पुराणकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेरा युवा भारत केंद्राच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

मूलभूत सुविधांचा बोजवारा; अंधारामुळे चोरट्यांचे फावले!

अकोला : अकोला महानगरपालिका प्रभाग क्रमांक १३ अंतर्गत येणाऱ्या शिवर गावात मूलभूत नागरी सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. ऐन दिवाळीच्या सणाच्या तोंडावर गावातील स्ट्रीट लाईट गेल्या ब-याच दिवसांपासून बंद असल्याने संपूर्ण परिसर अंधाराच्या विळख्यात सापडला आहे. या अंधाराचा फायदा घेत गावात छोट्या-मोठ्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एकीकडे महानगरपालिकेने शहरातील स्वच्छतेसाठी घंटागाडी सेवा सुरू केली असली, तरी अद्याप या घंटागाडीने शिवर गावात प्रवेशच केलेला नाही. त्यामुळे कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला असून स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पत्रकार प्रवीण सावरे यांना पितृशोक

मनोहरआप्पा सावरे यांचे ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



किन्हीराजा येथील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ व जुन्या पिढीतील कार्यकर्ते तसेच पत्रकार प्रवीण सावरे यांचे वडील मनोहरआप्पा सदाशीवआप्पा सावरे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने सावरे कुटुंबीयांसह नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरात शोककळा पसरली आहे.

मनोहरआप्पा सावरे हे किन्हीराजा परिसरातील परिचित व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, पत्रकार बांधव तसेच गावातील नागरिकांनी सावरे कुटुंबीयांप्रति शोकसंवेदना व्यक्त केल्या.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असून, त्यांच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आधी सेवा वृद्धाश्रमातील निराधार माता-पित्यांची, नंतर पूजा केली कुळदैवतांची



■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त, दिव्यांग सेवक, ज्येष्ठ साहित्यिक, लोककलावंत आणि पत्रकार संजय मधुकरराव कडोळे हे जय भवानी जय मल्हार गोंधळी वारकरी मंडळाचे अध्यक्ष तसेच आद्यशक्ती श्री कामाक्षा देवीचे गोंधळी आहेत. दरवर्षी शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त ते घरोघरी जोगवा मागतात आणि लग्नप्रसंगी गोंधळ-जागरणाचे कार्यक्रम करतात. मिळालेला जोगवा व दक्षिणा स्वतःसाठी न वापरता ते दानधर्मासाठी खर्च करतात आणि नवरात्रानिमित्त महाप्रसाद भोजनाचा कार्यक्रम आयोजित करतात.

यावर्षी महाप्रसादाच्या दिवशी त्यांनी आपल्या मातोश्री श्रीमती दुर्गाबाई मधुकरराव कडोळे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सर्वप्रथम स्थानिक श्री भायजी महाराज वृद्धाश्रम, कारंजा येथे भेट दिली. त्यांच्यासोबत सौ. संगीताताई इंगोले, सुधाकर इंगोले, शाहिर देवमन मोरे, उमेश अनासाने, ह.भ.प. लोमेश पाटील चौधरी, कैलास हांडे, पत्रकार विनोद गणवीर, श्री कामाक्षा देवी संस्थानचे सचिव रोहित महाजन हे उपस्थित होते. तेथील बावीस ते पंचवीस निराधार व बेघर वृद्ध माता-पित्यांचे दर्शन घेऊन, सर्वांच्या अंगावर उपरणे पांघरून त्यांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांना भोजन देण्यात आले. यावेळी वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापिका सौ. पूजाताई राधेशाम राठोड तसेच कर्मचाऱ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

अद्भुत दिवाळी पहाटचे आयोजन!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



येथिल श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती वाशिम ही अध्यात्मिक क्षेत्रात काम करणारी समिती असून वेगवेगळ्या धार्मिक साधनेसाठी प्रसिद्ध आहे.

या समितीतर्फे दरवर्षी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अद्भुत दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात येत असते.

यंदा दिवाळी पहाट हा कार्यक्रम रविवार दिनांक ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक ६ वाजता स्वागत लॉन वाशिम येथे आयोजित केला आहे.

श्रीयंत्र,श्रीसुक्त आणि ललितासहस्त्रनाम या सिध्दमंत्रांच्या साह्याने होणाऱ्या या अद्भुत साधनेत सर्व साधकांना आनंद अनुभूती येते म्हणूनच वाशिममधिल साधक प्रचंड संख्येने दरवर्षीच उपस्थिती नोंदवतात. ओंकार साधना, सूर्यपूजन,नवग्रहपूजन,कुबेर पूजन,लक्ष्मीच्या चार पुत्रांचे स्मरण,बिल्वपूजन,अलक्ष्मी घरातून बाहेर निघण्यासाठीची साधना आणि लक्ष्मीने घरात कायम निवासी राहण्याची उपासना यावेळी केली जाते.सर्वांना सकारात्मक अनुभूती येत असल्याने सर्व साधक आवर्जून साधनेत सहभागी होतात.

या वर्षी देखिल वाशिमकरांनी साधनेत सहभाग नोंदवून आनंदअनुभूती घेण्याचे आवाहन श्री.माता अमृतानंदमयी सत्संग समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

कारंजा बसस्थानक परिसरात ३३ वर्षीय युवकाचा आकस्मिक मृत्यू

उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल; डॉक्टरांनी केले मृत घोषित

■ प्रतिनिधी | कारंजा ■



कारंजा बसस्थानक परिसरात एका ३३ वर्षीय युवकाचा आकस्मिक मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. गजानन तुकाराम रोकडे (वय ३३, रा. किन्ही रोकडे) असे मृत युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेची माहिती समाजसेवक शाम घोडेस्वार यांनी श्री गुरुमाऊली रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांना दिली. माहिती मिळताच कारंजा शहर पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक नेवारे व पोलीस कॉन्स्टेबल भारत राठोड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

त्यानंतर रुग्णवाहिकेच्या मदतीने गजानन रोकडे यांना तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. अवघ्या ३३ वर्षांच्या युवकाचा अशा प्रकारे आकस्मिक मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, याप्रकरणी कारंजा शहर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

जाहीर नोटीस

वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९०/२०२२ — प्रोसेस नं.१४१४७/२०२६

चौ.ता. ०९/१२/२०२६ — दिनांक : ०४/११/२०२६

अर्जदार : १. गंगुबाई शिवलिंग कापसे रा. पी. एच. सी. जवळ, वळगाव, जि. अमरावती २. संजय शिवलिंग कापसे रा. राइतवारी कॉलनी, वार्ड नं. १९, शिव टेलर्स जवळ, चंद्रपुर ३. सुशिला शिवलिंग कापसे रा. संताजी नगर, भौरद, ता. जि. अकोला. ४. गीता जानकीराम वसतकार रा. टेकडी पुरा, पी. एच. सी. जवळ, वळगाव, जि. अमरावती ५. राजेश शिवलिंग कापसे रा. संताजी नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. शिवलिंग नरसन्ना कापसे रा. भौरद ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, शिवलिंग नरसन्ना कापसे यांचे दि. ०१/०५/२००२ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

आकाश कंदीलातून एनसीसी विद्यार्थ्यांनी दिला जलसंवर्धनाचा संदेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■



महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने कार्यकारी अभियंता हरेंद्र वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात जलसंवर्धनाबाबत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. २१ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येत असून, जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, मृदसंवर्धन आणि पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन याबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाला हातभार लावत श्री बाकलीवाल विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयसात एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या पुढाकाराने 'आजचे जलसंवर्धन उपाय व पाणी बचत' या विषयावर आकाश कंदील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ८३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांसोबतच सामाजिक व पर्यावरणीय बांधिलकीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागदांचा वापर करून आकर्षक आकाश कंदील तयार केले. या आकाश कंदिलांच्या माध्यमातून पाणी बचत, मृदसंवर्धन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रभावी संदेश सादर करण्यात आले. 'आजचे संवर्धन, उद्याचे सुरक्षित भविष्य', आणि 'पाणी वाचवा, भविष्य घडवा' यांसारख्या घोषवाक्यांतून विद्यार्थ्यांनी जल आणि मृदसंपत्तीचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमाला मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाश कंदिलांची पाहणी केली. यामध्ये जलसंधारण अधिकारी संकेत इंगोले, जलसंधारण अधिकारी रवि भालेराव, लेखापरीक्षक मिलिंद सावदेकर आणि वरिष्ठ लिपिक अतुल करमनकर यांचा समावेश होता. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करून जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचा योग्य वापर आणि पर्यावरण रक्षण याविषयी मार्गदर्शन केले.पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरविणे, उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे, वृक्षारोपणाला प्रोत्साहन देणे आणि मातीची धूप रोखणे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे ही केवळ शासनाची किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतींतून दिला. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचत आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाल्यास भविष्यात जबाबदार नागरिकांची पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३९ ■ शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

रस्त्यांवर मृत्यूचे तांडव; दहा महिन्यांत १४८ जणांचा बळी

अतिवेग, बेदरकारपणा आणि वाहतूक नियमांची पायमल्ली ठरतेय जीवघेणी

वर्धा जनमाध्यम - जिल्ह्यातील रस्ते आता सुरक्षित प्रवासाचे नव्हे, तर मृत्यूचे सापळे ठरत आहेत. वाहनांचा वाढता वेग, नियमांची सर्रास पायमल्ली आणि वाहनचालकांचा बेफिकीरपणा यामुळे अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ या अवघ्या दहा महिन्यांत जिल्ह्यात २९३ रस्ते अपघातांची नोंद झाली असून, त्यातील १२९ अपघात प्राणांतिक ठरले आहेत. या अपघातांत तब्बल १४८ जणांना जीव गमवावा लागला आहे. विशेष म्हणजे, अपघातांची संख्या किंचित घटली असली तरी मृत्यूंचा आकडा वाढल्याने रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

गतवर्षी जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात २९४ अपघातांची नोंद झाली होती. त्यापैकी १४७ अपघात प्राणांतिक होते आणि त्यात १४७ व्यक्तींचा मृत्यू झाला होता. यंदा एकूण अपघातांची संख्या एका अपघाताने कमी झाली, तर प्राणांतिक अपघात सातने घटले. मात्र, मृत्यूंची संख्या एकने वाढून १४८ वर पोहोचली आहे. म्हणजेच अपघातांची संख्या कमी करण्याच्या प्रयत्नांनंतरही मृत्यूंचे प्रमाण रोखण्यात यंत्रणांना अपेक्षित यश आलेले नाही.

अपघातांच्या कारणांचा विचार केला तर वाहनांचा अनियंत्रित वेग, वाहतूक नियमांकडे होणारे दुर्लक्ष, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, बेदरकार वाहन चालविणे, दुचाकीवर हेल्मेटचा अभाव, चारचाकीमध्ये सीटबेल्ट न लावणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर आणि मद्यप्राशन करून वाहन चालविणे ही प्रमुख कारणे समोर येतात. महामार्गांपासून ग्रामीण भागातील अंतर्गत रस्त्यांपर्यंत अपघातांचे सावट पसरले आहे. एका क्षणाचा निष्काळजीपणा संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करीत आहे.

हेल्मेट, सीटबेल्ट म्हणजे जीवाची सुरक्षा

दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा आणि चारचाकी चालकांनी सीटबेल्टचा वापर करणे हा पर्याय नसून सुरक्षिततेचा मूलभूत नियम आहे. वाहनांचा वेग मर्यादेत ठेवणे, मोबाईलचा वापर टाळणे, मद्यप्राशन करून वाहन न चालविणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. कारण रस्त्यावरची बेफिकिरी केवळ वाहनचालकाचाच नव्हे, तर निष्पाप प्रवाशांचाही जीव घेऊ शकते.



कारवाई होते; मग अपघात थांबतात का

वाहतूक नियंत्रण शाखा आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जाते.

रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्यक्रमही राबविले जातात. मात्र, कारवाई आणि जनजागृतीनंतरही अपघातांचे वास्तव बदलताना दिसत नाही. केवळ दंड आकारून रस्ते सुरक्षित होणार नाहीत, तर नियमांची प्रभावी अंमलबजावणी, धोकादायक ठिकाणांवर उपाययोजना आणि सातत्यपूर्ण देखरेख आवश्यक आहे.

जयंतीदिनी जमनालालजींच्या स्मृतींना नवा साज

बजाज चौकातील पुतळा परिसराचे सौंदर्यीकरण; शेखर बजाज यांच्या हस्ते लोकार्पण

मोठ्या स्क्रीनवर उलगडला बजाज समूहाचा शंभर वर्षांचा औद्योगिक आणि सामाजिक प्रवास



वर्धा जनमाध्यम : उद्योग, समाजसेवा आणि राष्ट्रकार्याचा आदर्श निर्माण करणारे सेवाभावी उद्योगपती जमनालाल बजाज यांच्या जयंतीचे औचित्य साधून वर्ध्यातील बजाज चौकातील त्यांच्या पुतळा परिसराला सौंदर्यीकरणातून नवा साज चढविण्यात आला. मंगळवारी, ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता बजाज समूहाचे शेखर बजाज यांच्या हस्ते या सौंदर्यीकरण कामाचे लोकार्पण करण्यात आले. या निमित्ताने जमनालालजींच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरव करण्यात आला.

जमनालाल बजाज हे केवळ यशस्वी उद्योगपती नव्हते, तर समाजाप्रती बांधिलकी जपणारे द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या कार्याचा वारसा आजही विविध सामाजिक आणि औद्योगिक उपक्रमांतून पुढे नेला जात आहे. त्यांच्या जयंतीदिनी पुतळा परिसराचे सौंदर्यीकरण पूर्ण होऊन लोकार्पण झाल्याने या स्मृतिस्थळाला नवे वैभव प्राप्त झाले आहे.



(फोटो राहुल तेलरांधे, वर्धा)

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली ती बजाज चौकातील मोठ्या स्क्रीनवर सादर करण्यात आलेली बजाज समूहाच्या शंभर वर्षांच्या औद्योगिक वाटचालीची चित्रफीत.

समूहाची शतकभरातील प्रगती, विविध क्षेत्रांतील विस्तार आणि उल्लेखनीय कामगिरीचा प्रवास यावेळी उपस्थितांसमोर उलगडण्यात आला. या सादरीकरणातून एका उद्योगसमूहाच्या यशस्वी वाटचालीसोबतच जमनालाल बजाज यांनी रुजविलेल्या दूरदृष्टीचीही आठवण करून देण्यात आली.

यावेळी वर्धा नगरपरिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ, पवनार आश्रमाचे गौतम बजाज, ?ड. टावरी, संजय भार्गव, अनुराग बजाज, रुपाली बजाज यांच्यासह बजाज संस्थेच्या विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते. शहरातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत समाजसेवक, व्यावसायिक आणि प्रतिष्ठित नागरिकांनीही उपस्थित राहून या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

जमनालाल बजाज यांच्या विचारांचा वारसा जपणारे हे स्मृतिस्थळ आता नव्या रूपात शहरवासीयांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे.

प्रतिबंधात्मक कारवाईला ठेंगा; गुंडाची थेट येरवड्यात रवानगी

एमपीडीएचा बडगा, दहा गुन्ह्यांची नोंद

वर्धा जनमाध्यम : शिवीगाळ, मारहाण, जीवे मारण्याच्या धमक्या आणि घातक शस्त्रांचा धाक दाखवून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या राजू रामू तुमडाम (४०, रा. भुगाव) याच्यावर पोलिसांनी एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई केली. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या ४ नोव्हेंबरच्या आदेशानुसार त्याची पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली.



तुमडाम याच्याविरुद्ध २०२१ पासून सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात मारहाण, धमकी, घातक शस्त्रे बाळगणे आणि सार्वजनिक ठिकाणी धुमाकूळ घालण्याचे दहा गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी एक वर्षासाठी प्रतिबंधात्मक बंधपत्राची कारवाई करूनही त्याच्या गुन्हेगारी कारवाया थांबल्या नव्हत्या.

पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांनी एमपीडीएअंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली आहे.

युनिकॉर्नवरून विदेशी दारूची तस्करी; ८८ हजारांचा मुद्देमाल जप्त

वर्धा जनमाध्यम : नागपूरहून तुळजापूर महामार्गाने आलोडीमार्गे वर्ध्यात विदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एकाला रामनगर पोलिसांनी गुरुवारी (५ नोव्हेंबर) रंगेहात पकडले. त्याच्याकडून विदेशी दारूच्या ४१ सिलबंद बाटल्या आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली दुचाकी असा एकूण ८८ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

शहरात पेट्रोलिंग सुरू असताना रामनगर पोलिसांना एका काळ्या रंगाच्या युनिकॉर्न दुचाकीवरून विदेशी दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह यमुना



लॉनजवळील रस्त्यावर नाकेबंदी केली. यावेळी संशयित दुचाकीस्वाराला थांबवून त्याची तपासणी केली असता, शाळेच्या बॅगेत विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या.

शैलेंद्र भीमराव वानखेडे (वय ३२, रा. सानेगुरुजी नगर, आर्वी नाका, वर्धा) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून रॉयल स्टॅगच्या १२, रॉयल चॅलेंजरच्या ६, ऑल सिजनच्या ५ आणि ऑफिसर्स चॉईसच्या १८ अशा एकूण ४१ बाटल्या जप्त करण्यात आल्या. या दारूची किंमत १३ हजार ४५० रुपये असून, वाहतुकीसाठी वापरलेली एमएच ३२ एई ३७७३ क्रमांकाची युनिकॉर्न दुचाकीही पोलिसांनी जप्त केली. दुचाकीची अंदाजित किंमत ७५ हजार रुपये आहे.

रामनगर पोलिसांची यमुना लॉनजवळ नाकेबंदी; एकाला अटक

याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक १०५२/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ), (ई), ७७ (अ) तसेच मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार अजहर खान करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक पोर्णिमा राखोंडे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. पथकात पोलीस हवालदार गजानन इवनाथे, मिथुन राठोड, अजहर खान, सचिन पवार, राहुल भोयर आणि रुपेश उगेमुगे यांचा समावेश होता.

दुचाकी चोर पोलिसांच्या जाळ्यात; ६० हजारांची मोटारसायकल हस्तगत

आष्टी (शहीद) जनमाध्यम : शहरातून चोरीला गेलेली ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल शोधून काढण्यात आष्टी पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी रविंद्र मारोतराव भासकवरे (वय ४६, रा. आष्टी) याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली. या कारवाईने मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.



आष्टी पोलीस ठाण्यात २७ ऑक्टोबर रोजी एमएच २७ ईए ८५९४ क्रमांकाची मोटारसायकल चोरीस गेल्याची तक्रार दाखल झाली होती. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा क्रमांक ४०२/२०२६ नोंदविण्यात आला होता. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत संशयित रविंद्र भासकवरे याच्यापर्यंत धागेदोरे जोडले. त्याच्याकडून २ नोव्हेंबर रोजी चोरीची मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. त्यामुळे चोरीचा गुन्हा उघडकीस आला.

ही कारवाई पोलीस निरीक्षक देविदास गजरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार सचिन सोनोने, प्रवीण सदावर्ते आणि सतीश नंदागवळी यांनी केली.

चोपणच्या चारा डेपोचा मार्ग मोकळा; खासदार अमर काळेंच्या पाठपुराव्याला यश

१३ लाख ७१ हजारांचा निधी मंजूर; निविदा प्रसिद्ध, पशुपालकांना दिलासा

वर्धा जनमाध्यम : जनतेची मागणी आणि लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा एकत्र आला की विकासकामांचा मार्ग मोकळा होतो, याचा प्रत्यय कारंजा (घाडगे) तालुक्यातील चोपण येथे आला आहे. चारा डेपो उभारण्याची स्थानिक शेतकरी आणि पशुपालकांची मागणी अखेर मार्गी लागली असून, या कामासाठी शासनाने १३ लाख ७१ हजार ९६२ रुपयांची तरतूद केली आहे. विशेष म्हणजे, कामाची निविदाही प्रसिद्ध झाली आहे. खासदार अमर काळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे चोपणच्या पशुपालकांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



चोपण परिसरातील पशुपालकांना चाऱ्याच्या उपलब्धतेसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. पशुधनाचे संगोपन आणि शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन करणाऱ्या कुटुंबांसाठी चाऱ्याचा प्रश्न महत्त्वाचा बनला होता. त्यामुळे गावात चारा डेपो उभारण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी लावून धरली होती. यासाठी नागरिकांनी खासदार अमर काळे यांच्याकडे निवेदन देत शासनदरबारी प्रश्न उपस्थित करण्याची मागणी केली.

निवेदन स्वीकारून विषय बाजूला ठेवण्याऐवजी खासदार काळे यांनी त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडे पाठपुरावा करून चारा डेपोचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून, शासनाने या कामासाठी १३ लाख ७१ हजार ९६२ रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे.

निधीची तरतूद आणि निविदा प्रक्रिया प्रसिद्ध झाल्याने चारा डेपो उभारणीच्या कामाने पुढचे पाऊल टाकले आहे. आता निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची प्रतीक्षा आहे. चारा डेपो उभारल्यानंतर परिसरातील पशुपालकांना चारा उपलब्धतेच्या दृष्टीने मोठी मदत होण्याची अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुपालकांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधून त्यांना विकासकामांच्या माध्यमातून न्याय मिळवून देणे आवश्यक आहे. चोपण येथील चारा डेपोच्या निमित्ताने स्थानिक मागणीला प्रशासकीय स्तरावर प्रतिसाद मिळाला आहे. या कामासाठी पुढाकार घेणाऱ्या खासदार अमर काळे यांचे स्थानिक नागरिकांकडून आभार व्यक्त केले जात आहेत.

शेतातील खोलीत विदेशी दारूचा अवैध साठा

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, दोन आरोपींवर गुन्हा दाखल

५.७४ लाखांचा मुद्देमाल जप्त

वर्धा जनमाध्यम - शेतातील टिनाच्या खोलीचा वापर विदेशी दारूचा अवैध साठा करण्यासाठी केला जात असल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत उघडकीस आला. खरांगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काचनूर शिवारात टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी तब्बल २९ पेटी विदेशी दारू जप्त केली. या कारवाईत ५ लाख ७४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, याप्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक खरांगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना गोपनीय माहितीदाराकडून विदेशी दारूच्या अवैध साठ्याची माहिती मिळाली. मुकेश कोकाटे



आणि स्नेहल काटकर (दोघेही रा. वर्धा) यांनी काचनूर शिवारातील भास्कर चोपडे (रा. येळाकेळी) यांच्या शेतातील विटा-मातीच्या बांधकामाच्या टिनाच्या खोलीत विदेशी दारू साठवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांना माहिती देण्यात आल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गोपनीयता राखत संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी खोलीत रॉयल स्टॅगच्या ९६०, आयकॉनिक व्हाइटच्या २४० आणि रॉयल चॅलेंजच्या १९२ अशा १८० मिलीच्या एकूण १ हजार ३९२ सीलबंद बाटल्या आढळल्या. याशिवाय ब्लेंडर्स प्राइडच्या ७५० मिलीच्या नऊ बाटल्याही जप्त करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या विदेशी दारूची एकूण किंमत ५ लाख ७४ हजार ८०० रुपये आहे. याप्रकरणी मुकेश कोकाटे आणि स्नेहल काटकर यांच्याविरुद्ध खरांगणा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई), ७७ (अ) आणि ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक राहुल इटेकर, पोलीस अंमलदार भूषण निघोट, धर्मेंद्र अकाली, अमोल नगराळे आणि मंगेश चावरे यांनी केली.

पक्षीसप्ताहाचे 'बहार'दार उद्घाटन-विद्यार्थ्यांना पक्षीनिरीक्षणाची 'नई तालीम'

पक्षी केवळ छंदाचा नव्हे, जगण्याचा भाग बनवा - विजय तांबे

वर्धा जनमाध्यम - पक्षीनिरीक्षण केवळ पक्ष्यांना बघण्यापुरते सीमित न ठेवता तो आपल्या भावविश्वाचा आणि जगण्याचा अविभाज्य भाग बनवावा, असे आवाहन सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे सचिव विजय तांबे यांनी बहार नेचर फाउंडेशन, वनविभाग आणि बोर व्याघ्र प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पक्षी सप्ताहाच्या उद्घाटन समारोहात काढले.

सेवाग्राम आश्रम परिसरातील शांती भवनात आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन नई तालीमचे सचिव कृणाल देसाई यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहारचे अध्यक्ष संजय इंगळे तिगावकर होते. तर, वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, बहारचे माजी अध्यक्ष प्रा. किशोर वानखडे, आनंद निकेतनच्या मुख्याध्यापक जयमाला गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पक्षीनिरीक्षण करताना विद्यार्थ्यांनी त्यांचे रूपरंग, अधिवास, खाद्य आदी नोंदवतानाच पक्ष्यांच्या वर्तनाचाही अभ्यास करावा, असे मत कृणाल देसाई यांनी मांडले.

जंगले ही निसर्गत: निर्माण होत असल्याने केवळ वृक्षारोपणाद्वारे ती उणीव भरून निघणार नाही, असे सांगून किशोर वानखडे यांनी जंगलांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्यावर आपल्या भाषणात भर दिला.

फटाकेमुक्त दिवाळी साजरी करा-

सणोत्सवात तसेच विविध कारणांनी होणारी फटाक्यांची आतिषबाजी केवळ पक्ष्यांसाठीच घातक नसून मानवी जीवनाला आणि एकूणच पर्यावरणासाठीही हानिकारक आहे, असे सोंगून फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन संजय इंगळे तिगावकर यांनी यावेळी केले.

प्रारंभी वृक्षरोपाला पाणी देऊन या सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आनंद निकेतनच्या विद्यार्थ्यांनी कवी अनंत भीमनवार लिखित 'पाखरांची शाळा' हे गीत सादर केले. बहारचे सचिव दर्शन दुधाने यांनी प्रास्ताविकात



बहार नेचर फाउंडेशनच्या वाटचालीचा आढावा घेत पक्षीसप्ताहाच्या आयोजनामागील भूमिका मांडली. तर अतुल शर्मा यांनी आगामी वर्षात वर्धा जिल्ह्यात आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय पक्षिमित्र संमेलनाच्या पूर्वतयारीबाबत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन बहारचे उपाध्यक्ष दीपक गुढेकर यांनी केले व आभार कोषाध्यक्ष आकाश जयस्वाल यांनी मानले.

पोटदुखीने त्रस्त मजुराचा सेवाग्राम रुग्णालयात मृत्यू

पुलगाव जनमाध्यम : पोटदुखी आणि पोट फुगल्याचा त्रास वाढल्याने उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या संजय विठ्ठल मडावी (वय ४१, रा. नदीफैल, पुलगाव) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. २ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय मडावी हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. १ नोव्हेंबरच्या रात्री त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. पोट फुगल्यासारखे वाटत असल्याने २ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता त्यांना ग्रामीण रुग्णालय, पुलगाव येथे नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथे हलविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. त्यानुसार नातेवाइकांनी त्यांना सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचार सुरू असताना त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी तपासणी करून दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास त्यांना मृत घोषित केले. पतीच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे पत्नीने पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे. या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.संपादकीय नोंद : चौथ्या नोंदीत आर्वी उपविभागातील ४ नोव्हेंबरच्या जुगार प्रतिबंधक कारवाईचा उल्लेख असून, जप्त रकमेचा आकडा ४,७२,५०० असा दिसतो. मात्र, आरोपींची संख्या, जप्त मालाचे स्वरूप आणि रकमेचे वर्गीकरण स्पष्ट नसल्याने स्वतंत्र बातमीत चुकीची माहिती जाण्याची शक्यता आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

दिवाळीत मिठाई घेताना सावधान

मुंबई : आजपासून दिवाळी सुरू झाली आहे. त्यामुळे दुकानांमधून मिठाई आणि खवा विकला जात आहे. या काळात मोठया प्रमाणावर मिठाई आणि खव्याची विक्री होणार आहे. त्यापूर्वीच अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावधानतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी आवश्यक तेवढीच मिठाई खरेदी करावी. दोन किंवा तीन दिवसांपेक्षा अधिक काळ दुकानात असलेली खवा मिठाई खरेदी करू नका. मिठाई किंवा खवा खरेदी करताना सावधगिरी बाळगा, असे आवाहन तुकाराम मुंढे यांनी केले आहे. तुकाराम मुंढे यांनी मीडियाशी संवाद साधताना हे आवाहन केले आहे.




नामांकित आणि लेबल असलेली मिठाई आणि खवाच खरेदी करा, असे सांगतनाच जर काही संशयित किंवा भेसळ संदर्भात तक्रार असेल तर एफडीएला कळवा, आम्ही योग्य ती कारवाई करू, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे. तसेच मिठाई आणि इतर मिठाई दुकान आस्थापनांनी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. जास्त कलर, भडक रंग असलेली मिठाई खरेदी करू नका. पाकिटावर मिठाई किंवा खव्याच्या निर्मितीची तारीख असेल तरच खरेदी करा. सोन्याच्या वर्ख, चांदीचा वर्ख असलेल्या मिठाई बाबत काळजी घ्या. चांदीचा वर्ख तपासूनच घ्या. वर्ख हातात घेतला आणि तो विरघळला तर तो योग्य. मात्र जर त्याची फॉईल बनत असेल तर तो अल्युमिनियम फॉईल आहे म्हणून समजायचे. त्यामुळे चांदी किंवा सोन्याचा वर्ख असलेली मिठाई घेताना काळजी घ्या, असे आवाहन मुंढे यांनी केले आहे.

पुण्यात 'एफडीए'चा मोठा दणका; ३ हजार किलो भेसळयुक्त मिठाई जप्त

पुणे/प्रतिनिधी- सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) विशेष मोहिमेंतर्गत पुणे विभागात धडक कारवाई केली. जिल्ह्यात पुणे, पिंपरी-चिंचवडसह सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील १५ अन्न आस्थापनांची तपासणी करून तब्बल ३ हजार १९६.२ किलो खाद्यपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

नष्ट केलेल्या साठ्याची किंमत ४ लाख ३५ हजार २०० रुपये, तर जप्त केलेल्या एकूण साठ्याची किंमत १६ लाख ९३ हजार २९५ रुपये आहे. या कारवाईत आठ आस्थापनांचे परवाने तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले असून, तीन आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे



आदेश देण्यात आले आहेत. अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, हाताळणी आणि लेबलिंगमधील त्रुटी आढळल्याने ही कारवाई करण्यात आली.

पुण्यातील कॅम्प परिसरातील मे. कराची स्वीट मार्ट या मिठाई उत्पादन केंद्राची मंगळवारी (दि.३) तपासणी करण्यात आली. यावेळी मोतीचूर लाडू, खवा आणि मलाई पेढा असे ९० हजार ७८० रुपये किमतीचे एकूण १८६ किलो खाद्यपदार्थ, जप्त करून नष्ट करण्यात आले. तपासणीत सिंथेटिक खाद्यरंग वापराच्या प्रमाणाच्या नोंदी नसणे, खव्याची साठवणूक व हाताळणीबाबतच्या नियमांचे पालन न करणे, कालबा चोको स्टिक्सचा वापर आणि अन्नसुरक्षा नियमावलीतील अनुसूची चारमधील तरतुदींचे उल्लंघन अशा त्रुटी आढळल्याने आस्थापनेचा परवाना निलंबित करण्यात आला.

भाजपा आमदाराकडून तरुण आयएएस अधिकाऱ्याला जीवे मारण्याची धमकी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- ओडिशामध्ये पूर मदतकार्यादरम्यान भाजपा आमदाराने गैरवर्तन करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप एका तरुण आयएएस अधिकाऱ्याने केला आहे. असिका मतदारसंघाचे भाजपा आमदार सरोज पाधी यांच्याविरोधात संबंधित अधिकाऱ्याने पोलिसांत तक्रार दाखल केली असून, या प्रकरणामुळे राज्यातील प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.गंजाम जिल्हा परिषदेचे मुख्य विकास अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले २०२२ च्या बॅचचे आयएएस अधिकारी समीर कुमार जेना यांनी ही तक्रार दाखल केली आहे. पूरस्थितीमुळे जेना यांच्यावर असिका भागातील मदत आणि पुनर्वसन कार्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती.पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, मंगळवारी आमदार सरोज पाधी यांनी जेना यांच्या दालनात प्रवेश केला आणि पूरग्रस्तांना वाटप करण्यात येणाऱ्या मदत साहित्यावरून त्यांच्यावर ओरडण्यास सुरुवात केली. हे मदत साहित्य मंत्री बिभूती जेना यांच्यामार्फत उपलब्ध करण्यात आले असून दिलेल्या निर्देशानुसारच त्याचे वाटप सुरू असल्याचे अधिकाऱ्याने आमदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.'मी आमदारांना शांत करण्याचा प्रयत्न केला आणि या विषयावर थेट संबंधित मंत्र्यांशी चर्चा करण्याची विनंती केली. मात्र त्यांनी माझे काहीही ऐकून न घेता अश्लील आणि असंसदीय भाषेत शिवीगाळ सुरूच ठेवली. तसेच मला जीवे मारण्याची धमकी दिली आणि तत्काळ तेथून निघून जाण्यास सांगितले,' असा आरोप जेना यांनी आपल्या तक्रारीत केला आहे.हा संपूर्ण प्रकार दालनातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचा दावाही अधिकाऱ्याने केला आहे. 'या धक्कादायक प्रकारामुळे माझे मनोबल खचले असून मी तीव्र मानसिक धक्क्यात आहे,' असे जेना यांनी तक्रारीत नमूद केले आहे. या संदर्भात गंजामचे पोलीस अधीक्षक हरिषा बी. सी. यांच्याशी द इंडियन एक्सप्रेसने संपर्क साधला असता, तक्रारीची शहानिशा करून योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे आमदार सरोज पाधी यांनी मात्र सर्व आरोप फेटाळून लावत हा प्रकार केवळ गैरसमजातून घडल्याचा दावा केला आहे. 'आमच्यातील गैरसमज आम्ही परस्पर चर्चेतून दूर केले असून हा वाद आता मिटला आहे. पोलिसांत तक्रार दाखल झाल्याची मला कल्पना आहे, मात्र मी संबंधित अधिकाऱ्याशी चर्चा केली. पुराच्या गंभीर परिस्थितीत आम्ही सर्वजण तणावाखाली काम करत होतो, त्यामुळे काही गैरसमज झाले,' अशी प्रतिक्रिया पाधी यांनी भुवनेश्वरमध्ये माध्यमांशी बोलताना दिली.



'गोकुळ'मध्ये सत्तेसाठी कायदा बदलला; सतेज पाटलांचा आरोप

कोल्हापूर / प्रतिनिधी- गोकुळ दूध संघाच्या अध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने घेतलेल्या चार तज्ज्ञ संचालक नियुक्तीच्या निर्णयावरून जिल्ह्यातील राजकीय वातावरण पेटले आहे. कोल्हापूरच्या दूध उत्पादकांनी महायुतीला नाकारून आमच्या पॅनेलला १३ जागांचे स्पष्ट बहुमत दिले होते. पण, जनादेश डावलून नवा कायदा करत महायुती सत्तेत बसण्यासाठी हे करत आहे. आधी मतचोरी होत होती, आता तर थेट सत्ताचोरीच सुरू आहे, असा आरोप आमदार सतेज पाटील यांनी केला. आज त्यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी गोकुळ दूध संघावरून महायुतीवर टीका केली.

या मनमानी व लोकशाहीविरोधी कारभाराच्या निषेधार्थ सोमवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता दसरा चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान 'कोल्हापूरचा स्वाभिमान महामोर्चा' काढण्यात येणार असल्याची घोषणा सतेज पाटील यांनी केली.

सतेज पाटील म्हणाले, एखादी निवडणूक पार पडल्यानंतर निकाल विरुद्ध लागला म्हणून नवीन कायदा कसा काय लागू केला जाऊ शकतो? हा कोल्हापूरकरांचा आणि साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांचा अपमान आहे. कायदा करून गोकुळ संस्था बळकावली जात आहे. अशा क्लृप्त्या करून सरकारला गोकुळ अमूलच्या घशात घालायचे आहे का? असा सवालही पाटील यांनी केला.आज गोकुळमध्ये जे घडवले जात आहे, उद्या तेच महापालिकेतही करतील, पराभव समोर दिसू लागल्यावर स्वीकृत नगरसेवकांना थेट महापौर निवडीत मतदानाचा अधिकार देतील. लोकशाहीची अशी थट्टा यापूर्वी कधीही पाहिली नव्हती, असेही पाटील म्हणाले.



पहिल्या बैठकीला हजर राहिले असते, तर अध्यक्ष झाला असता

सतेज पाटील म्हणाले, दूध उत्पादकांनी महायुतीला स्पष्ट नाकारले आहे आणि आम्हाला बहुमत दिले आहे, हे स्वत: मुश्रीफ यांनीही मान्य केले आहे. गोकुळच्या पहिल्या बैठकीला महायुतीचे १२ संचालक जर गैरहजर न राहता हजर राहिले असते, तर आमच्या आघाडीचा अध्यक्ष त्याच दिवशी झाला असता. पण जाणीवपूर्वक पाठ फिरवून कोरमचा बागुलबुवा उभा केला. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्याबद्दल हसन मुश्रीफ यांचे आतून नेमके काय मत आहे, हे मला चांगले ठाऊक आहे. परंतु ते आता मुख्यमंत्र्यांना घाबरून काही बोलणार नाहीत, असा टोलाही पाटील यांनी लगावला.

आम्हाला कोर्टात जाण्यापासून रोखण्यासाठी अध्यादेशाला विलंब

आमची याविरोधात न्यायालयात याचिका सुरू आहे. कॅबिनेटने निर्णय कालच घेतला, मग त्याचा अधिकृत अध्यादेश तातडीने का काढला नाही? ते जाणीवपूर्वक वेळकाढूपणा करत आहेत, जेणेकरून आम्हाला योग्य वेळी न्यायालयात दाद मागता येऊ नये. मीदेखील सरकारमध्ये मंत्री म्हणून काम केले आहे. त्यामुळे पडद्याआडून कोणती खेळी सुरू आहे, हे मला चांगले समजते, असेही आमदार सतेज पाटील म्हणाले.

तब्बल ३३ वर्षांनंतर जंतर-मंतरवरील बॅरिकेट्स हटवले!

नवी दिल्ली : तब्बल ३३ वर्षांपासून देशातील आंदोलने आणि निदर्शनांचे मुख्य केंद्र राहिलेले दिल्लीचे ऐतिहासिक जंतर-मंतर आता सर्वसामान्य जनता आणि वाहतुकीसाठी पूर्णपणे खुले करण्यात आले आहे. दिल्ली पोलिसांनी येथील कडक सुरक्षा व्यवस्था आणि बहुस्तरीय बॅरिकेडिंग काढून घेत या रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत केली आहे. दिल्लीचे जंतर-मंतर हे केवळ एक ऐतिहासिक ठिकाण नसून, गेल्या ३३ वर्षांत ते देशातील प्रत्येक आंदोलनाचा आवाज बनले होते. सरकारविरोधात रोष व्यक्त करायचा असो वा आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवायचा असो, देशभरातून लोक येथे येत असत. वर्ष १९९३ मध्ये जंतर-मंतरला अधिकृत आंदोलन स्थळ म्हणून घोषित करण्यात आले होते. तेव्हापासून वर्षभर शेतकरी, कामगार, विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्ष येथे निदर्शने करत आले आहेत. मात्र, आता या परिसराचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. दिल्ली पोलिसांनी गेल्या ऑक्टोबर महिन्यातच जंतर-मंतरला अधिकृत आंदोलन स्थळांच्या यादीतून वगळले होते. त्यानंतर आज येथील सुरक्षेचे अनेक थर असलेली बॅरिकेडिंगही हटवण्यात आली आहेत. सुरक्षेसाठी तैनात असणारे पॅरामिलिट्री फोर्स, क्विक रिस्पॉन्स टीम आणि दंगलविरोधी वाहने देखील तेथून हटवली जात आहेत. त्यामुळे आता या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना आणि सामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नुकताच कॉकरोच जनता पार्टी आणि इतर संघटनांनी मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात जंतर-मंतरवर निदर्शने करण्याचा प्रयत्न केला होता. या आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिस आणि आंदोलकांमध्ये मोठा संघर्ष झाला होता. परिस्थिती बिघडल्याने ११ ऑक्टोबर रोजी दिल्ली पोलिसांनी गृह मंत्रालयाच्या समितीच्या शिफारशीनुसार जंतर-मंतरला आंदोलन स्थळांच्या यादीतून बाद केले. जंतर-मंतरवरील आंदोलनांवर बंदी घातल्यानंतर दिल्ली पोलिसांनी तीन नवीन पर्यायी ठिकाणे निश्चित केली आहेत. यामध्ये मध्य दिल्लीतील रामलीला मैदान, उत्तर दिल्लीतील बराडी मैदान, पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदान ठिकाणांचा समावेश आहे. आता यापुढे कोणत्याही संघटनांना निदर्शने करण्यासाठी जंतर-मंतरऐवजी या नवीन निर्धारित ठिकाणीच परवानगी घ्यावी लागणार आहे.

दोन अपत्यांचा नियम कालबाह्य' सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दोनपेक्षा जास्त अपत्ये असण्यावर दंड आकारणारे कायदे आता कालबाह्य झाले आहेत. गेल्या काही दशकांतील लोकसंख्याशास्त्रीय बदलांमुळे अतिलोकसंख्येची भीती आता मावळल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. देशाचा एकूण प्रजनन दर २००३ मधील ३.० वरून १.९ पर्यंत खाली आला आहे, असे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, लोकसंख्या वाढ मर्यादित करण्याच्या उद्देशाने केलेले कायदे आता अर्थहीन ठरले आहेत.'काकोडा' येथे सरपंच म्हणून निवडून आलेल्या मंगला भीमराव इंगळे यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला. इंगळे यांना दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याने त्या निवडणूक लढवण्यास अपात्र ठरल्या होत्या. या याचिकेवर नोटीस बजावताना त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात दिलेल्या निर्णयाला स्थगिती दिली होती आणि याचिकाकर्तीला 'सरपंच' या निवडून आलेल्या पदावर कायम राहण्याची परवानगी दिली होती. 'नागरी अपील निकाली निघेपर्यंत हा अंतरिम आदेश लागू राहील,' असे न्यायालयाने म्हटले.



न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या जुलै २००३ मधील एका निकालाचा संदर्भ दिला. या निकालात, 'हरियाणा पंचायती राज कायदा, १९९४' च्या वैधतेची तपासणी केल्यानंतर, दोनपेक्षा जास्त जिवंत अपत्ये असलेल्या व्यक्तींना पंचायत पदांवर निवडणूक लढवण्यास किंवा ती पदे भूषवण्यास अपात्र ठरवण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला होता. न्यायपीठाने नमूद केले की, २००३ मध्ये जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर निर्णय दिला होता, तेव्हा त्यांनी चीनचे उदाहरण देऊन कठोर लोकसंख्या नियंत्रणाचे ते एक यशस्वी उदाहरण असल्याचे म्हटले होते.

दिवाळीपूर्वी CJP करणार निदर्शन

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- कॉकरोच जनता पार्टीने SIR प्रक्रियेविरोधात पुन्हा एकदा मोठी घोषणा केली आहे. सीजेपीने आगामी ७ नोव्हेंबर रोजी केरळमधील कोची येथे निदर्शन करण्याचे जाहीर केले आहे. एसआयआर प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यात यावी, असी त्यांची मागणी आहे. कोची येथील 'राजेन्द्र मैदान' येथे सायंकाळी ४ वाजता आयोजित या निदर्शनाला 'कोच्चिमध्ये जंतर-मंतर' असे नाव देण्यात आले आहे. दिल्लीतील दंडात्मक कारवाईनंतर सीजेपीचे हे पहिलेच मोठे निदर्शन असेल. या महत्त्वाच्या निदर्शनात सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके, दक्षिण क्षेत्राचे प्रमुख विजय मल्लांगी आणि राष्ट्रीय सचिव आफरीन नवाज हे उपस्थित राहणार आहेत. दिल्ली पोलिसांनी अलीकडेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि एसआयआरच्या विरोधात विनापरवानगी जंतर-मंतरवर निघालेल्या सीजेपी नेत्यांना ताब्यात घेतले होते. गेल्या महिन्यात दिल्लीत जंतर-मंतर परिसर डीनोटिफाईड घोषित केल्यानंतरही, सीजेपी नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी तेथे राष्ट्रीय ध्वज फडकवत निषेध नोंदवला होता. याप्रकरणी त्यांना एक आठवडा तुरुंगात रहावे लागले होते. विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर बंदी लागू असेपर्यंत जंतर मंतरवर कोणतेही आंदोलन आयोजित करणार नाही, असे हमीपत्र दिल्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड, १० हजार रुपयांचा बोनस जाहीर

पहिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

मुंबई / प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने दिवाळी भेट दिली असून, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १० हजार रुपयांचा बोनस देण्याची घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने दिवाळी भेट दिली असून, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १० हजार रुपयांचा बोनस देण्याची घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे.एसटी कर्मचाऱ्यांची संघटना आणि परिवहनमंत्र्यांमध्ये झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त १० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोबतच कर्मचाऱ्यांना २२ हजार रुपयांची उचल घेता येणार आहे. उचल केलेले पैसे नंतर पगारामधून वळते केले जातील. याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीचा बोनस जाहीर केला आहे. आज दिवाळीचा पहिला दिवस आहे.आजच त्यांचं तोंड गोड केलं आहे. त्यामुळे ते प्रवाशांना अधिक वेठीस धरण्याचा प्रयत्न ते करणार नाहीत, असं मला वाटतं. तसेच पुकारलेला संप ते मागे घेतील. तसेच त्यांच्या मागण्यांबाबत दिवाळीनंतर आम्ही बैठक घेऊ, असे प्रताप सरनाईक म्हणाले. प्रताप सरनाईक पुढे म्हणाले की, एसटीच्या सर्व कामगार प्रतिनिधींना माझं हेच सांगणं आहे की, एसटी महामंडळ तुम्हाला जेवढं देता येईल तेवढं देतंय. माझ्या माध्यमातून, एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून आणि गरज पडली तर मुख्यमंत्र्यांनाही आम्ही निर्णय घ्यायला सांगतो. असं असताना संपासारखं हत्यात कुठेही उपसू नये, अशी विनंती मी त्यांना वारंवार करत आलो आहे. आजही त्यांनी ज्या मागण्या केल्या, त्याला फार वेळ न घेता, सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा करून एसटी महामंडळाची परिस्थिती नसतानाही आम्ही हा निर्णय घेतला आहे. याचा विचार करून त्यांनीही संपासारख्या हत्याराचा वापर करणं योग्य नाही, असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

एसटी कर्मचाऱ्यांचा संप?; ऐन दिवाळीत प्रवाशांचे हाल आणखी वाढणार

मुंबई : ऐन दिवाळीत एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेस (इंटक) संघटनेच्या वतीने संप पुकारण्यात आला आहे. या विषयीची घोषणा संघटनेचे सरचिटणीस मुकेश तिगोटे यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्यासह विविध प्रलंबित आर्थिक मागण्यांसाठी आणि महामंडळाच्या खासगीकरणाच्या धोरणाविरोधात शनिवारी (ता.७) बेमुदत संप पुकारण्यात आला आहे.

एसटी महामंडळाच्या सुमारे ८५० ठिकाणांवरील ३,५०० एकर जमिनी ९८ वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर देण्याचा निर्णय शासनाने ८ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयाद्वारे घेतला आहे. यामुळे एसटीच्या मोक्याच्या जागा धनदांडग्यांच्या घशात जाऊन महामंडळाचे अस्तित्वच धोक्यात येईल. त्यामुळे हा शासन निर्णय रद्द करून जमिनींचा विकास शासनाने स्वत: करावा, अशी ठाम मागणी 'महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेस' (इंटक) संघटनेने केली आहे. याशिवाय, प्रस्तावित १७,८७६



पदांची कंत्राटी भरती रद्द करून नियमित भरती करावी आणि 'इव्हे ट्रान्स प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीकडून प्रति किलोमीटर ७३ दराने ५,१५० इलेक्ट्रिक बसेस भाड्याने घेण्याचा करार रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या करारांमुळे महामंडळाचे कोट्यवधींचे आर्थिक नुकसान होत असून स्वत:च्या मालकीच्या बसेस वाढवण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, असे तिगोटे यांनी स्पष्ट केले.

कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या

शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवाज्येष्ठतेनुसार पदनिहाय वेतनश्रेणी, वेतन आणि सेवा-सवलती लागू करणे.९७ महिन्यांची ११५ टक्के महागाई भत्ता थकबाकी, ६० टक्के दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ थकबाकी अदा करणे.जमिनींचा ९८ वर्षांचा भाडेपट्टा, कंत्राटी भरती व भाडेतत्त्वावरील बस करार रद्द करणे.कर्मचाऱ्यांना २५ हजार दिवाळी भेट देणे.

तिगोटे यांनी सांगितले की, हा संप कोणत्याही पक्षाविरोधात नसून एसटीचे सार्वजनिक अस्तित्व आणि कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आहे. संपामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये हीच आमची इच्छा आहे, पण ठोस निर्णय घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. तसेच सर्व श्रमिक संघटनांना या संपात सहभागी होण्याचे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३१९/२०२६
प्रिया अधिक एक -वि- निरंक
पुढील ता.०५.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. **Priya Bhushan Tayade, Age 36 Yrs. Occu.: Household R/o C/o Gopal Wankhade Suyog Apartment-3, Ring Road, Trimurti Nagar Opp.Bank of Baroda, Ranaprata Nagar, Nagpur, Dist.Nagpur**
2. **Pratibha Sharadrao Kadam, Age 58 Yrs. Occu.: Service R/o Ward No.3, Pathrot, Tq. Achalpur, Dist. Amravati.**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : रत्य

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sharad Bhimrao Kadam हे दिनांक 09.01.2026 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती **येथे मयत झाले. अर्जदार Priya Bhushan Tayade + 1 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा Priya Bhushan Tayade अ १ - Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३.१०.२०२६ **रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०३७/२०२६
Shubhangi Rajendra Likhitkar+2 -वि- निरंक
पुढील ता.०७.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. **Shubhangi Rajendra Likhitkar, Age about 56 Yrs. Occu.: Household**
2. **Kalyani Rajendra Likhitkar, Age about 26 Yrs. Occu.: Service**
3. **Narayani Rajendra Likhitkar, Age about 21 Yrs. Occu.: Education All R/o Near Sitaram Baba Temple, Pannalal Nagar Road, Balaji Plot Amravati. Tq. Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : रत्य

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rajendra Vasantrao Likhitkar हे दिनांक 26.04.2026 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती **येथे मयत झाले. अर्जदार Shubhangi Rajendra Likhitkar + 2 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

त्यापेक्षा Shubhangi Rajendra Likhitkar + 2 - Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५.१०.२०२६ **रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.२९१/२०२६ **ने.ता.०२.१२.२०२६**

अर्जदार : **१. मंदा भाऊराव तुपट**
२. दुर्गा प्रकाश ठाकरे, दोन्ही रा.वडाळी, अमरावती, ता.जि.अमरावती
३. वासुदेव विश्वनाथ बेंद्रे (मयत)
३अ. रत्ना वासुदेव बेंद्रे,
३ब. आकाश वासुदेव बेंद्रे, दोन्ही रा.सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३क. स्नेहा महेंद्र बांडे, रा.धोतरखेडा, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत विश्वनाथ कोंडबा बेंद्रे **यांचा मृत्यू दि.**०४.०४.२०१९ **रोजी सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे सरस्वती कोंडबा बेंद्रे यांचा मृत्यू** ०९.०९.२०२० **मध्ये सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ व २ ह्या मुली असून अर्जदार नं.३अ ही सून आणि अर्जदार नं.३ब, ३क ही नातवंडे आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ **अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० **वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.**

आज दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ **रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार,
जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.०३/२०२६ **ने.ता.०७.१२.२०२६**

अर्जदार : **१. श्रीमती रिबेका आशिष राऊळकर, वय ५१ धंदा - घरकाम**
२. अश्विनी आशिष राऊळकर, वय २१ धंदा - शिक्षण
३. अभिषेक आशिष राऊळकर, वय १८ धंदा - शिक्षण
सर्व रा.चर्च मागे, उदय कॉलनी, चांदूरबाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. मयत आशिष दिलीप राऊळकर **यांचा मृत्यू दिनांक** १५.१२.२०२० **रोजी झाला.** तसेच मयत सिंधु दिलीप राऊळकर **हिचा दि.**१७.०८.२०२३ **रोजी नागपूर, ता.जि.नागपूर येथे मरण पावली.** तसेच मयत दिलीप सामुवेल राऊळकर **याचा मृत्यू दि.**२०.०७.२०२० **रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.०३/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.११.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या चष्म्यातून..

समाजमाध्यमांनी संवादाची व्याख्याच बदलून टाकली आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात घडणारी घटना क्षणार्धात लाखो लोकांपर्यंत पोहोचते. सामान्य माणसालाही आपले मत मांडण्याचे, माहिती प्रसारित करण्याचे आणि सार्वजनिक चर्चेत सहभागी होण्याचे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. मात्र, या माध्यमांची ताकद जितकी मोठी आहे, तितकीच त्यांचा गैरवापर होण्याची शक्यताही वाढली आहे. खोटी माहिती, बनावट छायाचित्रे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार केलेले आक्षेपार्ह ध्वनिचित्रफिती, धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण करणारा मजकूर यांचा प्रसार आता मोठ्या वेगाने होऊ शकतो. अशा परिस्थितीत समाजमाध्यमांवरील बेजबाबदार आणि बेकायदा सामग्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने कठोर भूमिका घेणे आवश्यकच आहे. त्यामुळे अलीकडे सोशल मीडिया पोस्ट आणि खाती हटवण्याच्या घटनांवरून सुरू झालेल्या चर्चेकडे केवळ अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. त्यामागील सार्वजनिक हित आणि डिजिटल सुरक्षेची गरजही लक्षात घ्यावी लागेल. गेल्या काही आठवड्यांत इन्स्टाग्राम, फेसबुक आणि एक्स यांसारख्या समाजमाध्यमांवर अनेक वापरकर्त्यांच्या पोस्ट, ध्वनिचित्रफिती आणि खात्यांवर निर्बंध आणल्याच्या घटना समोर आल्या आहेत. विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (एसआयआर) विरोधातील आंदोलने आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर या कारवायांची चर्चा अधिक रंगली. काही वापरकर्त्यांना त्यांच्या पोस्ट भारतात उपलब्ध नसल्याचे संदेश मिळाले. यामुळे सरकारी यंत्रणांचा हस्तक्षेप आणि समाजमाध्यम कंपन्यांची भूमिका याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, एखादी पोस्ट हटवली म्हणजे सरकारने अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणली, असा सरसकट निष्कर्ष काढणेही योग्य नाही. संबंधित मजकुराचे स्वरूप, त्याचा संभाव्य परिणाम आणि त्यामागील कायदेशीर कारणे तपासणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने ८ आणि १० ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या सल्ल्यांमध्ये समाजमाध्यम व्यासपीठांना सार्वजनिक घटनांशी संबंधित सामग्रीबाबत अधिक दक्षता घेण्यास सांगितले होते. दिशाभूल करणाऱ्या मजकुराचा संदर्भ स्पष्ट करणे, सरकारी यंत्रणांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींना प्राधान्य देणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार केलेल्या बनावट ध्वनिचित्रफितींवर तातडीने कारवाई करणे, अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. या सूचनांमागील उद्देश समजून घेणे महत्त्वाचे आहे. आज एखाद्या नेत्याच्या नावाने बनावट विधान तयार करणे, एखाद्या घटनेचे चुकीचे चित्रण करणे किंवा समाजात संभ्रम निर्माण करणारा मजकूर प्रसारित करणे सहज शक्य झाले आहे. अशा सामग्रीचा परिणाम केवळ संबंधित व्यक्तीच्या प्रतिष्ठेपुरता मर्यादित राहत नाही. निवडणूक प्रक्रिया, सार्वजनिक सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखाही त्यातून धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे सरकारने अशा प्रकारांबाबत दक्ष राहणे, ही काळाची गरज आहे. सुधारित माहिती तंत्रज्ञान नियमांमुळे समाजमाध्यम कंपन्यांच्या जबाबदाऱ्याही अधिक स्पष्ट आणि कठोर केल्या आहेत. न्यायालयीन आदेश किंवा अधिकृत सरकारी सूचनेद्वारे बेकायदा सामग्रीची माहिती मिळाल्यानंतर संबंधित मजकूर हटवण्यासाठी किंवा त्याचा प्रवेश निष्क्रिय करण्यासाठी पूर्वीची ३६ तासांची मुदत कमी करून तीन तास केली आहे. या बदलामागे वेगाने पसरणाऱ्या डिजिटल सामग्रीवर वेळेत नियंत्रण मिळवण्याची भूमिका आहे. कारण समाजमाध्यमांवरील चुकीची माहिती काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते. त्यातून निर्माण होणारा गैरसमज किंवा तणाव नंतर दूर करणे कठीण ठरते. अशा वेळी कारवाईसाठी दीर्घ कालावधी उपलब्ध ठेवण्यापेक्षा तातडीने हस्तक्षेप करणे अधिक परिणामकारक ठरू शकते, अर्थात, वेगाने कारवाई करण्याच्या प्रक्रियेत योग्य पडताळणी आणि कायदेशीर निकषांचे पालन होणेही तितकेच आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६९ अ अंतर्गत देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडता, संरक्षण, राज्याची सुरक्षा आणि सार्वजनिक सुव्यवस्था यांसारख्या कारणांसाठी ऑनलाइन माहितीवरील प्रवेश रोखण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे. तर कलम ७९ अंतर्गत समाजमाध्यम कंपन्यांना वापरकर्त्यांनी प्रसिद्ध केलेल्या सामग्रीबाबत काही अटींच्या अधीन राहून कायदेशीर संरक्षण मिळते. बेकायदा सामग्रीबाबत योग्य सूचना मिळाल्यानंतर आवश्यक ती कारवाई न केल्यास हे संरक्षण प्रभावित होऊ शकते. या तरतुदींचा विचार करताना सरकारची जबाबदारी आणि समाजमाध्यम कंपन्यांची उत्तरदायित्वाची भूमिका लक्षात घ्यावी लागेल. डिजिटल व्यासपीठांना अमर्याद स्वातंत्र्य देऊन चालणार नाही. ज्या माध्यमांवर कोट्यवधी नागरिक अवलंबून आहेत, तेथे गैरवापर रोखण्यासाठी नियम आणि नियंत्रण यंत्रणा असणे आवश्यक आहे. दिल्ली पोलिसांच्या संबंधित युनिटने गेल्या तीन महिन्यांत सुमारे ३०० मजकूर हटवण्याच्या विनंत्या केल्याची माहिती समोर आली आहे. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा नियमित निरीक्षणाद्वारे आक्षेपार्ह किंवा बेकायदा मजकूर ओळखतात आणि संबंधित व्यासपीठांकडे कारवाईची विनंती करतात. ही प्रक्रिया डिजिटल सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मात्र, प्रत्येक प्रकरणात कारवाईचे कारण आणि कायदेशीर आधार स्पष्ट असणे गरजेचे आहे.

कापूस बाजाराची दोर शेतकऱ्यांच्या हाती

देशात कापसाचा पुरेसा साठा असतानाही सरकारने डिसेंबरपर्यंत खुल्या आयातीला मुदतवाढ दिली. अस्मानी संकटामुळे आधीच उत्पादन घटले, त्यात सुलतानी संकटाने ताटात माती कालवण्याचे काम केले आहे. याविरोधात कापूस उत्पादक पट्ट्यातील आमदार, खासदारांना आता शेतकऱ्यांनी बोलते करण्याची वेळ आली आहे. कारण आजही कापूस बाजाराची दोर काही प्रमाणात शेतकऱ्यांच्याच हाती आहे. गरज नसताना केवळ भाव पडण्यासाठी आयातीचे धोरण थांबवणे गरजेचे आहे.

दुष्काळाचे व्रण शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर स्पष्टपणे दिसू लागले आहेत. ही दाहकता पुढील काळात आणखीनच तीव्र होणार आहे. खरिपाला मोठा फटका बसला आणि वाढत्या दुष्काळासोबत रब्बीचे भविष्यही धुळीस मिळत आहे. दुर्दैव म्हणजे या अस्मानी संकटात सुलतानी धोरणांचे जोखडही शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर खोलवर परिणाम करत आहे. कसेबसे हाती आलेल्या तुटपुंज्या मालाला निर्माण झालेली चांगल्या भावाची संधी या सुलतानी संकटांनी हिरावली. नव्या हंगामात सुलतानी संकटाची पहिली कुऱ्हाड पडली ती कापसावर.

देशातील कापसाच्या उत्पादनात यंदा मोठी घट आली. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात कापूस पिकाचे मोठे नुकसान झाले. याचा परिणाम देशातील एकूण उत्पादनावर झाला. उद्योगांच्या मते देशातील उत्पादन यंदा २८० ते २९० लाख टनांच्या दरम्यान होईल. देशातील उत्पादन वापराच्या तुलनेत कमी झाले. साहजिकच भावही वाढले. भाववाढीला आणखी एक कारण म्हणजे शेतकऱ्यांची सावध विक्री. कापसाचे उत्पादन कमी आले. अनेक भागांत रब्बीची पेरणीच होणार नाही. त्यामुळे हाती आलेल्या कापसाला चांगला भाव मिळावा, अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे.

उत्पादन घटल्याने भावात येणाऱ्या तेजीची शेतकरी वाट पाहत आहेत. यापूर्वी कापसाने १० हजारांचा भाव गाठला होता. त्यामुळे शेतकरी यंदा १० हजारांचे स्वप्न बाळगून होते. हंगामाच्या सुरुवातीला कापसाचे भाव वाढल्याने शेतकऱ्यांच्या आशाही पल्लवित झाल्या. काही बाजारांमध्ये कमाल भाव १० हजारांवर पोहोचला देखील होता. मात्र पुन्हा एकदा सरकारच्या ऐतखाऊ धोरणाने शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरण्याचे काम केले. उद्योगांना स्वस्त कापूस हवाय. त्यासाठी त्यांनी सरकारकडे लॉबिंग केले. सरकारने कापूस उत्पादकांचा कोणताही विचार न करता शुल्कमुक्त कापूस आयातीला डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. कारण एकच, उद्योगांना कापूस स्वस्त मिळावा.

आता गरज होती का?

दुष्काळामुळे यंदा देशात कापसाच्या उत्पादनात मोठी घट झाली. पण सध्या देशात कापसाचा साठा आहे. म्हणजेच देशातील कापूस संपलेला नाही, तर नवा कापूस आला आहे. शेतकरी कापसाची सावधपणे विक्री करत आहेत. त्यामुळेच कापसाची आवक कमी राहून भावाला चांगला आधार मिळाला. नेमके उद्योगांनी यावरच ओरड सुरू केली. 'ऑक्टोबर महिन्यात नवा कापूस बाजारात आल्यानंतर भाव कमी होतात. पण यंदा भाव कमी न होता वाढले. त्यामुळे शुल्कमुक्त कापूस आयातीला मुदतवाढ द्यावी,' अशी मागणी उद्योगांनी केली. विशेष म्हणजे सरकारनेही उद्योगांची मागणी लगेच मान्य केली. पण सरकारने शेतकऱ्यांच्या कापसाचा विचार केला नाही.

आयात करून शेतकऱ्यांच्या कापसाचे भाव कमी कसे होतील, याचाच विचार केला. शेतकऱ्यांचे एकरी उत्पादन घटल्याने प्रति क्विंटलचा उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे सध्याच्या भावातही शेतकऱ्यांच्या पदरी नफा पडत नाही. शेतकऱ्यांचे अर्थकारण काहीही असो, उद्योगांना कापूस स्वस्त हवा आणि सरकार उद्योगांच्याच पाठीशी उभे आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. उद्योगांना जसे ऑक्टोबर महिन्यात कापसाच्या भावातील सुधारणा अपेक्षित नव्हती, तसेच शेतकऱ्यांनाही शुल्कमुक्त आयातीची अपेक्षा नव्हती. उद्योगांच्या अपेक्षा सरकार पूर्ण करते. मग शेतकऱ्यांच्या अपेक्षा कोण पूर्ण करणार?

सरकारने शेतकऱ्यांचा कापूस विकेपर्यंत शुल्कमुक्त आयात थांबवणे गरजेचे होते. तशी शेतकऱ्यांना अपेक्षाही होती. याच आधारावरच शेतकरी चांगल्या भावाची अपेक्षा करत कापसाची विक्री गरजेप्रमाणे करत होते. जानेवारीपर्यंत बहुतांशी शेतकरी कापूस विकतात. शेतकऱ्यांचा कापूस बाजारात येऊन गेल्यानंतर गरजेप्रमाणे कापूस आयातीला कुणाचाही विरोध नाही. उद्योगांना कच्चा माल मिळालाच पाहिजे. पण कच्चा माल शेतकऱ्यांना देशोधडीला लावून स्वस्तच मिळाला पाहीजे, हा उद्योगांचा अट्टहास नेहमीच राहिला आहे. देशातील कापूस क्षेत्राची पिछेहाट होण्यामागे हा अट्टहास तेवढाच कारणीभूत आहे.

देशातील कापसाचे भाव आंतरराष्ट्रीय बाजारापेक्षा कमी असतात, तेव्हा उद्योग गप्प बसून नफा कमावतात. पण देशातील भाव आंतरराष्ट्रीय बाजारापेक्षा थोडे वाढले, तरी उद्योगांची ओरड सुरू होते. देशातील भाव वाढले म्हणजेच शेतकऱ्यांना नफा होतोच असे नाही. शेतकऱ्यांचे उत्पादन घटलेले असते. खर्च वाढलेला असतो. याचा विचार आयात करताना होत नाही. यंदाच्या दुष्काळी वर्षात कापूस उत्पादकांना सरकारी धोरणांचा आधार हवा होता. पण हीच धोरणे शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवण्याचे काम करत आहेत. अस्मानी संकटात शेतकऱ्यांना सरकारचाच शेवटचा आधार असतो. पण जेव्हा सरकारच शेतकऱ्यांना आणखी संकटात ढकलते तेव्हा मात्र शेतकऱ्यांची हतबलता वाढते.

जखम मांडीला, मलम गुडघ्याला

उद्योग आणि सरकार एकीकडे देशातील घटत्या उत्पादकतेविषयी चिंता असल्याचा आव आणतात आणि प्रत्यक्ष कृती मात्र आयातीला खतपाणी घालणारी आहे. २०२५-२६ मध्ये देशात विक्रमी ७२ लाख गाठी कापूस आयात झाल्याचे उद्योगांचे म्हणणे आहे. उद्योगांच्या मते, यंदा देशात २८० लाख गाठी कापसाचे उत्पादन होणार आहे. तर देशातील कापसाचा वापर ३६० लाख गाठी होईल. म्हणजेच मागणीच्या तुलनेत उत्पादन कमी आहे. देशातील उत्पादन दरवर्षी घटत आहे.

देशातील रुई उत्पादकता हेक्टरी ४३० ते ४४० किलो आहे. जागतिक सरासरी ८१५ किलो आणि महत्त्वाच्या कापूस उत्पादक २० देशांची सरासरी १५०० किलो आहे. देशातील उत्पादकता वाढावी आणि आयात थांबावी, अशी बेगडी इच्छा सरकार आणि उद्योग सातत्याने व्यक्त करतात. त्यासाठी शेतकऱ्यांनी काय करावे? यावर सर्वच सल्ले देतात. पण उत्पादकता वाढीसाठी सरकार आणि उद्योगांच्या भूमिकेविषयी ब्र देखील काढत नाहीत. देशातील उत्पादकता वाढवायची असेल, तर जुनाट बियाणे तंत्रज्ञान बदलणे, नवीन संशोधन करणे, देशातील वातावरणाला अनुकूल बियाणे उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. हे सरकार आणि काही अंशी उद्योगांचेही काम आहे. यावर कुणीही बोलत नाही. उद्योग तर मूग गिळून गप्प बसतात. उलट उद्योगांनी तर २०३० पर्यंत कापूस आयात खुली करण्याची मागणी करून टाकली आहे.

शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करून कापड उद्योगातील रोजगार, विदेशी चलन, निर्यात यावरून भावनिक वातावरणनिर्मिती केली जाते. त्यासाठी उद्योगांना स्वस्त कापूस मिळावा यासाठी आयात किती गरजेची आहे, हे सरकारही सांगू लागते. सरकारने असे एकांगी धोरण सोडायला हवे. देशातील उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांना नफारूपी प्रोत्साहन हवे आहे. कोणत्याही उत्पादनासाठी ही एकच प्रेरणा असते. सरकारच्या धोरणांची साथ मिळाली तरच हे शक्य आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी करणारी धोरणे देशाला आयातजिवी करणारी आहेत. मागील दोन दशकांमध्ये हाच अनुभव आपण घेत आहोत. देशातील कापूस आणि कापड उद्योगातील समस्या आणि त्यावरील उपाय सर्वांना माहीत आहेत. फक्त सरकारची मानसिकता हे प्रश्न सोडविण्याची आहे का, हा खरा प्रश्न आहे.



सरकार एवढ्यावरच थांबणार का?

सरकारने देशात कापसाचा पुरवठा असतानाही खुल्या आयातीसाठी दोन महिन्यांची मुदतवाढ दिली. सरकारने आता एवढ्यावरच थांबायला हवे. यापेक्षा जास्त मुदतवाढ देऊ नये. उद्योग पुन्हा डिसेंबरमध्ये मुदतवाढीची मागणी करणारच आहेत. सरकारने उद्योगाच्या दबावाला बळी पडत पुन्हा मुदतवाढ दिल्यास देशात आयातीचा लोंढाच येईल. याचा थेट दबाव शेतकऱ्यांच्या कापूस भावावर येईल. शेतकरी आधीच दुष्काळात होरपळत आहेत, आता भाव पडल्यानंतर पुन्हा अडचणीत येतील. मुदतवाढ डिसेंबरपर्यंतच राहिली, तर आयात एका मर्यादेत राहण्याची शक्यता आहे. सध्या डिसेंबरपर्यंत आयात खुली असल्याने किती कापूस आयात होऊ शकतो? याचे आराखडे बांधले जात आहेत. उद्योगांच्या मते २५ लाख गाठींच्या आसपास कापसाची आयात होऊ शकते.

त्यामुळे देशातील २८० लाख गाठी उत्पादन आणि २५ लाख गाठी आयात तसेच शिल्लक साठा यावरून कापसाचा ताळेबंद तयार केला जात आहे. पण सरकारने मुदतवाढ दिल्यास देशाच्या कापूस ताळेबंदात आयातीचा आकडा आणखी फुगलेला असेल. सरकार जेवढी जास्त मुदतवाढ देईल तेवढी जास्त आयात होईल. हे देशातील कापूस बाजारासाठी घातक आहे. सरकार मात्र याकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाही. शेतकऱ्यांनी याविषयी आता आवाज उठवणे गरजेचे आहे. शेतकरी नेत्यांनीही हा मुद्दा उचलून धरण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या आमदार आणि खासदारांना या मुद्द्यावर बोलते करावे. जेणेकरून या धोरणाच्या विरोधात आवाज सरकारपर्यंत जाईल आणि सरकार शुल्कमुक्त आयातीची मदत डिसेंबरनंतर वाढवणार नाही. पहिली मागणी तर तत्काळ आयात थांबवणे हीच असली पाहिजे.

शेतकऱ्यांच्या विक्रीवर बाजार अवलंबून

डिसेंबरपर्यंत कापूस आयात मर्यादेत राहू शकते. कारण आंतरराष्ट्रीय बाजारातही कापसाचे भाव चांगले आहेत. त्यामुळे स्वस्त कापूस मिळणार नाही. दुसरे म्हणजे आयातीसाठीचा खर्च वाढला आहे. युद्धामुळे सर्वच खर्चात वाढ झाली आहे. परिणामी, आयात होणाऱ्या कापसाचा भाव वाढणार आहे. तिसरा मुद्दा म्हणजे रुपयाचे अवमूल्यन. रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत सध्या काहीसे वाढून ९५ रुपयांच्या दरम्यान आले आहे. पण त्यात पुन्हा घट झाल्यास आयात कापूस महाग पडेल.

त्यामुळे देशातील डिसेंबरपर्यंत कापूस आयातीवर मर्यादा येतील आणि आयात २५ लाख गाठींच्या आसपास स्थिरावेल, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. डिसेंबरपर्यंतच्या आयातीचा विचार करता, भावात फार नरमाई येण्याची शक्यता कमीच आहे. काही दिवस पॅनिक सेलिंगचे आणि दिवाळीचे सोडता भाव ९ हजारांच्या आसपास स्थिरावण्यासाठी पोषक वातावरण आहे. फक्त कापूस उत्पादकांनी पॅनिक सेलिंग टाळणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी कापूस लगेच बाजारात आणला नाही तर भाव टिकून राहतील. डिसेंबरपर्यंतची आयात विचारात घेतली तरी कापूस बाजाराची दिशा शेतकऱ्यांच्या कापूस विक्रीनुसारच ठरणार आहे, असे अभ्यासकांनी म्हटले आहे.

अनिल जाधव
(लेखक ॲग्रोवन डिजिटलचे कंटेन्ट लीड आहेत.)

पंजाबमध्ये आमआदमी पक्षाला गळती!

पुढील वर्षाच्या सुरुवातीला पंजाब विधानसभेची निवडणूक होणार आहे.पंजाबमधील सत्ताधारी आम आदमी पक्षाने विधानसभा निवडणुकीसाठी नुकतीच ४० उमेदवारांची आपली पहिली यादी जाहीर केली आहे.ही यादी जाहीर झाल्यानंतर थोड्याच अवधीत आम आदमी पक्षाच्या (आप) तीन आमदारांनी पक्षाचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला आहे.बहुदा पक्षाकडून आपल्याला निवडणुकीसाठी उमेद वारी मिळणार नाही,याची चाहूल त्यांना लागली असावी म्हणूनच त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला असावा.चेतनसिंग जौर माजरा (समाना मतदार संघ) हरमित सिंग पठाणमाजरा (सनौर मतदार संघ) आणि माजी आयपीएस अधिकारी कुंवर विजय प्रताप सिंग (अमृतसर,उत्तर मत दार संघ) हे राजीनामा देणारे तीन आम दार आहेत.पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर लगेचच या आमदारांनी आम आदमी पक्षावर कडाडून टीका केली आहे.पंजाबमधील आपचे सरकार मुख्यमंत्री भगवंत मान हे चालवत नसून, मनिष सिसोदिया आणि अरविंद केजरीवाल हे चालवत असल्याचा आरोप या आमदारांनी केला आहे.आपच्या सरकारच्या कालावधीत अमली पदार्थांचा गैरवापर, संघटीत गुन्हे गारी, खंडणी भ्रष्टाचार हे प्रकार वाढले असल्याचा आरोप या आमदारांनी केला आहे.कायदा व सुव्यवस्था परिस्थिती कमालीची बिघडल्याचा दावा या तीन आमदारांनी केला आहे.

आपच्या तीन आमदारांनी पक्षाचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केल्या नंतर काँग्रेसचे नेते प्रमोद तिवारी आणि उदित राज यांनी आप वर टीका केली आहे.आपचे आणखी काही आमदार लवकरच पक्षाचा राजीनामा देतील असे भाकीत त्यांनी केले आहे.प्रमोद तिवारी यांनी म्हटले आहे की जेंव्हा जहाज बुडा यला सुरुवात होते तेव्हा जहाजावरील लोक आपला जीव वाचवण्यासाठी प्रथम पाण्यात उडी मारतात.आपची अवस्था बुडत्या जहाजाप्रमाणे झाली आहे.उदित राज (काँग्रेसचे नेते) यांनी असा दावा केला आहे की मध्यंतरी आपच्या सहा खासदारांनी जेंव्हा पक्षाचा त्याग करून भाजपात प्रवेश केला तेव्हा पक्षाचे ४० ते ४५ आमदार पक्ष सोडण्याच्या तयारीत होते.त्यांनी असा आरोप केला आहे की मुख्यमंत्री भगवंत मान यांचा सरकार चालवण्यात कोणताही सहभाग नाही ही गोष्ट सर्वांनाच माहित आहे.खरी गोष्ट अशी आहे की अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया हे आपचे दिल्लीतील नेते पंजाबमधील सरकार चालवत आहेत.पंजाबमधील शिरोमणी अकाली दल पक्षाचे अध्यक्ष सुखबिरसिंग बादल यांनी असा दावा केला आहे की येत्या काळात आपचे बरेच नेते पक्षाचा त्याग करतील.तसेच मुख्यमंत्री भगवंत मान हे येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या धुरी मतदारसंघात पराभूत होतील असे भाकीत बादल यांनी केले आहे. आम आदमी पक्षाला गळती लागली असताना आपचे मुख्य प्रतिस्पर्धी काँग्रेस आणि भाजपा यांची काय स्थिती आहे ते थोडक्यात पाहूया.काँग्रेसचे नेते आणि पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजीतसिंग चन्नी व काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वॉरिंग यांच्यातील वाद शिगेला पोहोचल्यानंतर, काँग्रेसच्या नेतृत्वाने वॉरिंग यांची अध्यक्ष पदावरून उचलबांगडी केली आणि परगटसिंग यांची त्या जागेवर वर्णी लावली.परगट सिंग हे भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार आहेत.तसेच त्यांनी यापुर्वी मंत्रीपदही भुषविले आहे.त्या अगोदर काँग्रेस नेतृत्वाने,पक्षाचे पंजाबमधील प्रभारी भुपेश बाघेल यांना त्या पदावरून बाजुला करून त्याजागी सचिन पायलट यांची नियुक्ती केली होती.या पार्श्वभूमीवर पंजाब काँग्रेसमधील सर्व नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत एकदिलाने काम करण्याची गरज आहे.

पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजीतसिंग चन्नी यांची भूमिका या बाबतीत महत्वाची ठरणार आहे.चन्नी यांच्याकडे पंजाब प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपद सोपवण्याची मागणी त्यांच्या समर्थकांनी यापुर्वी केली होती.पंजाबमधील विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि अकाली दल यांची युती झाली तर या युतीला चांगली कामगिरी करता येईल.दिवाळी नंतर बहुदा युतीची घोषणा करण्यात येईल असे म्हटले जात आहे.पंजाब भाजपा अध्यक्ष केवलसिंग धिल्लॉ यांनी मध्यंतरी असे म्हटले होते की पक्ष,पंजाब विधानसभेच्या सर्वच्यासर्व म्हणजे ११७ जागा लढविण्याची तयारी करत आहे.परंतु खरी गोष्ट अशी आहे की पंजाबमध्ये भाजपाची तेवढी ताकद नाही.अजुनही भाजपा,पंजाबमध्ये शहरी भागांपुरती मर्यादित आहे.यापुर्वी भाजपा आणि अकाली दल यांची युती असताना पंजाब विधानसभेच्या एकूण ११७ जागांपैकी अकाली दल ९४ जागांवर आणि भाजपा २३ जागांवर लढत होती.यावरुन भाजपाच्या खऱ्या ताकदीचा अंदाज येईल. २०२२ मध्ये झालेल्या पंजाब विधान सभा निवडणुकीत भाजपा व अकाली दल हे पक्ष स्वतंत्रपणे लढले होते.त्या निवडणुकीत अकाली दलाने तीन जागा जिंकल्या होत्या तर भाजपाने दोन जागा जिंकल्या होत्या.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पंजाब मधील लोकसभेची एकही जागा जिंकता आली नव्हती,तर अकाली दलाला एका जागेवर विजय मिळाला होता.लोकसभा निवडणुकीत अकाली दल, पंजाबमधील लोकसभेच्या सर्वच्या सर्व म्हणजे तेरा जागा लढले होते.अकाली दलाला तेंव्हा १३.४८ टक्के मते मिळाली होती.तर भाजपानेही तेवढ्याच जागा लढवून १८.६५ टक्के मते मिळवली होती.

या पार्श्वभूमीवर अकाली दल आणि भाजपा या दोन पक्षांना मिळालेल्या मतांची एकत्रित टक्केवारी ३२ टक्के इतकी होती.ही टक्केवारी अतिशय लक्षणीय अशी आहे.कारण पंजाब विधानसभा निवडणुकीत मुख्य लढत ही काँग्रेस,आम आदमी पक्ष व भाजपा- अकाली दल युती यांच्यातच होण्याची शक्यता आहे.अर्थात भाजपा - अकाली दल युती मध्ये जेव्हा जागा वाटप होईल तेव्हा ते सुरळीतपणे होईल की नाही या बाबत शंकेला वाव आहे.पुर्वी भाजपा-अकाली दल युतीमध्ये भाजपाच्या वाट्याला फक्त २३ जागा येत होत्या.परंतु बदलत्या परिस्थितीत भाजपाचे तेवढ्या जागांवर समाधान होणार नाही.भाजपाकडून ४५ ते ५० जागांची मागणी होऊ शकेल.तेव्हा दोन्ही पक्षांनी आपली ताकद ओळखून सामंजस्य दाखवले तर जागा वाटपाचा प्रश्न सहज सुटू शकेल.आम आदमी पक्ष, काँग्रेस आणि भाजपा-अकाली दल युती यांमध्ये कोण बाजी मारेल,या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच देऊ शकेल.

अभय गोखले

शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

काँग्रेसचे बाभुळगावात 'काळी दिवाळी' आंदोलन

तहसील कार्यालयासमोर बेसन-भाकरी खाऊन शासनाचा निषेध..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभुळगाव, दि. ५ : नैसर्गिक संकटांनी शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत असताना शासनाकडून जाहीर होणारी मदत प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी असल्याचा आरोप करीत बाभुळगाव तालुका काँग्रेस कमिटीने मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) तहसील कार्यालयासमोर 'काळी दिवाळी' आंदोलन केले. बेसन-भाकरी खाऊन शासनाचा निषेध नोंदविणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना सन्मानजनक आणि पुरेशी आर्थिक मदत देण्याची मागणी केली.



यंदा पावसातील खंड, पिकांची खुंटलेली वाढ आणि रोगराईमुळे खरीप हंगामातील शेतीचे अर्थकारण कोलमडले आहे. एकीकडे उत्पादनात घट, तर दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी मदत शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीची भरपाई करण्यास अपुरी ठरत असल्याची भूमिका काँग्रेसने मांडली. दिवाळीच्या सणात सर्वत्र आनंदाचे वातावरण असताना शेतकरी कुटुंबांच्या घरात मात्र आर्थिक विवंचनेचा अंधार आहे. शासनाच्या मदतीने शेतकऱ्यांचे संकट दूर होणार नसेल, तर या मदतीचा नेमका उपयोग काय, असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांची केवळ घोषणांनी बोळवण न करता त्यांच्या नुकसानीचा योग्य आढावा घेऊन पुरेशी मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात तहसीलदार मीरा पागोरे यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष श्रीकांत कापसे, माजी पंचायत उपसभापती अतुल राऊत, तालुकाध्यक्ष राजेश काटेकर, शहराध्यक्ष प्रदीप नांदुरकर, युवक अध्यक्ष अमेय घोडे, पांडुरंग लांडगे, डॉ. रमेश महानुर, अमोल कापसे, शेख कादर, दिलीप भाकरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

मानव सेवा सामाजिक संस्थांच्या 'दीपावली मिलन' गरजूसाठी शिधावाटप..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. ५ : दिवाळीच्या रोषणाईत अनेकांच्या घरांत आनंदाचे दिवे उजळत असताना, आर्थिक परिस्थितीमुळे सण साजरा करू न शकणाऱ्या गरजूंच्या घरातही आनंदाचा प्रकाश पोहोचविण्याचे काम यवतमाळातील सेवाभावी संस्था करीत आहेत. निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या या संस्थांची संख्या पाहता यवतमाळात मानवसेवेची पंढरी अवतरल्याचे चित्र दिसते, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी केले.

मानव सेवा सामाजिक संस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील बळीराजा चेतना बचत भवन येथे आयोजित दीपावली मिलन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठी, अनंत कौलगीकर, राजेश गढीकर, डॉ.नारायण मेहरे आणि प्रशांत बनगीनवार उपस्थित होते. या कार्यक्रमात नंददीप फाउंडेशन, सेवा समर्पण, ओवी ट्रस्ट, संकल्प फाउंडेशन, तेजस्विनी छात्रावास, नवजीवन वृद्धाश्रम (नेर), संत दोला महाराज वृद्धाश्रम (उमरी पठार), स्व.स. अ.भूत वृद्धाश्रम, जिव्हाळ्याची भिंत संस्था (घाटंजी), मातोश्री वृद्धाश्रम (आर्णी) आणि स्नेह आधार (नेर) या संस्थांना गहू, तांदूळ, डाळ व खाद्यतेलाचे वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठी यांनीही मनोगत व्यक्त केले. विवेक कवठेकर यांनी सूत्रसंचालन, तर अनंत कौलगीकर यांनी आभार प्रदर्शन केले. दिवाळी केवळ स्वतःच्या घरापुरती मर्यादित न ठेवता वंचितांच्या जीवनातही आनंद फुलविणाऱ्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

थोडक्यात



शेतकऱ्यांच्या संकटात पैनगंगा गोरक्षणाचा मदतीचा हात!

मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ११ हजार १११ रुपयांचे योगदान.

फुलसावंगी : दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पैनगंगा गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्टने सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ११ हजार १११ रुपयांचे योगदान दिले. भाजपा जिल्हा समन्वयक तथा यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष नितीन भुतडा यांनी केलेल्या मदतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत ट्रस्टच्या वतीने धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. शेतकऱ्यांवरील संकटाची तीव्रता लक्षात घेता समाजातील दानशूर संस्था आणि नागरिकांनी पुढे येण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत पैनगंगा गोरक्षणने दिलेले योगदान इतर सामाजिक संस्थांसाठी ही प्रेरणादायी ठरणारे आहे. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष तथा गोरक्षणचे उपाध्यक्ष योगेश वाजपेयी, अध्यक्ष संतोष राठोड, सचिव संतोष पेन्शनवार, नरेंद्र शिंदे, अमरदीप दळवे आदी उपस्थित होते.



आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या दिवाळीत मंडळ अधिकाऱ्यांची स्नेहभेट

घाटंजी : दिवाळीच्या झगमगाटात अनेक घरांत आनंदोत्सव सुरू असताना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या वाट्याला मात्र दुःखाचा अंधार येतो. या वेदनेची जाणीव ठेवत घाटंजी तालुक्यातील सर्व मंडळ अधिकाऱ्यांनी माणुसकीचा हात पुढे केला. डोर्ली येथील राम मोतीराम कुळसंगे यांच्या आत्महत्येमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबीयांची मंडळ अधिकाऱ्यांनी दिवाळीनिमित्त स्नेहभेट घेऊन विचारपूस केली.

यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना मानसिक आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. केवळ महसुली कामकाज आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांपुरते मर्यादित न राहता दुःखाच्या प्रसंगी पीडित कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे, हीच खऱ्या लोकसेवेची कसोटी असल्याचा संदेश या उपक्रमातून मिळाला. मात्र, अशा कुटुंबांना केवळ सणासुदीच्या भेटीपुरता आधार नको, तर त्यांच्या पुनर्वसनासाठी सातत्यपूर्ण शासकीय मदतही मिळणे गरजेचे आहे. मंडळ अधिकाऱ्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद असला, तरी माणुसकीची ही भावना वर्षभर टिकणे हीच खरी अपेक्षा आहे.

मंदिरातील कथित अतिक्रमणावर पोलिसांची भूमिका काय!

दुकानांच्या सद्यस्थितीचा ताजा अहवाल सादर करण्याचे निर्देश

पांढरकवडा : मंदिर परिसरातील कथित अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या दुकानांच्या प्रकरणात एफआयआर नोंदविण्याबाबत पोलिसांच्या भूमिकेवर आता राज्य मानवाधिकार आयोगाने प्रश्न उपस्थित केले आहेत. दुकानांची सद्यस्थिती स्पष्ट करणारा ताजा अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाने पांढरकवडा पोलिसांना दिले आहेत. युवा टायगर फोर्स यांनी पोलीस अधीक्षक,यवतमाळ यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीवर २७ ऑक्टोबर रोजी न्यायमूर्ती स्वप्ना एस. जोशी यांच्यासमोर सुनावणी झाली. दखलपात्र गुन्ह्याची माहिती व पुरावे देऊनही एफआयआर नोंदविला नसल्याचा आक्षेप तक्रारदारांनी घेतला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १७३ नुसार पोलिसांच्या कार्यवाहीचा मुद्दाही आयोगासमोर मांडण्यात आला. आता दुकानांची वस्तुस्थिती आणि पोलिसांची कार्यवाही अहवालातून स्पष्ट होणार आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी ७ जानेवारी २०२७ रोजी होणार असून, त्या दिवशी अंतिम युक्तिवाद होणार आहे. त्यामुळे पोलिसांच्या अहवालाकडे शहराचे लक्ष लागले आहे.

आ.रोहित पवार फुलसावंगीत,'काळी दिवाळी'त घेणार सहभाग

आत्महत्याग्रस्त जगजीवन डोंगरे कुटुंबीयांची घेणार सांत्वनपर भेट.

फुलसावंगी : नापिकी, दुष्काळी परिस्थिती आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी संकटात सापडला असताना, फुलसावंगी येथील अल्पभूधारक शेतकरी जगजीवन डोंगरे यांनी २७ ऑक्टोबर रोजी शेतातील विहिरीत उडी घेऊन जीवन संपविले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते तथा आमदार रोहित पवार शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी फुलसावंगीला भेट देणार आहेत. या दौऱ्यात ते दिवंगत डोंगरे यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतील. तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आयोजित 'काळी दिवाळी' निषेध उपक्रमात सहभागी होतील. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना, नुकसानभरपाई आणि संकटग्रस्त कुटुंबांना प्रभावी मदत मिळण्याची गरज या भेटीतून अधोरेखित होणार आहे. स्थानिक शेतकरी व ग्रामस्थ आपल्या समस्या आणि मागण्या त्यांच्यासमोर मांडणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष स्वप्नील अडकीने यांनी दिली.

माथार्जुनमध्ये देशी दारू दुकानाचा मनमानी कारभार?

१८० एमएलच्या बाटलीमागे १० रुपये जादा वसुलीचा आरोप उत्पादन शुल्क विभागाच्या तपासणीकडे लक्ष!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि. ५ : झरी तालुक्यातील माथार्जुन येथील देशी दारू दुकानात निर्धारित किमतीपेक्षा जास्त पैसे आकारले जात असल्याचा आरोप ग्राहकांकडून होत आहे. १८० एमएलच्या एका बाटलीमागे तब्बल १० रुपये अतिरिक्त वसूल केले जात असल्याची तक्रार समोर आल्याने दुकानाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बाटलीवर नमूद असलेली कमाल किरकोळ किंमत (MRP) देऊनही ग्राहकांकडून जादा रक्कम का घेतली जाते, असा सवाल उपस्थित होत आहे. प्रत्येक बाटलीमागे १० रुपये अतिरिक्त घेतले जात असतील, तर दिवसाकाठी होणाऱ्या विक्रीतून ग्राहकांकडून किती रक्कम जमा होत असेल, याची कल्पनाच न केलेली बरी! दारू विक्रीच्या नावाखाली ग्राहकांकडून अतिरिक्त पैसे घेण्याचा अधिकार दुकान चालकांना कोणी दिला? हा प्रकार केवळ किरकोळ वादाचा नसून ग्राहकांच्या आर्थिक हिताशी संबंधित आहे. संबंधित दुकानाची उत्पादन शुल्क विभागाने तातडीने तपासणी करून बाटल्यांवरील MRP आणि प्रत्यक्ष आकारल्या जाणाऱ्या किमतीची पडताळणी करावी. जादा वसुलीचा आरोप खरा आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. MRP वरच विक्री बंधनकारक असेल, तर अतिरिक्त दहा रुपयांचा हिशेब कोण देणार? प्रशासनाच्या तपासणीतून या कथित वसुलीचे सत्य समोर येणार का, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

सहकारातील यशानंतर शिवसेनेची संघटन बांधणीवर नजर!

आ.संजय देरकर सह नवनिर्वाचित संचालकांची उद्धव ठाकरे यांच्याशी भेट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



वणी, दि. ५ : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आता जिल्ह्यातील संघटनात्मक ताकद वाढविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

आमदार संजय देरकर यांच्या नेतृत्वात नवनिर्वाचित संचालक आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची सदिच्छा भेट घेतली. दिवाळीच्या निमित्ताने शुभेच्छा देत नवनिर्वाचित संचालकांनी उद्धव ठाकरे यांचे आशीर्वाद घेतले. मात्र, या भेटीला केवळ औपचारिक अभिनंदना पुरते मर्यादित न ठेवता आगामी राजकीय वाटचाल, पक्षसंघटन मजबूत करणे आणि सहकार क्षेत्रातील प्रभाव वाढविणे यावरही चर्चा झाली. यवतमाळ सह विदर्भातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि अपुऱ्या मदतीचा मुद्दाही आमदार देरकर यांनी पक्षप्रमुख समोर मांडला. शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे निर्देश उद्धव ठाकरे यांनी दिल्याचे सांगण्यात आले. यावेळी खासदार अरविंद सावंत, संपर्कप्रमुख अनिल आगळे, संचालिका किरण देरकर, संचालक सुनील कातकडे, जिल्हाप्रमुख किशोर इंगळे, राजेंद्र गायकवाड यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल,बचतीची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची!

उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली, जलसंवर्धनाचा प्रभावी संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



बाभुळगाव, दि. ५ : पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजनांची धावपळ करण्यापेक्षा पाण्याचे महत्त्व वेळीच ओळखून त्याची बचत करणे गरजेचे आहे. हाच संदेश देत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांनी बाभुळगाव येथे जनजागृती रॅली काढून नागरिकांचे लक्ष जलसंवर्धनाकडे वेधले.

'पाणी वाचवा, जीवन वाचवा' आणि 'पाणी वाचवूया, यवतमाळ जिल्हा दुष्काळमुक्त करूया' अशा घोषणांचे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी पाणी बचतीचा जागर केला. इयत्ता दुसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'पाणी हेच जीवन आहे' या विषयावर नाटिका सादर केली. तर पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी भाषणातून पाणीटंचाईची समस्या आणि जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ शासनाच्या उपाययोजनांनी पाणीटंचाईवर मात शक्य नाही. नळांची गळती रोखणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी नगरपंचायतीचे उपाध्यक्ष, नगरसेवक, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जावेद राज यांच्यासह शिक्षक व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

दारूच्या दुकानासमोर मद्यपींचा हैदोस महिला-मुलींची वाट बिकट!

नेताजी बोस चौक ते डॉ.आंबेडकर चौक दरम्यान वाहतूक कोंडी,पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. ५ : शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हा मध्यवर्ती रस्ता मद्यपींचा अड्डा आणि वाहतूक कोंडीचे केंद्र बनत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच सायंकाळी ६ ते रात्री १० दरम्यान दारूच्या दुकानासमोरील गर्दीमुळे पादचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

या मार्गावरील वाईन शॉपमधून दारू खरेदी करून काही जण रस्त्यालगतच्या सोड्याच्या गाड्यांवर आणि अतिक्रमित हातगाड्यांवर उघडपणे मद्यपान करतात. मद्यधुंद अवस्थेत अश्लील शिवीगाळ व गोंधळ घालत असल्याने महिला, मुली आणि विद्यार्थिनींना या मार्गावरून जाणे असुरक्षित वाटत आहे. विशेष म्हणजे, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दुकानगाळ्यातील देशी-विदेशी दारू विक्रीच्या दुकानांबाबतही नियमपालनाचा प्रश्न उपस्थित होत आहे. दुकानांसमोरील अतिक्रमण आणि मद्यपींच्या गर्दीमुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष नेमके कशामुळे? महिला-मुलींच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोणाची? अतिक्रमण हटवून उघड्या मद्यपानाला आळा घालण्यासाठी पोलीस आणि बाजार समिती प्रशासन ठोस कारवाई करणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

सायबर गुन्ह्यांच्या विळख्यापासून विद्यार्थ्यांना वाचविण्यासाठी महागाव पोलिसांची धडक मोहीम!

वनमालाताई राठोड महाविद्यालयात विद्यार्थी सुरक्षा, गुड टच-बॅड टच मार्गदर्शन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. ५ : डिजिटल युगात शिक्षणासोबतच सायबर गुन्हेगारीचे आव्हानही वाढत असताना विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे धडे देण्यासाठी महागाव पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. पोलीस स्टेशन महागावच्या वतीने आमणी येथील वनमालाताई राठोड कला व विज्ञान महाविद्यालयात सायबर जनजागृती व विद्यार्थी सुरक्षा मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट सोशल मीडिया अकाउंट, ओटीपीची मागणी, संशयास्पद लिंक आणि डिजिटल ब्लॅकमेलिंग यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. अनोळखी व्यक्तींना ओटीपी देऊ नये, संशयास्पद लिंक उघडू नये, असा इशारा देतानाच आपत्कालीन परिस्थितीत ११२ या हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन केले. गुड टच-बॅड टच, बालसुरक्षा, पोलीस काका उपक्रम आणि दामिनी पथकाच्या कार्याचीही माहिती दिली. अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव वनमालाताई राठोड होत्या. विद्यार्थी सुरक्षा ही केवळ शैक्षणिक संस्थेची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थिनींनी अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवावा, असे आवाहनही केले. यावेळी सुनीलभ राठोड, नंदकुमार कावळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर शिंदे यांनी केले, तर आभार विनोद राठोड यांनी मानले.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना 'मिशन उभारी'चा आधार..!

महागावात २० कुटुंबांना साहित्य वाटप मुलींच्या विवाहासाठी मंगल कार्यालय मोफत देण्याची घोषणा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. ५ : शेतकरी आत्महत्यांचे संकट कायम असताना उद्ध्वस्त कुटुंबांना पुन्हा उभे करण्यासाठी प्रशासनाने 'मिशन उभारी'च्या माध्यमातून मदतीचा हात पुढे केला. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी महागाव येथे राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून २० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मात्र, तात्पुरत्या मदतीपलीकडे या कुटुंबांना कायमस्वरूपी स्वावलंबी करण्याचे आव्हानही यानिमित्ताने अधोरेखित झाले. २०२० पासून सुरू असलेल्या या अभियानांतर्गत शासकीय योजनांचा लाभ, आर्थिक मदत आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते दोन लाभार्थ्यांना शिलाई मशीन, किराणा किट, फटाके व आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिलाई मशीनमुळे महिलांना स्वयंरोजगाराची संधी मिळणार आहे. कार्यक्रमात सतीश मंडप डेकोरेशनचे संचालक देवरकर यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी मंगल कार्यालय मोफत उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. हा सामाजिक पुढाकार विशेष लक्षवेधी ठरला. उपविभागीय अधिकारी राम मुळे अध्यक्षस्थानी होते. उपविभागीय अधिकारी ओंकार एकाळे, तहसीलदार अभय मस्के यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मदतीचा हात महत्त्वाचा; पण या कुटुंबांना नियमित रोजगार, शिक्षण आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली तरच 'मिशन उभारी'चा खरा उद्देश साध्य होईल.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

पुरातन विहिरी व जलसाठ्यांच्या पुनर्जीवन करा

दिनेश बुब यांची मनपा आयुक्तांकडे मागणी, शहरात पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर

अमरावती/का.प्र.
मनपा सह जिल्ह्यातील जलसाठ्याची वास्तव परिस्थिती लक्षात घेता नगर सेवक दिनेश बुब यांनी १९ जुलै २०१८ रोजी मंजुर केलेल्या ठरावाची अंमल बजावणी करावी अशी मागणी केली आहे. या संदर्भात नगर सेवक दिनेश बुब यांनी मनपा आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे की, शहरातील पुरातन विहिरींचे पुनर्भरण, जल साठ्यांचे जतन करण्यासाठी नागरिकांनी विनंती केली आहे.

आज संपुर्ण राज्यात सर्वाधिक तापमान अमरावतीचे असल्याचे सिद्ध होऊनही जलसाठा वाढविण्याकरिता मनपा प्रशासनाने जोरकस प्रयत्न सुरू केल्याचे दिसून येत नाही.मनपा क्षेत्रात ना घरोघरी रेन वॉटर हार्वेस्टिंग आहे, नाही घरगुती वा सार्वजनिक विहिरींचे व हातपंप आणि, तलावांचे जतन /पुनर्जीवन केले जात आहे. कित्येक ठिकाणी तुटलेल्या नळांच्या तोट्या वारंवार लावूनही त्या तुटलेल्याच राहत असल्याने पाण्याची नासाडी होत आहे. आज अमरावती शहरातील महाराष्ट्र जिवन प्राधिकरण अंतर्गत होणारा आणि, व्यर्थ जाणारा पाणीपुरवठा सोडले तर, दिवसेंदिवस वाढतच जाणारे तापमान, जीवनावश्यक पाण्याची टंचाई, खालावत चाललेली पाण्याची पातळी आणि, मर्यादित जलसाठे बघता जलसाठ्याचे



पुनर्जीवन करणे अमरावतीची गरज आहे. तेव्हा, या दृष्टीने सर्वांगीण स्तरावर विचार करून जागरूक नागरिकांना, विषयाशी संबंधित तज्ञ वर्ग, आजी माजी नगरसेवक व पदाधिकारी, माजी आमदार, खासदार यांच्या सूचनांचा विचार करून कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. त्यानंतर, विद्यमान, आमदार, खासदार, मंत्री महोदय यांचे मार्गदर्शक आदेश प्राप्तकरून पूर्वीच्या जलसाठ्यांचे पुनर्जीवन करण्यात यावे असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

वास्तविक पाहता १९ जुलै २०१८ रोजीच्या मनपाचे सर्वसाधारण सभेत मंजुर व कायम करण्यात आलेल्या ठराव क्र. ३१ सूचक दिनेश बुब, चेतन पवार नुसार कार्यवाही केली असती तर, ९ वर्षात मुबलक प्रमाणात जलसाठा उपलब्ध राहिला असता. परंतू, आजही उपलब्ध असलेले जलसाठ्यांचे पुनर्जीवन करणे आवश्यक असतांना मनपा प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे खेदाने नमूद केले आहे. जिल्ह्यातील जलसाठ्याची एकंदरीतच उपलब्ध सर्वांगीण परिस्थिती तर, अधिकच चिंतनीय असून, शहर आणि ग्रामीण भागातील उल्लेखित विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. मनपा आयुक्त यांनी मजिप्रासह झोन निहाय पाण्याची पातळी, उपलब्ध जलसाठा, एकूण खाजगी व सार्वजनिक विहिरी, हातपंप, किर्त या संदर्भात, नगर सेवक दिनेश बुब यांनी सादर केलेल्या निवेदनातील विषय आणि संदर्भाची गांभीर्यान दखल घेऊन तातडीने कार्य करावे अशी विनंती केली आहे.

एक हात मदतीचा;महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम
मरणासन्न अवस्थेतील लाठीवालेंना आधारने दिले नवजीवन

अमरावती/का.प्र.
रस्त्यावर पडून मृत्यूची वाट पाहणाऱ्या एका निराधाराला आधार केंद्राच्या टीमने जीवदान देऊन माणुसकीचे दर्शन घडवले आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत असलेले लाठीवाले यांनी अचानक रुग्णालय सोडले आणि रस्त्यावर भटकू लागले. रस्त्यावर मिळेल ते खात ते इर्विन चौक परिसरात मरणासन्न अवस्थेत पडून होते.याच दरम्यान सामाजिक कार्यकर्ते रूपम सिंग यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यांनी तात्काळ याबाबत आधार - शहरी बेघर निवारा केंद्र, बडनेरा च्या टीमला माहिती दिली.माहिती मिळताच आधार केंद्राची टीम तात्काळ घटनास्थळी, इर्विन चौक येथे पोहोचली.निवारा केंद्रात आणल्यानंतर त्यांची दाढी-कटिंग करण्यात आली, कोमट पाण्याने स्वच्छ आंघोळ घालण्यात आली आणि पोटभर गरम जेवण देण्यात आले. काही तासांपूर्वी मृत्यूच्या दारात असलेले लाठीवाले आता स्वच्छ, टापटीप होऊन आधार केंद्रात आनंदाने राहत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर आता हास्य परतले आहे.हे संपूर्ण बचाव कार्य अमरावती महानगरपालिका



आयुक्त मंगेश गोंदावले आणि उपायुक्त योगेश पिठे सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

या कार्यात आधार केंद्राच्या व्यवस्थापिका ज्योती राठोड, प्रकल्प व्यवस्थापक राजीव बसवनाथे, काळजीवाहक रोहित घोंगडे, किशोर मरकाम, विलास थोरात यांनी मोलाची भूमिका बजावली.एका मरणासन्न व्यक्तीला नवजीवन दिल्याबद्दल आधार केंद्राच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून सामाजिक कार्यकर्ते रूपन सिंग यांचेही आभार मानण्यात येत आहेत.

संक्षिप्त



नांदगाव हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी साकारले आकर्षक आकाशकंदील

नांदगाव खंडेश्वर-स्थानिक नांदगाव हायस्कूल, नांदगाव खंडेश्वर येथे दिवाळी सणानिमित्त आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आकाशकंदील निर्मिती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपक्रमात इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा व कलागुणांचा वापर करून विविध रंगांचे, आकारांचे आणि आकर्षक सजावटीचे आकाशकंदील तयार केले. पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांनी सुंदर आकाशकंदील साकारले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कलात्मकतेला व कल्पनाशक्तीला वाव मिळाला.शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करित उत्साहाला प्रोत्साहन दिले.

रोजगार मेळाव्यात ७२ उमेदवारांची प्राथमिक निवड

अमरावती-जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ३ नोव्हेंबर रोजी आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ७२ नोकरी इच्छुक उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड करण्यात आली आहे.जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावती येथे ३ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या या मेळाव्याला जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने एकूण १३२ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९० उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती दिल्या. प्रत्यक्ष मुलाखतीपूर्वी उमेदवारांना 'व्होरा टेक्नॉलॉजीस, नागपूर' कंपनीच्या प्रतिनिधींमार्फत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर उमेदवारांचे १०-१० चे गट करून गटचर्चा घेण्यात आली आणि शेवटी प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे ७२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.याप्रसंगी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, तसेच व्होरा टेक्नॉलॉजीस कंपनीचे प्रतिनिधी आनंद कुमार आणि एच.आर. मॅनेजर प्रणुती कोटांगळे उपस्थित होते. संचालन कृपा अरगुलेवार यांनी तर पंकज कचरे यांनी आभार मानले.

शंकरपट रद्द करून बळीराजाच्या मदतीसाठी ७ लाखांचा धनादेश

अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांचा पुढाकार

अचलपूर/वार्ताहर
यावर्षी अचलपूर विधानसभा मतदारसंघात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी बांधवांवर ओढवलेले आर्थिक संकट लक्षात घेता दरवर्षी आयोजित करण्यात येणारा पारंपरिक शंकरपट यावर्षी रद्द करण्याचा निर्णय अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी घेतला. आणि या आयोजनासाठी खर्च होणारी ७ लक्ष रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्याचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा केले.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ७ लक्ष रुपयांचा धनादेश आ.प्रवीण तायडे यांनी सुपूर्द केला.

परंपरा आणि उत्सव यांना निश्चितच महत्त्व आहे. मात्र दुष्काळाच्या संकटात आपल्या बळीराजाला मदतीचा हात देणे हे अधिक महत्त्वाचे असल्याचे मत आमदार प्रवीण तायडे यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या भावनेतून हा छोटासा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन आमदार प्रवीण तायडे यांनी व्यक्त केले.शंकरपटाचा उत्सव यावर्षी नाही, पण बळीराजाच्या मदतीचा संकल्प कायम असल्याचे आमदार प्रवीण तायडे यांनी सांगितले.



तिरुवनंतपुरम येथे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित अखिल भारतीय लोकलेखा समिती परिषदेला विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला. केंद्राची आणि राज्याची अर्थव्यवस्था अधिक सुदृढ करण्यासाठी आयोजित या अखिल भारतीय लोकलेखा समिती परिषदेमध्ये भविष्यातील पायाभूत सुविधांचा आढावा,शासकीय योजना, आणि विविध विकास प्रकल्पांच्या कामांना गती देण्याला घेऊन मंथन करण्यासह महत्त्वाच्या शिफारसी देखील करण्यात आल्या. या परिषदेला महाराष्ट्र लोकलेखा समितीचे अध्यक्ष - विजय वडेट्टीवार तसेच सदस्य आ. संजय खोडके, आ.अनिल परब,आणि आ. समीर कुणावार सुद्धा उपस्थित होते.

मनपातील कचरा संकलन करणारे कर्मचारी संपावर

दिवाळी समोर वेतन न मिळाल्याने आक्रोश

अमरावती/का.प्र.
महानगरपालिका क्षेत्रात कचरा संकलन व वहन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अचानक संप पुकारल्याने शहराची स्वच्छता व्यवस्था कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दिवाळीपूर्वी वेतन देण्यात यावे या मागणीसाठी कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत, त्यामुळे स्वच्छता व्यवस्था कोलमडलण्याची शक्यता आहे.कर्मचाऱ्यांनी अचानक पुकारलेल्या संपामुळे मनपामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार शहराच्या साफसफाईचा ठेका कोणार्क कंपनीला देण्यात आला आहे. या कंपनीअंतर्गत काम करणाऱ्या कचरा संकलन व वहन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या तीन महिन्यांचे वेतन देण्यात यावे या मागणीसाठी आज काम बंद आंदोलन केले. वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. येणाऱ्या दोन-तीन दिवसात दिवाळीचे सण साजरे करण्यात येत आहे. या सणाच्या तोंडावर ही कर्मचाऱ्यांची वेतन नाही झाले आहे. अशात दिवाळी कशी साजरी करणार हे प्रश्न त्यांच्या समोर उत्पन्न झाले आहे. मुलांचे शिक्षण ,कर्जाचे हप्ते भरणे यासह इतर संकट त्यांच्यासमोर उभे



आहे ,पण कंपनी याकडे लक्ष नाही देत आहे. त्यामुळे संतापलेल्या प्रभाग क्रमांक सात आणि दहा मधील कर्मचाऱ्यांनी अचानक काम बंद आंदोलन करून मनपा प्रशासन आणि कंपनी विरोधात आक्रोश प्रगट केले. कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या मुद्द्यावरून कोणार्क कंपनीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, आतापर्यंत महानगरपालिकेकडून बिल अदा करण्यात आलेले नाही. बिल न दिल्यामुळे वेतना बाबत समस्या निर्माण होत आहे. मनपा प्रशासनाने बिल न दिल्याने संकट ओढले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले. बिल निघताच कर्मचाऱ्यांचे वेतन दिले जाईल, असे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे हा विषय आता आणखीनच गंभीर झाल्याचे दिसत आहे. या संदर्भात प्रशासनाकडून काय निर्णय घेतला जातो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कोंडेश्वर येथे पाच दिवसीय निवासी धम्म संस्कार शिबीर

अंजनगाव बारी - समता सैनिक दल व शिल्पकार फाउंडेशन, अंजनगाव बारी -पार्डी सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ते ११ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत कोंडेश्वर येथील सम्राट अशोक बुद्ध विहार (बुद्धभूमी) येथे पाच दिवसीय निवासी आंबेडकरी धम्म संस्कार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.पूज्य भन्ते धम्मसार यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरात सहआचार्य एकनाथराव घुगरे व राहुल वासेकर मार्गदर्शन करणार आहेत. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये धम्मसंस्कार, वैचारिक प्रबोधन व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा उद्देश आहे. शिबिराचे उद्घाटन ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता, तर समारोप ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता होणार आहे.

प्रज्ञा प्रबोधिनीद्वारा आमला पारधी वस्तीत दीपावली मिलन

अमरावती/का.प्र.
प्रज्ञा प्रबोधिनी संस्थेच्या वतीने आमला पारधी वस्तीत दीपावली मिलन संपन्न झाले.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून कोकण विश्व संवाद केंद्र प्रमुख श्रेयस पन्नासे उपस्थीत होते.कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आमला निवासी व ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब काळे व आमला येथील नितिन अंबुलकर होते.

बाळासाहेब वानखेडे यांनी यावेळी आपले यथोचित मनोगत व्यक्त केले व प्रज्ञा प्रबोधिनीने आयोजित केलेल्या दीपावली मिलनाचे व प्रज्ञा प्रबोधिनीच्या चमुचे त्यांनी कौतुक केले.सुरवातीला मिलिंद देशपांडे यांनी जनसेवा ही ईश्वर भक्ती हे गीत सांगितले.संचालन, प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संस्थेचे उपाध्यक्ष प्रविण जोशी यांनी केले.प्रास्ताविकात त्यांनी दिवाळी सणाचे महत्व विषद केले व प्रज्ञा प्रबोधिनीच्या उपक्रमाची माहिती दिली. आमला वस्ती प्रमुख श्री व सौ.संतोष चव्हाण यांनी लक्ष्मीपुजन करून आरती संपन्न झाली.प्रमुख वक्ते, प्रमुख अतिथी यांचे स्वागत संस्थेचे सचिव मुकुंद पांडे, अध्यक्ष अविनाश देशपांडे व कोषाध्यक्ष जयंत खंदारकर यांनी पुष्पगुच्छ देवून केले.वैयक्तीक गीत रेखा देशपांडे यांनी सादर केले.दिपावली निमित्त आमला पारधी वस्तीतील नागरिक बंधू भगिनी व लहान मुले मुली यांना भेट वस्तूचे वितरण संस्थेतर्फे करण्यात आले.

कार्यक्रमास प्रज्ञा प्रबोधिनी परिवार व आमला वस्तीतील पारधी बंधू भगिनी व



बालगोपाल मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती.दीपावली मिलन यशस्वी करण्यासाठी संतोष चव्हाण व त्यांच्या चमूने परिश्रम घेतले.

अवैध देशी दारूची तस्करी करणारे दोघे ताब्यात



अमरावती/का.प्र.
शहर व ग्रामीण भागात अवैध दारू तस्करीला आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने कारवाई सुरू आहे.याच मोहिमेअंतर्गत नांदगाव पेठ पोलिसांनी अवैध देशी दारूची तस्करी करणाऱ्या दोन युवकांना अटक केली आहे.

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून २९२ देशी दारूच्या बाटल्या आणि एक टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी वाहन सह एकूण ७५ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार, ३ नोव्हेंबर रोजी नागपूर रोडवरील अजित ढाब्याजवळ पोलिसांनी सापळा रचून दोन्ही आरोपींना पकडले. आदित्य किशोर दराडे (२२) आणि अक्षय गजानन मसरस्कोले (२४, दोघेही रा. आर्वी, जिल्हा वर्धा) अटक आरोपीयांचे नावे आहेत. पोलिसांनी दोन्ही आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.ही कारवाई नांदगाव पेठचे पोलीस निरीक्षक सतीश पाटील, ओमप्रकाश देशमुख, दिनेश मंगुसमारे, राजीक खान, शोएबुद्दीन सय्यद आणि वैभव टिकिले यांच्या पथकाने केली.

विद्यापीठातील २१ संशोधकांना ५५ लक्ष रुपयांच्या निधीचे वितरण

संशोधकांनी संशोधनाव्दारे राज्य व राष्ट्रविकासात योगदान द्यावे-डॉ.अविनाश असनारे

अमरावती/का.प्र.
संशोधनाव्दारे राज्य तथा राष्ट्रविकासात संशोधकांनी योगदान द्यावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी संशोधकांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शैक्षणिक विभाग तसेच संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांच्या संशोधन कार्याला प्रोत्साहन व चालना देण्याच्या उद्देशाने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या माध्यमातून विद्यापीठातील २१ शिक्षकांना मायनर रिसर्च प्रोजेक्ट अंतर्गत ५५ लक्ष पाच हजार रुपयांचा संशोधन निधीचे वितरण करण्यात आले. सर्व लाभार्थ्यांना आयोजित



कार्यक्रमात संशोधन प्रकल्पांची मंजुरीपत्रे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलीत.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आरजीएसटीसीच्या समन्वयक तथा जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील उपस्थित होत्या. मार्गदर्शन करताना कुलसचिव म्हणाले, विद्यापीठातील संशोधन संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी आणि शिक्षकांना संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे. डॉ. अनिता पाटील म्हणाल्या, प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असून या माध्यमातून विद्यापीठाचे, महाविद्यालयाचे नाव कसे मोठे करायचे, याबर देखील संशोधकांनी भर द्यावा. सन २०२०-२१ मध्ये आरजीएसटीसीने विद्यापीठाला ५० लक्ष रुपयांचा संशोधन निधी मंजूर केला होता. या निधीतून विविध शिक्षकांना मायनर रिसर्च प्रोजेक्टसाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले. पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर आयोगाने उर्वरित ७ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. तसेच सन २०२४-२५ मध्ये वितरित करण्यात आलेल्या ५० लक्ष रुपयांच्या निधीमध्ये या रकमेची भर पडली. मागील टप्प्यात १७ लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात आला होता, तर यावर्षी २१ लाभार्थ्यांची निवड करून त्यांना संशोधनासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करून लाभार्थ्यांना मंजुरीपत्र वितरित केल्याबद्दल कुलसचिव डॉ. असनारे यांनी आरजी एसटीसीच्या समन्वयक डॉ. अनिता पाटील, विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा विलास पाटील तसेच त्यांच्या संपूर्ण चमूचे विशेष कौतुक केले. या प्रक्रियेत विकास विभागातील उच्चश्रेणी लिपिक उदय कुलकर्णी, कोमल पाटील, कोमल काळबांडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान देत संपूर्ण कामकाज सूत्रबध्द पध्दतीने पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

प्रतिकूलतेच्या प्रभावातील वसुबारस

गोवंश कृतज्ञतेसाठी श्रावणी पोळा साजरा केल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत पुन्हा गोवंश पूजन (वसुबारस) करताना मातृशक्तीचा विशेष आदर दिसून येतो. यंदाची प्रति प्रतिकूलतेच्या च्या प्रभावातील वसुबारस 'मी आप्तेष्टांसहित सहर्ष साजरी करणारच', असा दिवा मनोमनी प्रज्वलित करूया.

हिंदू संस्कृतीचा दीपोत्सव जगभर आनंदात साजरा होतो; कारण खऱ्या अर्थान मनामनात चैतन्य, उत्साह, आनंदाचे असंख्य दीप प्रज्वलित झालेले असतात. धरणी, पाऊस, पशुधन आणि विधात्याच्या कृतज्ञतेसाठी भारतीय कृषी संस्कृतीत दिवाळीची योजना अप्रतिमपणे रेखाटण्यात आली आहे. महत्त्वाच्या धनधान्याची रास, दरवर्षी प्रसूत होणारे पशुधन, वातावरणाच्या चक्रात वर्षभराचा पुरवठा करणारा पाऊस आणि संपूर्ण विश्वाचा आधार असणारा दैवी प्रभावाचा मानवी मनातील वर्षाव यांची कृतज्ञता व्यक्त करणारा सण लक्षावधी दीप प्रज्वलित करून जगभरात साजरा करण्यात येतो.

परंपरेचा सण साजरा करताना दिवाळीच्या शुभारंभाची पूजा ही नेहमी वासरू सोबत असणाऱ्या गोधनाचीच केली जाते. गोवत्स द्वादशी अथवा वसुबारस याविषयी अनेक आध्यात्मिक दाखले प्रसारित असले, तरी त्याला खरा अर्थ हा वैज्ञानिकच आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात प्रसूत होणारी गाय दोन महिन्यांनंतर सर्वोच्च दूध उत्पादनाच्या टप्प्यात असल्यामुळे आणि याच टप्प्यात ती पुन्हा प्रजनन चक्रातील अपेक्षित ऋतुकालाची सुरुवात करत असल्यामुळे कृतज्ञतेस पात्र ठरते म्हणून पूजेसारख्या आनंदोत्सवातून गौरविली जाते. या पूजनात गोवंशांकडून पुढील गर्भधारणेसाठी अपेक्षा तर वासराच्या गतिमान वाढीतून वर्षभरात पैदाशीची सक्षमता गर्भित असते.

टंचाईत आली दिवाळी

निसर्गात माती, पाणी, पशुधन यांच्याशी निगडित असणारे चक्र वेगवेगळ्या काळात घडते. यातूनच धान्य उत्पादनांचे हंगाम, पावसाळ्याचा कालावधी किंवा पशुधनातील पैदास यांची निरंतर चक्राकार गतिमानतेची प्रचिती दिसून येते. बदलत्या नैसर्गिक परिस्थितीतील पर्यावरणीय बदलास मानवी स्वीकृती आवश्यक असून, आव्हान ठरणाऱ्या प्रतिकूलतेच्या बाबी निसर्गचक्र मोठ्या प्रमाणात बाधित ठरण्यास कारणीभूत ठरत आहेत. 'एल निनो'मुळे अशाच एका प्रतिकूलतेशी सामना करण्याची वेळ आज आली आहे. ऐन दिवाळीच्या सणासमोर टंचाईचा यक्ष प्रश्न उभा असून, भविष्याच्या नियोजनासाठीच प्रत्येक मनात दीपोत्सव करणे हाच खरा सामाजिक दातृत्वाचा भाग ठरणार आहे. गोपूजन नेहमी प्रतीकात्मक असते आणि त्यात कृतीपेक्षा सद्भावनेला अधिक महत्त्व असते. प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी असणारे नियोजन शासन यंत्रणा करेलच पण राज्यात गावोगावी आणि अवतीभवती असणाऱ्या हजारो सामाजिक संस्था, संघटना आणि जागरूक समूहांनी गेल्या दोन महिन्यांपासून प्रभावीपणे सुरू केले आहे याची खात्री सर्वसामान्य शेतकरी आणि पशुपालकांनी लक्षात घेणे अमूल्य ठरणार आहे. किती रकमेचे नियोजन केले, किती निधी संकलित केला, किती अनुदान वितरित केले जाणार यांच्याबाबत विचार करण्यापेक्षा अडचणीतील प्रत्येक कुटुंबाला अपेक्षित आणि आवश्यक असणारा आधार देण्याची योजना राज्यात राबवली जाणार आहे. तेव्हा गोपूजनाच्या परंपरेला कोणीही निरुत्साही खोडा असण्याची अजिबात गरज नाही.



'कृतीतून सद्भावना' हेच पूजन

राज्यात पशुधनाच्या चारा आणि पाण्याची व्यवस्था नियोजित असल्यामुळे काही आवश्यक जबाबदाऱ्या स्वीकारणे वसुबारस पूजनात प्रत्येक शेतकरी पशुपालकाकडून गरजेचे आहे. राज्यातील आपत्ती निवारण यंत्रणा जनकल्यान जोपासण्यासाठी करत असलेल्या सर्व सूचना शिफारशी आणि मार्गदर्शन नियमावली तंतोतंत अवलंबणे उपयुक्त ठरू शकेल. यात संबंधित यंत्रणेपर्यंत संपर्क आणि पोहोचण्याची जबाबदारी स्वतःहून स्वीकारणे आवश्यक आहे. टंचाईच्या संकटाची व्याप्ती फार मोठी असल्यामुळे पशुधन जगण्यासाठी, सामान्य उदरनिर्वाहाची गरज पूर्ण करण्यासाठी, शरीर प्रकृतीत फार मोठी घट होऊ नये यासाठी पुरेशा ठरणाऱ्या उपाय योजना राबवल्या जातील मात्र व्यवसाय, उद्योग, कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत असणाऱ्या आणि त्यादृष्टीने राबविल्या जाणाऱ्या पशुधनासाठी पशुपालकाला मोठ्या प्रमाणात स्वतःचे नियोजन अवलंबणे आणि राबवणे गरजेचे ठरणार आहे. यात केंद्र शासनाने महिन्यापूर्वी जाहीर केलेल्या पशुधन विमा योजनेचा लाभ अजूनही न घेतला गेलेल्या गोठ्यांकडून तत्काळ सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. पशुधनास जगण्यासाठी चारा-पाणी अनिवार्य असले तरी त्यांची गरज प्रतिकूल वातावरणामुळे अधिकच्या प्रमाणात अजिबात वाढणार नाही याची दक्षता घेणे सहज शक्य आहे. उपलब्ध होणारा चारा योग्य प्रकारे प्रक्रिया करून, योग्य वेळी आणि शिफारस केलेल्या प्रमाणातच पुरवण्याची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारणे यातच खरी कसोटी दिसून येणार आहे. आपल्या देशात पशुधनासाठी चारा टंचाई ही बाब नवीन नाही. दरवर्षी हिरवा आणि वाळलेला चारा गरजेपेक्षा कमी प्रमाणात उत्पादन केला जातो याचा संदर्भ गेल्या पन्नास वर्षांपासून नोंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे मोठ्या टंचाईच्या काळात चारा कमी पडला तरी त्यासाठी अनंत पर्याय उपलब्ध आहेत आणि त्याबाबत सर्व दूर माहिती ठेवणे, इतरांपर्यंत पोहोचवणे याची जाणीव गरजेची आहे. उपलब्ध करण्यात येत आहे. अशी माहिती मिळवणे, संग्रही महत्त्वाची बाब अशी की, देशांतर्गत धान्य समृद्धी असताना पशुधनासाठी सकस चाऱ्याची अपूर्णता भरून काढणारा पोषक खुराक पुरवठा येणे सहज शक्य आहे, मात्र तो अधिक महाग दराने उपलब्ध असेल म्हणून वैयक्तिक आणि कुटुंब स्तरावर आर्थिक नियोजन महत्त्वाचे ठरते. सारांशाने, दुष्काळ अनेक वेळा घेतली आहे. फार मोठा प्रतिकार काळ म्हणून हा निसर्गचक्राचा भाग आहे आणि इतिहासाने त्याची नोंद मिळविण्यासाठी, इतरांना सुचविण्यासाठी आणि सामाजिक खचून जाण्यापेक्षा 'मी सिद्ध आहे' अशी भूमिका पर्याय जबाबदारी स्वीकारण्यासाठी योग्य ठरते. कोणत्याही परिस्थितीत पशुधनाची हानी होणार नाही, नियोजनात चूक होणार नाही आणि पर्याय शोधण्याचा मार्ग थांबणार नाही प्रतिकूलतेच्या प्रभावातील वसुबारस मी आप्तेष्टांसहित सहर्ष अशी भूमिका सक्षमता वाढविण्यास पूरक ठरू शकेल. म्हणून साजरी करणारच असा दिवा मनोमनीप्रज्वलित करूया.

डॉ. नितीन मार्कंडेय
९४२२६५७२५१
(लेखक ज्येष्ठ पशुतज्ज्ञ आहेत)

धनत्रयोदशी : धन, आरोग्य आणि दीर्घायुष्याचा मंगलमय संगम !

यंदा ६ नोव्हेंबर शुक्रवार या दिवशी धनत्रयोदशीचा आहे.धनत्रयोदशीचा सण आपल्याला धनसंपत्तीचा सदुपयोग करण्यासह आरोग्याचे महत्त्व आणि मृत्यूच्या भयापासून रक्षणासाठी देवतेची उपासना करण्याची शिकवण देतो. सनातन संस्थेने संकलित केलेल्या लेखातून धनत्रयोदशी संदर्भात धर्मशास्त्र जाणून घेऊन त्यानुसार सण साजरा करून धन्वंतरी देवता आणि श्री लक्ष्मी देवीची कृपा संपादन करूया.

दीपावलीला जोडून आश्विन वद्य त्रयोदशीला येणाऱ्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुवर्णालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारीवर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. धनत्रयोदशी म्हणजेच देवतांचा वैद्य 'धन्वंतरी देवता' यांची जयंती. हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते.

या दिवसाला बोलीभाषेत 'धनतेरस' असे म्हटले जाते. या दिवशी व्यापारी तिजोरीचे पूजन करतात. व्यापारी वर्ष



दिवाळी ते दिवाळी असे असते. नव्या वर्षाच्या हिशोबाच्या वह्या या दिवशीच आणून त्यांचे पूजन करून वापरात आणल्या जातात.धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन सुवर्ण विकत घेण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वर्षभर घरात धनलक्ष्मी वास करते. वास्तविक लक्ष्मीपूजनाच्या वेळी वर्षभराचा आयव्यय (जमाखर्च) द्यायचा असतो. त्या वेळी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेली संपत्ती प्रभुकार्यासाठी व्यय केल्यास सत्कार्यात धन व्यय झाल्यामुळे धनलक्ष्मी शेवटपर्यंत लक्ष्मीरूपाने रहाते. धन म्हणजे पैसा. हा पैसा घामाचा, कष्टाचा, धवलांकित असलेला आणि वर्षभरात पै-पै करून जमा केलेला असावा. या पैशाचा न्यूनतम १/६ भाग ईश्वरकार्यासाठी व्यय करावा, असे शास्त्र सांगते.'

धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन

वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे आणि साखर असे 'प्रसाद' म्हणून लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे. कडुनिंबाची उत्पत्ती अमृतापासून झाली आहे. धन्वंतरि हा अमृततत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. कडुनिंबाची पाच-सहा पाने प्रतिदिन खाल्ली, तर व्याधी होण्याची शक्यता नाही. एवढे कडुनिंबाचे महत्त्व आहे; म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

यमदीपदान-प्राण हरण करण्याचे काम यमराजाकडे आहे. मृत्यू कोणालाच चुकला नाही आणि चुकवता येत नाही; पण अकाली मृत्यू कोणालाच येऊ नये, याकरिता धनत्रयोदशीस यमधर्माच्या उद्देशाने कणकेचा तेलाचा दिवा करून तो घराच्या बाहेरच्या बाजूस दक्षिणेला तोंड करून सायंकाळी लावावा. एरव्ही दिव्याचे तोंड दक्षिणेस कधीही नसते, केवळ या दिवशी तेवढे दिव्याचे तोंड दक्षिणेस करून ठेवावे. त्यानंतर पुढील मंत्राने प्रार्थना करावी.

मृत्युना पाशदंडाभ्यां
कालेन श्यामयासह ।
त्रयोदश्यांदिपदानात्
सूर्यजः प्रीयतां मम ।।

अर्थः- धनत्रयोदशीला यमाला केलेल्या दिव्याच्या दानाने प्रसन्न होऊन त्याने मृत्यूपाश आणि दंडातून माझी सुटका करावी.

धनत्रयोदशीच्या निमित्ताने भगवान धन्वंतरी आणि श्री लक्ष्मीदेवी यांचे श्रद्धापूर्वक पूजन करून धनाचा विनियोग सत्कार्यासाठी करण्याचा संकल्प करूया. तसेच यमदीपदानाच्या माध्यमातून अकाली मृत्यूपासून रक्षण होण्यासाठी यमदेवतेला प्रार्थना करून सर्वांच्या आरोग्यपूर्ण आणि दीर्घायुषी जीवनासाठी मंगलकामना करूया.(सनातन संस्था-निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते')

विभा चौधरी
मो.७६२०८ ३१४८७

स्वदेशी पणत्यांचा प्रकाश अन् हलाल मुक्त दिवाळीचा ध्यास!

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि आसमंत उजळून टाकण्याचा सण. अंधकाररूपी दुःख, काळजी, उद्वेग दूर सारून सौख्य, भरभराट आणि चैतन्य पसरवणारा हा सण.या सणाची तयारी प्रत्येक घरात पंधरा दिवस आधीपासूनच सुरू होते.बाजारपेठेत खरेदीसाठी झुंबड उडते.बाजारात आकर्षक दिसणाऱ्या विदेशी वस्तूंचा सुळसुळाट असतो.झगमगते चायनीज लायटिंग, प्लास्टिकचे दिवे, चिनी आकाशदिवे, मेणबत्त्या. आकर्षक वाटल्या तरी त्या विदेशी, असात्विक आणि आरोग्याला हानिकारक आहेत, हे आपल्या लक्षात येत नाही.



सात्विक आणि स्वदेशीची कास का धरावी?

आरोग्यासाठी:- झगमगत्या चायनीज लायटिंगमुळे डोळ्यांना त्रास होतो, नेत्रदोष उद्भवू शकतात. प्लास्टिकच्या दिव्यांमधून विषारी धूर निघतो. तर तेला-तुपाच्या दिव्यातून निघणारी सकारात्मक ऊर्जा घरातील वातावरण शुद्ध करते. तुपाचा दिवा लावल्याने वातावरणातील जंतू नष्ट होतात, असे आयुर्वेद सांगते.

अर्थकारणासाठी आणि स्वावलंबनासाठी:- आपण खरेदी केलेल्या एका मातीच्या पणतीमुळे कुंभार बांधवाच्या घरातील चूल पेटते. एका पणतीच्या खरेदीने दोन घरची दिवाळी प्रकाशमय होते. स्वदेशी वस्तू खरेदी केल्याने आपला पैसा आपल्याच गरीब बांधवाकडे जाईल, विदेशात जाणार नाही.

पर्यावरणासाठी:- प्लास्टिकचे दिवे आणि चायनीज लाइट्स हे पर्यावरणाला घातक असून त्यातून ई-कचरा निर्माण होतो. मातीची पणती ही पंचमहाभूतांपासून बनलेली असून ती वापरानंतर मातीतच विलीन होते.

अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कारण:-पणतीतील मंद, शांत आणि सात्विक प्रकाश जो मनाला तृप्त करतो, प्रसन्न करतो, तो लाईटच्या माळांच्या लखलखाटात मिळत नाही. पणती हे मांगल्याचे, लक्ष्मीचे प्रतीक आहे. तेलाचा दिवा हा देवी लक्ष्मीला आवाहन करतो. हे चैतन्य लाईटच्या माळेत येणार नाही. म्हणूनच यंदा आपण संकल्प करूया - प्लास्टिकच्या दिव्यांऐवजी मातीच्या पणत्या, सात्विक आकाश कंदील आणि स्वदेशी, तसेच हलाल प्रमाणित नसलेल्या वस्तूंचीच खरेदी करूया. हलाल प्रमाणित उत्पादनांमुळे होणारी राष्ट्राची आर्थिक हानी थांबवण्यासाठी त्यांना नकार देऊया. तेल आणि तुपाचे दिवे लावून विजेचा अनावश्यक वापर टाळूया आणि खरी, प्रकाशमय आणि सात्विक दिवाळी साजरी करूया.

राधा पिंपळापुरे,उमरेड

भ्रष्ट व्यवस्थेवर भाष्य करणारा काव्यसंग्रह

'झिंज्या उपटलेला इंडिया'

प्रेम किंवा पानाफुलांच्या भोवती न गुरफटता भ्रष्टपणाने पोखरलेली व्यवस्था, तिचे केस उपटून बोडकेपणा आणल्याचे वास्तव मांडणारा व चिंतन करायला भाग पाडणारा काव्यसंग्रह म्हणजे ' झिंज्या उपटलेला इंडिया'. या काव्यसंग्रहाचे कवी राहुल बाबुराव चव्हाण हे बुलढाणा जिल्ह्यातील शेलगाव राऊत या गावचे कायदा सुव्यवस्थेचे जबाबदारी पार पाडणारे कर्तव्यदक्ष पोलीस पाटील आहेत. पोलीस पाटील म्हणून कर्तव्य पार पाडत असताना समाजात व व्यवस्थेच्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचा त्यांनी काव्यात्मक प्रपंच मांडला आहे.

'झिंज्या उपटलेला इंडिया' या काव्यसंग्रहात एकूण ५२ कविता आहेत. या कविता प्रेमाभोवती न फिरता माता, माती, व्यवस्था यांची करुणा मांडणारी व सामाजिक बांधिलकीची जपणूक करणारी व त्यातून समाजाचे आत्मभान जागृत करणारा काव्यसंग्रह आहे.कविता संग्रहाच्या सुरुवातीच्या कवितेत कवीने राजमाता जिजाऊ माँ साहेबांना अभिवादन केले आहे. कविता संग्रह वाचताना प्रत्येक कविता शोषित, पीडित, बळी पडलेल्या बिंदू भोवती फिरते.'प्रतिकार' या कवितेतून अत्याचाराला, वासनेला बळी पडणाऱ्या कळीचे शोषण मांडले आहे पण ती शिवरायांसारखी बेडर होऊन प्रतिकार करते यावर कवी म्हणतो.

'एक कोमल कळी एका वासनांधाच्या तावडीत सापडली लांडग्याने शेळी धरावी तशी...' ही कविता आत्मबल जागे करून जाते.

आपल्या हक्काची स्वातंत्र्याची जाणीव करून देणाऱ्या कवितेत कवी लिहितो.

'पोपटावरचा मालकी
हक्क सांगून
पोपटाला स्वातंत्र्य
देण्याची
तिची संकल्पना धुडकून
लावली
तेव्हा आपणच
पारतंत्र्यात असल्याची
जाणीव तिच्या मनाला बोचून
गेली '

प्रत्येक माणसाला पशु पक्षांना निसर्ग दत्त हा स्वातंत्र्य दिलेले असते. त्यांना कोंडून मग स्वातंत्र्य दिनाला आकाशात सोडून स्वातंत्र्य दिन साजरा करण्याची मानसिकता दर्शवली आहे. शेतकरी जीवन म्हणजे कष्टमय. असे कष्ट ओला किंवा सुखा दुष्काळामुळे कसं पाण्यात जातं याचं वर्णन कवीने 'पाण्याच्या विरहातलं शेत ' यातून मांडले आहे.

'एका पाण्याच्या विरहानं
झुरणी लागलेल शेत
विधवेच्या डोळ्यासारख
व्याकुळ
आणि भयान वाटलं '

या कवितेत व्यास्तव्या बरोबर अवतीभवतीचा निसर्ग अगदी समरस मांडला आहे. दंगल, जाळपोळ व न्याय मागण्याच्या व्यवस्थेत भरडलेले, उध्वस्त झालेल्या जीवनाची चित्तरकहाणी 'उध्वस्त वस्तीला पाहून' कवितेतून मांडली आहे.



समीक्षण

'आज
खरोखरच भेदून गेले
माझ्या पोलादी मेंदूचे
श्वास
अर्धवट जळालेल्या
प्रेताचा
दंगलीने घेतला घास'

माणूस आज कसा जाती पातीच्या धर्मांध व्यवस्थेत अडकला आहे याचे वास्तव मांडले आहे.भ्रष्ट सत्ता आणि लाचार लोकशाहीचे स्तंभ पाहिले की माणसाला न्याय मिळवण्याची अपेक्षा संपून जाते. स्वातंत्र्य गमावून गुलामीची छटा दिसू लागते ती गुलामी उध्वस्त करताना कवी 'सामान्य माणसा' कवितेत म्हणतो.

'बघ हा झिंज्या
उपटलेला इंडिया
हे भिजल्या उंदरासारखे
स्वातंत्र्य


कटकारस्थानी संसद' स्वातंत्र्य असूनही व्यवस्थेच्या निष्क्रियतेमुळे माणूस अजूनही गुलाम असल्याची जाणीव ही कविता करून देते.

कवी राहुल चव्हाण यांनी या काव्यसंग्रहातून सामाजिक बांधिलकीची लय जपली आहे. त्यातील गुरे राखताना, ही आग विझवायला हवी, भीम क्रांती, वावर, वेदनेची किंकाळी, सांगू कसा, तुला सावध करतोय, म्हातारीच्या मयताची गोष्ट, बळी सारख्या कवितेतून कवी लाचारांना जागे करण्याचे व सत्तेचे डोके ठिकाणावर आणण्याचे काव्यभाष्य करतो. कवी मनाला या कविता निश्चित पसंतीस उतरणार आहे यात शंका नाही.काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ संतोष घोंगडे व प्रमोदकुमार अणेराव यांनी बोलके तयार केले आहे. काव्यगंध प्रकाशन अहिल्यानगर यांनी पुस्तकाची बांधणी व मांडणी उत्तम केली असून प्रस्तावना प्रा. मधुकर जाधव मराठी विभाग प्रमुख व्यंकटेश महाविद्यालय बुलढाणा यांनी दिली असून प्रा.डॉ. हरिदास आखरे वाणिज्य शाखा अभ्यास मंडळ, सदस्य अमरावती विद्यापीठ यांनी काव्यसंग्रहाची पाठ राखण केली आहे. राहुल चव्हाण सारख्या ग्रामनायक पोलीस पाटील व कवी मनाच्या माणसाला पुढील साहित्य निर्मिती हार्दिक शुभेच्छा.

विठ्ठल वळसे पाटील,पुणे
मो. ८४८४०६६०४२

दानाचे महत्व सांगणारी 'धनत्रयोदशी'!

पूर्वी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेले धन धार्मिक आणि सत्कार्यात व्यय केले जात असे त्यामुळे दान करणाऱ्याच्या घरात नेहमीच धनलक्ष्मी लक्ष्मीरुपाने वास करत असे. अर्थात कमावलेले धन कोणाकडून ओरबाडून घेतलेले किंवा अन्य कोणाच्या कष्टाचे नसावे. स्वतः मेहेनत करून कमावलेले धनच फलद्रुप होते. पूर्वीचे राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्रे दान करून रिता करायचे. मंदिरांना, आश्रमांना, गुरुकुलांना, गोशाळांना आणि गरजवंतांना ते धन दान करायचे. या दानातून त्यांना अलौकिक समाधान मिळायचे. यामुळे जनता आणि राजा



यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते.

पूर्वीच्या राजांची तुलना आताच्या राजकारण्यांशी केल्यास आताचे बहुतांश राजकारणी हे केवळ स्वतःच्या आणि स्वतःच्या कुटुंबाच्या हिताला प्राधान्य देणारे असतात. जनतेची सेवा करण्यासाठी म्हणून निवडणूक लढवायची आणि निवडून आल्यावर मात्र त्याच जनतेकडे सोयीस्करपणे पाठ करायची. सत्तेची खुर्ची आली कि तिचा उपयोग आपली तिजोरी भरण्यासाठी करायचा. निवडणुकीत व्यय केलेला पैसा दहापटीने वसूल करायचा. जोपर्यंत खुर्ची आहे तोपर्यंत आपल्या पुढच्या कित्येक पिढ्या बसून खातील इतके धन गोळा करायचे. जनतेला स्वधन देणे सोडा पण विविध योजनांतून जनतेला सरकारी तिजोरीतून मिळणाऱ्या धनावर सुद्धा यांचा डोळा असतो.धनतेरस आपल्याला धनाचा संचय करण्याचा नव्हे तर सन्मार्गाने कमावलेले धन सत्कार्यात व्यय करण्याची शिकवण देते. ज्याप्रमाणे ज्ञान इतरांना दिल्याने वाढते त्याप्रमाणे सत्पात्रे दान केल्यास घरात लक्ष्मीचा वास चिरंतर राहतो. यंदा धनत्रयोदशी साजरी करताना त्यामागील अर्थ समजून घेऊन ती साजरी करूया!

जगन घाणेकर

आयुर्वेदाची कास धरा !

कार्तिक कृष्ण त्रयोदशीला आयुर्वेदाचे जनक भगवान धन्वंतरी समुद्रमंथनातून अमृत कलश घेऊन प्रकट झाले. त्यांनी देवांना अमृत देऊन अमर केले. धनत्रयोदशीच्या दिवशी दीर्घायुष्य आणि आरोग्य लाभण्यासाठी धन्वंतरी देवतेची पूजा केली जाते. निरोगी व्यक्तीच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि आणि रोग झालाच तर त्यावर उपाय करणे यासाठी आयुर्वेदाचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक व्यक्तीने न्यूनतम १०० वर्षे जगावे असे आयुर्वेद सांगतो आणि हे निरोगी जीवन जगण्यासाठी काय पथ्य पाणी पाळावे, आहार विहार कसा असावा, ऋतुमानानुसार त्यात कोणता बदल करावा याची शिकवण आयुर्वेद आपल्याला देतो. याचाच अर्थ रोगावर उपचार करण्यापेक्षा रोग होऊच नये यासाठी आयुर्वेद महत्वाचा मानला जातो. आजमितीला आजारांवर आणि रोगांवर मात करण्यासाठी जगभरात अनेक थेरपी अस्तित्वात आहेत; मात्र आयुर्वेदाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. भारतभूमी ही आयुर्वेदाची जननी आहे. प्राचीन ऋषीमुनींनी या क्षेत्रात वारेमाप संशोधन केलेले आहे. या संशोधनाचा आधार आजही आधुनिक शास्त्रज्ञ घेत असतात.



आयुर्वेदिक उपचार वेळकाढू असले तरी ते अधिक परिणामकारक आणि शरीरस्वास्थावर कोणताही विपरीत परिणाम करणारे नसल्यामुळे आज आयुर्वेदिक उपचारांना जगभरातून मागणी आहे.आयुर्वेदाचा दैनंदिन जीवनात अवलंब केल्याने माणसाचे आरोग्य सुखी, निरोगी आणि आनंदी होऊ शकते यासाठी भारतीयांनी आयुर्वेदाची कास धरावी.

नरेश घरत

■ शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

काँग्रेस नगरसेवकांचे निलंबन रद्द करा ; अन्यथा तीव्र आंदोलन !

लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न खपवून घेणार नाही - महेंद्र गवई यांचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत लोकशाही प्रक्रियेचे उल्लंघन करून काँग्रेसच्या दोन नगरसेवकांवर करण्यात आलेली १५ दिवसांच्या निलंबनाची कारवाई तातडीने रद्द करावी, अशी मागणी जिल्हा महानगर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र गवई यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मनपा आयुक्तांना निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष वेधले. निलंबनाची कारवाई मागे न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

२ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या मनपाच्या विशेष सर्वसाधारण सभेत जनहिताच्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू असताना सभागृहातील कामकाजाचे पारदर्शक चित्रिकरण करण्याची मागणी विरोधी पक्षाकडून करण्यात आली होती. मात्र, या मागणीला महापौरांनी आक्षेप घेत विरोध दर्शविला. त्यानंतर चित्रिकरणाची मागणी करणारे विरोधी पक्षनेते डॉ. जीशान हुसेन आणि ज्येष्ठ नगरसेवक फिरोज खान यांच्यावर १५ दिवसांच्या निलंबनाची कारवाई करण्यात आली.



ही कारवाई अन्यायकारक आणि एकतर्फी असून लोकशाही मूल्यांना बाधा आणणारी आहे, असा आरोप महेंद्र गवई यांनी निवेदनातून केला. महानगरपालिका सभागृह हे जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. त्यामुळे सभागृहातील कामकाज पारदर्शक असणे आवश्यक आहे. सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेला विरोध केल्यामुळे लोकप्रतिनिधींवर निलंबनाची कारवाई करणे म्हणजे जनतेच्या लोकशाही अधिकारांची गळचेपी करण्यासारखे आहे, असेही त्यांनी नमूद केले. दोन्ही नगरसेवकांचे निलंबन तातडीने रद्द करावे, लोकप्रतिनिधींना जनतेचे प्रश्न सभागृहात मांडण्याचा अधिकार अबाधित ठेवावा तसेच सभागृहाचे कामकाज पारदर्शक पद्धतीने आणि कायदेशीर तरतुदींनुसार चालवावे, अशा प्रमुख मागण्या काँग्रेसने केल्या आहेत.

यावेळी अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण, मनपा विरोधी पक्षनेते डॉ. जीशान हुसेन, ज्येष्ठ नगरसेवक फिरोज खान, आझाद खान, मोहम्मद फजलु, निलोफर सोहेल खान, शेख नावेद, फरिद पहेलवान, मोईन खान, गजानन कांबळे, योगेश थोरात, सुनील वानखडे, आकाश सायखेडे, गौस खान, यासिन भाई, बब्बु भाई यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकऱ्यांसाठी आंदोलन केल्याने विकास कामांचा निधी नामंजूर

आ. नितीन देशमुख यांचा मुख्यमंत्र्याच्या 'ओएसडी'सह भाजप आमदारावर आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत मिळावी यासाठी पश्चिम विदर्भात आंदोलन सुरु केल्याचा धसका घेत भाजपच्या एका स्थानिक आमदाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'ओएसडी'च्या मदतीने बाळापूर मतदारसंघातील रस्ते दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आलेला १० कोटी रुपये निधी रद्द केल्याचा आरोप उद्धवसेनेचे उपनेते आमदार नितीन देशमुख यांनी बुधवारी (४ नोव्हेंबर) पत्रकार परिषदेत केला.



बाळापूर मतदारसंघातील जिल्हामार्ग, इतर जिल्हामार्ग तसेच ग्रामीण रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी जीवघेणे खड्डे पडले आहेत. यामुळे मतदारसंघातील जनतेला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. याच परिस्थितीमुळे मागील सात वर्षांत ८५१ अपघात घडल्याची अधिकृत आकडेवारी आमदार देशमुख यांनी सादर केली. या अपघातांमध्ये तब्बल ३३४ निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडले असून, ११० जण गंभीर जखमी झाले आहेत. ही बाब लक्षात घेता, आमदार देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मतदारसंघातील रस्त्यांची दुरुस्ती, मजबुतीकरण व नूतनीकरणासाठी किमान १५० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्याची मागणी केली होती. पहिल्या टप्प्यात १३ कोटी रुपये देण्याची मागणी केली असता, मुख्यमंत्र्यांनी १० कोटी मंजूर केले. मात्र गत आठवड्यात हा निधी अन्य जिल्ह्यातील कामांवर वळता करत बाळापूर मतदारसंघातील प्रस्तावित कामांवरील मंजूर निधी रद्द केल्याचे आमदार नितीन देशमुख यांनी सांगितले. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन वस्तुस्थिती त्यांच्या लक्षात आणून देण्यात येईल, असेही आ. देशमुख म्हणाले. पत्रकार परिषदेला जिल्हाप्रमुख मुकेश मुरुमकार, शहरप्रमुख आशिष गावंडे, अकोला पूर्वचे शहरप्रमुख राहुल कराळे, जिल्हासंघटक भूषण भिरड, तालुकाप्रमुख संजय भांबेरे आदी उपस्थित होते.

स्वीय सहायकाला हाताशी धरून कारस्थान

मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक विद्याधर महाले यांना हाताशी धरून जिल्ह्यात स्वतःला विकास महर्षी म्हणून घेणाऱ्या भाजपच्या एका आमदाराने बाळापुर मतदार संघातील रस्ते दुरुस्तीचा निधी रद्द केल्याचा आरोप आमदार देशमुख यांनी यावेळी केला. भाजपकडून दिली जाणारी उमेदवारी बाजूला सारून या नेत्याने विधानसभा निवडणूक लढवून दाखवावी, जनता जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असे आमदार देशमुख म्हणाले.

या रस्त्यांचा निधी केला रद्द

बाळापूर मतदारसंघातील मनसगाव-निंबा-निमकर्डा ४ कोटी रुपये, माझोड ते आलेगाव ३ कोटी ५० लाख, तसेच दिग्रस-देऊळगाव-घाटबोरी २ कोटी ५० लक्ष असा एकूण १० कोटींचा निधी रद्द करण्यात आला आहे.

...तर शिवेंद्रराजे भोसले यांच्या दालनात आंदोलन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विदर्भात त्यांच्याच पक्षातील आमदारांकडून बदनाम केले जात आहे. विकास निधीच्या मुद्द्यावर बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी तोडगा न काढल्यास मंत्रालयातील त्यांच्या दालनात मतदारसंघातील सरपंचांना सोबत घेऊन आंदोलन छेडण्याचा इशारा आमदार देशमुख यांनी दिला.

पाण्याचा अपव्यय करणाऱ्या चार बांधकाम व्यावसायिकांना २० हजारांचा दंड !

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांविरुद्ध महापालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. उत्तर झोनअंतर्गत आकोट फैल परिसरातील सोळाशे प्लॉट आणि औरंगजेब कॉलनी येथे पाण्याचा अपव्यय करणाऱ्या चार बांधकाम व्यावसायिकांवर प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे एकूण २० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार शहरात झोननिहाय पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकांकडून पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर लक्ष ठेवून दंडात्मक कारवाई केली जात आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी उत्तर झोनमधील कारवाईदरम्यान गफ्फार शहा, रियाज खान, इमरान खान आणि अब्दुल जलील या चार बांधकाम व्यावसायिकांकडून पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळून आले. त्यानुसार प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. सहायक आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पथकात वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार, रौशन अली, स्वच्छता निरीक्षक मोहम्मद अलीम, मोहम्मद आसिफ, जितेंद्रनाथ गोराणे, जोगेंद्र खरारे, रवी माहोत तसेच कनिष्ठ अभियंते पियुष बंगाले आणि प्रतीक पांडव यांचा समावेश होता.

उत्तर झोनमध्ये मनपाची कारवाई; प्रत्येकी पाच हजारांचा दंड



पाणी वाया घालविल्यास नागरिकांनी कळवावे!

दरम्यान, संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता नागरिकांनी पिण्याचे पाणी आणि भूजलाचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. शहरात पाण्याची पाइपलाइन फुटणे, सार्वजनिक अथवा खासगी बांधकामासाठी महापालिकेचे पाणी किंवा बोअरवेल-विहिरीतील भूजलाचा अनावश्यक उपसा, वाहन धुण्याचे वॉटर सर्व्हिसिंग सेंटर सुरू असणे तसेच आरओ प्लांटवर महापालिकेच्या पाण्याचा वापर होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी ०७२४-२४३४४१२ या क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

'प्रभात'चे मोक्षदा, अंश व पियुषाची रायफल शूटिंगमध्ये राज्यस्तरावर निवड!

अकोला : प्रभात किड्स स्कूलच्या तीन खेळाडूंनी विभागस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले असून, त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ४ ऑक्टोबरदरम्यान विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे विभागस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या ओपन साइट गटात मोक्षदा रसाळे हिने तृतीय क्रमांक पटकावला, तर मुलांच्या गटात अंश तारकस याने द्वितीय क्रमांक मिळविला.



रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकणाऱ्याला १० हजारांचा दंड

वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याने मनपाची कारवाई; पूर्व झोनच्या पथकाची धडक



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील रस्त्यांवर बांधकाम साहित्य टाकून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध अकोला महानगरपालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. शास्त्रीनगर परिसरात रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवणाऱ्या बांधकामधारकाला मनपाच्या पूर्व झोन पथकाने १० हजार रुपयांचा दंड ठोठावला.

शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर बांधकाम साहित्य टाकल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्यासोबतच नागरिकांनाही त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर गुरुवारी, ५ नोव्हेंबर रोजी पूर्व झोनअंतर्गत तपासणी करण्यात आली. यावेळी शास्त्रीनगर येथील किशोर शर्मा यांनी बांधकाम साहित्य रस्त्यावर ठेवल्याचे आढळून आले. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने मनपा पथकाने त्यांच्यावर १० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली. सहायक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार, नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंता राहुल राऊत आणि स्वच्छता निरीक्षक सुनील कंडेरा यांचा पथकात समावेश होता.रस्ते सार्वजनिक वापरासाठी असून, त्यावर बांधकाम साहित्य ठेवून अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे मनपा प्रशासनाच्या या मोहिमेतून स्पष्ट झाले आहे.

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७९२/२०२६ प्रोसेस नं.१३५३४/२०२६
चौ.ता. ०५/१२/२०२६ दिनांक : २२/१०/२०२६

अर्जदार : १. अनिल मधुकर वाघ २. कमलाबाई मधुकर वाघ अर्जदार क. १ व २ रा. खरप रोड, पंचशिल नगर, खरप वीके, शिवाजी पार्क, ता. जि. अकोला. ३. शालुबाई प्रल्हाद गवई रा. मिलींद नगर, पातुर, ता. पातूर, जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.

मयताचा पत्ता :- मयत : मधुकर तुकाराम वाघ

पत्ता :- रा. खरप रोड, पंचशिल नगर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे को, मयत मधुकर तुकाराम वाघ यांचे दि. ०७/०४/२०२२ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८५४/२०२६ प्रोसेस नं.१४२४४/२०२६
चौ.ता. १०/१२/२०२६ दिनांक : ०४/११/२०२६

अर्जदार : १. गजाना शिवनाथ इंगळे २. आशा शिवनाथ इंगळे क. १ व २ रा. शिव व्दारका श्याम कॉलनी, खेतान नगर, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला. ३. अशोक शिवनाथ इंगळे रा. न्यू खेतान नगर, गजानन महाराज मंदिराजवळ, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. शिवनाथ चांगोजी इंगळे २. व्दारकाबाई शिवनाथ इंगळे

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, शिवनाथ चांगोजी इंगळे यांचे दि. १५/०२/२००१ रोजी व व्दारकाबाई शिवनाथ इंगळे यांचे दि. १३/११/१९८५ अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १० / १२ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १० / ११ / २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

विघमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट.

कि फौ अर्ज क्रमांक ३०६/२०२६ चौता २६/११/२०२६

अर्जदार :- अब्दुल जमीर अब्दुल कदीर रा. अकबरी प्लॉट, आकोट

विरुध्द

गैरअर्जदार : मुख्याधिकारी नगर परिषद आकोट

या न्यायालयात अर्जदार अब्दुल जमीर अब्दुल कदीर यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला की, अर्जदाराचे स्वत: नामे अब्दुल जमीर अब्दुल कदीर यांचा जन्म दिनांक ०१/०७/१०६९ रोजी अकोट ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता अजा दिनांक: ५/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र - सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८४०/२०२६ प्रोसेस नं.१४१४२/२०२६
चौ.ता. १५/१२/२०२६ दिनांक : ०४/११/२०२६

अर्जदार : १. रत्ना शेषराव इंगळे लग्नाआधीचे नाव रत्ना जयराम मोहाडे रा. वार्ड नं. २, व्ही. टी. सी. कापशी रोड, ता. जि. अकोला २. राजकन्या प्रदीप धांडे लग्नाआधीचे नाव राजकन्या जयराम मोहाडे रा. भानुदास राउत यांच्या घराजवळ, माधव नगर, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयताचा पत्ता :- मयत : १. जयराम सिताराम मोहाडे रा. अंबाशी पो.विवरा ता. पातुर जि. अकोला. २. जयवंतीबाई जयराम मोहाडे रा. रा. महाकालीनगर, हरिहरपेठ अकोला ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जयराम सिताराम मोहाडे यांचे दि. ०२/०२ / २०२२ रोजी अंबाशी ता. पातुर, जि. अकोला येथे व जयवंतीबाई जयराम मोहाडे यांचे दि. १३/०६/२०२३ रोजी हरिहरपेठ, महाकालीनगर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८५१/२०२६ प्रोसेस नं.१४१५०/२०२६
चौ.ता. २४/१२/२०२६ दिनांक : ०४/११/२०२६

अर्जदार : १. राजश्री विनोद कळसकार २. जयेश विनोद कळसकार ३. चैतन्य विनोद कळसकार सर्व रा. बी. ३४, गजानन वाटीका, खडकी, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही

मयताचा पत्ता :- मयत : १. विनोद प्रल्हादराव कळसकार

पत्ता :- रा. बी ३४, गजानन वाटीका, खडकी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, विनोद प्रल्हादराव कळसकार यांचे दि. २५/०५/२०२६ रोजी अमरावती येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४ / १२ / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४ / ११ / २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

विद्यमान जिल्हा न्यायाधीश - २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

Guardian Wards No. 745/2026 प्रोसेस नं.४०५०/२०२६
Fix for: 16/12/2026 दिनांक : ०४/११/२०२६

1) Priya Wd/o Anand Bansod, 2) Samarth S/o Anand Bansod,
Through Natural Guardian No. 1 the mother of minor Son No. 2, R/o House No. 49/2/24, Utkarsh Gruhnirman Sanstha, Veer Hanuman Nagar, West of Ambejogai Road, Railway Station Road, Latur, Tq. and Dist. Latur.

--Vrs--

Nil

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'PETITION U/S 7, 8 R/W SEC. 29 OF GUARDIANSHIP AND WARDS ACT 1890 R/W. दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १६/१२/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १६/१२/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक ०४ माहे नोव्हेंबर सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

तहसिलदार अकोला यांचे कार्यालय ता.जि. अकोला

क्र. प्रस्तु- ३/काबि-४२४९/२०२६ दिनांक - २९/१०/२०२६

जाहीरनामा

मौजे म्हातोडी ता.जि. अकोला येथील सर्व लोकांना सुचीत करण्यात येते की अर्जदार सुनिता बापुराव खेडकर रा. करतखेड ता. दर्यापुर जि.अमरावती यांचा विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असुन त्यांनी मौजे म्हातोडी येथील गट क्र. १२२ व गट क्र. २०० या शेतीमधील महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ८५ नुसार सामाईक शेतजमीन मधील सामाईक हिस्याची वाटणी करुन मिळणेबाबत प्रकरण दाखल केले आहे. सदर नमुद गट क्रमांक मधील वाटणी खालीलप्रमाणे.

अ.क्र.	खातेदार	गट क्र. १२२	पो.ख.	गट क्र.२००	पो.ख.
१	सुनिता बापुराव खेडकर	०.२४	०.०२	०.३९	०.०१
२	निला अरुण जामनिक	०.२४	०.०३	०.४०	०.००
३	शिला दिपक चेचरे	०.२५.	०.०३	०.४०	०.०१
४	कामिनीबाई मारोती भांडे	०.२५	०.०२	०.४०	०.०१
५	संगीता बाळकृष्ण थोरात	०.२५	०.०२	०.४०	०.००
६	राजेंद्र मारोती भांडे	०.२५	०.०२	०.४०	०.०१
	एकूण क्षेत्र	**१.४८ हे. आर.**	**०.१४ हे. आर.**	**२.३९ हे. आर.**	**०.०४ हे. आर.**

तरी याबाबत ज्यांना हरकत/आक्षेप घ्यावयाचा असेल त्यांनी सदर जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत तहसिल कार्यालय अकोला यास लेखी हरकत / आक्षेप अर्ज सादर करावा, मुदतीनंतर प्राप्त हरकत / आक्षेपाची नोंद घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

निवासी नायब तहसिलदार, अकोला

जाहीर नोटीस

वि.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम श्रेणी पातूर, यांचे न्यायालयात

एम.सी.सी. नं. १८१ / २०२६ चौ. ता. १९ / १२ / २०२६

अर्जदार : सुधिरचंद्र त्रंबक महानकर वय अं. ७४ वर्ष, धंदा - शेती रा. आलेगांव ता. पातूर जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निबंधक / सचिव जन्म मृत्यू नोंदणी विभाग, ग्रामपंचायत आलेगांव ता. पातूर जि. अकोला.

अर्जदार सुधिरचंद्र त्रंबक महानकर वय अं. ७४ वर्ष, धंदा - शेती रा. आलेगांव ता. पातूर जि. अकोला, याने वि न्यायालयात अर्जदाराने त्याच्या जन्माची नोंद करणेबाबत प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार नामे सुधिरचंद्र त्रंबक महानकर हयाचा जन्म दि. ०७/०२/१९५२ रोजी आलेगांव ता. पातूर जि. अकोला येथे झाला. अर्जदाराने त्याच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी वि. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, सदर अर्जाविरूध्द कोणालाही काही आक्षेप घ्यायचा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः किंवा निर्देशित वकीलामार्फत मूळ कागदपत्रासह दि. १९/१२/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे न राहील्यास अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल. आज दि. ०४/११/२०२६ रोजी माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले.

पातूर
दिनांक : ०४/११/२०२६

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, पातूर

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मतदारांनी प्रारुप यादीत नावे तपासून आक्षेप, हरकती असल्यास दाखल करावे-विजयलक्ष्मी बिदरी

मतदार यादी निरिक्षकांनी घेतला एसआयआरचा आढावा

वर्धा/जनमाध्यम

मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याची प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. एकही पात्र मतदार यादीतून वगळू नये यासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप यादीत मतदारांनी आपली नावे तपासावी. त्यात काही दुरुस्ती, बदल, समावेश असल्यास तसे आक्षेप, हरकती मुदतीत सादर करावे. राजकीय पक्षांनी देखील यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मतदार यादी निरिक्षक तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात श्रीमती बिदरी यांनी मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, निवडणूक उपजिल्हाधिकारी अनिल गावीत, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे यांच्यासह सर्व मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

मतदार यादी अधिकाधिक शुद्ध, अद्ययावत करण्याचे निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे हा विशेष कार्यक्रम घेण्यात आला. त्यानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी केलेल्या पडताळणी प्रमाणे मतदार यादीचे प्रारुप तयार करून प्रसिध्द करण्यात आले आहे. ही यादी जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी कार्यालये तसेच ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करण्यात आली आहे. मतदारांनी आपले नाव यादीत असल्याची खात्री करावे. नावात, मतदान केंद्रात किंवा अन्य बदल



असतील किंवा नव्याने नाव समाविष्ठ करावयाचे असल्यास आवश्यक नमुन्यातील अर्ज भरून दावे सादर करावे, असे बिदरी म्हणाल्या.

मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करावे. विशेषत: महिला, दिव्यांग, पारधी बेडा, बंजारा तांडा, भटक्या समाजातील नागरिकांचे वास्तव्य असलेली ठिकाणे अशा ठिकाणी प्राधान्याने शिबिरे घेण्यात यावी. कुटुंबातील सर्वच व्यक्तींची नावे एका मतदान केंद्रावर राहतील, असे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.

प्रारुप यादी प्रसिध्द झाल्यानंतर दाखल होणारे दावे, हरकतींवर गतीने आणि स्थानिक स्तरावरच सुनावणी घेण्याच्या सूचना मतदार यादी निरिक्षकांनी केल्या.

सुरुवातीस जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी प्रारूप मतदार यादीची माहिती दिली. या यादीत ९ लाख ५९ हजार ६४ मतदारांचा समावेश आहे. १ लाख ७८ हजार १७८ मतदारांचे अर्ज विविध कारणाने जमा होऊ शकले नाही. नव्या रचनेप्रमाणे जिल्ह्यात १ हजार ३१३ मतदान केंद्र राहणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक

मतदार यादी निरिक्षक तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी यावेळी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत देखील बैठक घेतली. सर्व पक्षांना प्रारूप मतदार यादी देण्यात आली आहे. पक्षांनी यादीचे निरिक्षण करून यादी अधिक उत्तम करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे. प्रारूप यादीवर सादर होणारे दावे, हरकतींवर सुनावणी घेतांना राजकीय पक्ष, बीएलएंनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा करत त्यावर कारवाई करण्याच्या सूचना केल्या.

सहा महिन्यांपासून ग्रामपंचायतीला कुलूप; गावकऱ्यांना पाण्यासाठी वणवण

कर्मचाऱ्यांचे वेतन थकल्याने पाणीपुरवठाही बंद,ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

आष्टी (शहीद)/जनमाध्यम

गावाच्या विकासाचा कारभार सांभाळणारी ग्रामपंचायतच सहा महिन्यांपासून कुलूपबंद असेल, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कुणाकडे? आष्टी तालुक्यापासून अवघ्या आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या किन्हाळा ग्रामपंचायतीची अवस्था सध्या अशीच झाली आहे. ग्रामपंचायत कार्यालय नियमित उघडत नसल्याने नागरिकांची कामे रखडली आहेत, अधिकारी गावात उपलब्ध होत नाहीत आणि आता कर्मचाऱ्यांचे वेतन थकल्याने गावाचा पाणीपुरवठाही ठप्प झाला आहे. प्रशासनाच्या या भोंगळ कारभारामुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून ग्रामपंचायत कार्यालय बंद राहत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. घरपट्टी, पाणीपट्टी भरण्यासह विविध कामांसाठी नागरिक कार्यालयात चकरा मारत आहेत. मात्र, प्रत्येक वेळी कार्यालयाला कुलूप पाहून त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. ग्रामपंचायत अधिकारी



नेमके गावात कधी येतात, नागरिकांच्या समस्या कोण ऐकणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

परिणामी ऐन दिवाळीच्या काळात ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. एका बाजूला बंद कार्यालय आणि दुसऱ्या बाजूला ठप्प पाणीपुरवठा, अशा दुहेरी संकटात गावकरी सापडले आहेत, यासंदर्भात ग्रामपंचायत अधिकारी अक्षय काकपुरे यांच्याशी संपर्क साधला असता, ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. पंचायत समिती आष्टी येथे कामानिमित्त दररोज जावे लागत असल्याने आपण बेपत्ता असल्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, निधी अभावी कर्मचाऱ्यांचे वेतन थकणे आणि त्याचा फटका थेट गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्यावर बसणे, ही गंभीर बाब आहे. निधीची अडचण असेल तर त्यावर उपाययोजना करण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

माजी ग्रामपंचायत सदस्य प्रदीप पाथरे यांनी या कारभाराविरोधात आवाज उठविला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून ग्रामपंचायत कार्यालय सतत बंद राहत असल्याचा त्यांचा आरोप आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना फोन केला असता प्रतिसाद मिळत नाही. घरपट्टी आणि पाणीपट्टी भरायची असल्याने वारंवार कार्यालयात चकरा माराव्या लागतात. मात्र, प्रत्येक वेळी कुलूप पाहून परतावे लागते, अशी व्यथा त्यांनी मांडली. ग्रामपंचायत कार्यालय नियमित सुरू करावे, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे आणि गावाचा पाणीपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

संक्षिप्त

डॉ. बालाजी चिरडे यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती

वर्धा- महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील



सहयोगी प्राध्यापक डॉ. बालाजी चिरडे यांची वर्धा जिल्हास्तरीय समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्यामार्फत यासंदर्भातील अधिकृत नियुक्ती आदेश जारी करण्यात आला आहे.महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या २७ जानेवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून डॉ. बालाजी चिरडे यांच्यासह शैलेश सुरेशराव देहाडराय आणि शिवाजी अडसड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. चिरडे हे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिदो-कान्हू मुर्मू दलित व आदिवासी अध्ययन केंद्रात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. इतिहास, सामाजिक-सांस्कृतिक अध्ययन आणि संशोधन क्षेत्रातील त्यांच्या शैक्षणिक कार्याच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.डॉ. चिरडे यांच्या नियुक्तीबद्दल विद्यापीठातील सहकारी, शिक्षक, संशोधक आणि मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

आधार व स्वयंम योजनेसाठी अर्ज करण्यास १५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

वर्धा- शासकीय वसतीगृहासाठी पात्र असलेल्या तथापी गुणवत्तेनुसार व वसतीगृहाच्या क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याकरीता १५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर बिगर व्यावसायिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर पर्यंत https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावे.सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील रिक्त असलेल्या जागांवर प्रवेश देण्यासाठी महाआयटीतर्फे ऑनलाईन प्रणाली राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना ओटीपी पडताळणी पूर्ण करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालकांनी कळविले आहे.

डोळ्यांवर घातक परिणाम करणाऱ्या लेझर लाईटवर प्रतिबंध

वर्धा- जिल्ह्यामध्ये आगामी काळात दहीहांडी, पोळा, तान्हा पोळा व सार्वजनिक गणेशोत्सव साजरे होणार आहे. या सण उत्सव दरम्यान मोठ्या प्रमाणावर लेझर लाईटचा वापर केला जातो. या लाईटचा प्रकाश मानवी डोळ्यांसाठी घातक असून मिरवणूक पाहण्यासाठी आलेल्या नागरिक भाविकांच्या डोळ्यावर याचा प्रकाश पडल्यास डोळ्यांच्या पडद्यावर तसेच बुबुळावर गंभीर इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे दि.२८ सप्टेंबर पर्यंत या लाईटच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शांतता व कायदा व सुव्यस्था अबाधित राखण्यासाठी आगामी सण उत्सवाच्या कालावधीत २८ सप्टेंबर पर्यंत जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी वान्मथी सी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ कलम लागू करुन लेझर लाईट वापरावर प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर आदेश जिल्ह्यात दि.४ सप्टेंबर ते दि.२८ सप्टेंबर पर्यंत आगामी सण दहीहांडी, पोळा, तान्हा पोळा व सार्वजनिक गणेशोत्सव या कालावधीसाठी राहणार असून या कालावधीत लेझर लाईट, हाय पॉवर बीम, लेझर शो यांच्या वापरावर प्रतिबंध राहणार आहे. सदर आदेशाची नागरिकांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेशात नमुद करण्यात आले आहे आहे.

संविधान वाचले तरच लोकशाही टिकेल,अन्यथा स्वातंत्र्याचा अर्थच संपेल-डॉ.विश्वंभर चौधरी

वर्धा/जनमाध्यम

लोकशाही ही केवळ निवडणुका घेण्याची व्यवस्था नसून स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या मूल्यांवर उभी असलेली व्यवस्था आहे. मात्र, सध्याच्या काळात लोकशाही मूल्यांवर आघात करून तिचा मूळ गाभाच संपविण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू आहे. गेल्या १२ वर्षांत देशातील लोकशाही संस्था आणि संविधानिक मूल्यांवर सातत्याने घाव घातले जात असल्याचा घणाघात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी यांनी केला.

प्रा. दिनकरराव मेघे स्मृती व्याख्यानमालेच्या १९ व्या पुष्पात ते बोलत होते. भारतीय संविधानाने देशाला सार्वभौम,



समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य म्हणून अधोरेखित केले आहे. प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा अधिकार दिला आहे. मात्र, या मूलभूत मूल्यांनाच आज आव्हान दिले जात आहे, असे डॉ. चौधरी म्हणाले.

केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना त्रास देणे, स्वायत्त संस्थांवर दबाव आणणे आणि लोकशाही प्रक्रियेत हस्तक्षेप करणे, हे गंभीर प्रकार आहेत. त्यातही निवडणूक आयोगासारख्या महत्त्वाच्या संस्थेच्या गैरवापरातून निवडणूक प्रक्रियेवर नियंत्रण मिळवून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न हा लोकशाहीसाठी सर्वाधिक धोकादायक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, या परिस्थितीविरोधात नव्या पिढीतील 'जेन झी' आणि राहुल गांधी यांनी आवाज उठवून बदलाची प्रक्रिया सुरू झाल्याचे दाखवून दिले आहे. त्यामुळे सध्याचे सरकार जाणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लोकशाहीच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरा

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना विजयजी तांबे यांनी लोकशाही आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी आता केवळ चर्चा करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून विरोध करण्याची वेळ आली असल्याचे आवाहन केले.

यावेळी ट्रस्टच्या वतीने २० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अध्यक्ष सविता मेघे यांचा डॉ. नामदेव बेलसरे यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. मंचावर ॲड. प्रकाश मेघे आणि खा.अमर काळे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी खासदार तथा दिनकरराव मेघे यांचे लहान बंधू स्व. दत्ताजी मेघे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.आभा मेघे यांनी संपादित केलेली चित्रफीत यावेळी सादर करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत डॉ.अभ्युदय मेघे, रवी मेघे, माधुरी मेघे, सुनील गायकवाड आणि ऋतुजा भोयर यांनी केले. प्रास्ताविक किरण मेघे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मनीषा मेघे यांनी करून दिला. पल्लवी पुरोहित यांनी संचालन केले, तर राजेश बालसराफ यांनी आभार मानले. व्याख्यानाला वर्धेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रवींद्र रोकडे, पीयूष कोल्हे, राजेंद्र कोरडे, सुशांत वानखेडे, मोनाली वंजारी, पायल, पूजा काटे, भाग्यश्री, अमर दीक्षित आणि गणेश यांनी सहकार्य केले.

इंद्रप्रस्थ महाविद्यालयात दिवाळी प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

विद्यार्थिनींच्या कलाकौशल्यातून आत्मनिर्भरतेचा संदेश मान्यवरांनी केले कौतुक

वर्धा/जनमाध्यम

दीपावलीचे औचित्य साधून इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये गृह अर्थशास्त्र व फॅशन डिझाइन विभागाच्या वतीने दिवाळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रा. कांचन भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रदर्शनाला नागरिक, विद्यार्थी आणि मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रदर्शनाचे उद्घाटन युवा कार्यक्रम अधिकारी सुहास भड,डॉ. सीमा लेले, डॉ. अंजली पुजारी,माजी प्राचार्या डॉ. वंदना पळसापुरे, प्राचार्य डॉ. आशिष ससनकर आणि कला विभागप्रमुख डॉ. प्रशांत कडवे यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाले. प्रदर्शनात विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेले आकर्षक मातीचे दिवे, पणत्या, कागदी, जूट व कापडी पिशव्या, देवपूजेची नक्षीदार वस्त्रे तसेच विविध दिवाळी फराळाचे पदार्थ विक्रीसाठी मांडले होते. पर्यावरणपूरक वस्तूंसह हस्तकलेच्या साहित्याने प्रदर्शनाचे विशेष आकर्षण वाढविले.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रदर्शनाला भेट देत विद्यार्थिनींच्या कलाकौशल्याचे कौतुक केले. त्यांनी वस्तूंची खरेदीही केली. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना व्यावसायिक कौशल्य आणि उद्योजकतेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनविणे आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा प्रदर्शनाचा उद्देश असल्याचे प्रा. कांचन भोयर यांनी सांगितले. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्राजक्ता गावंडे, प्रा. अर्चना तिकट आणि विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

दुष्काळी स्थितीत शासनाच्या जबाबदारीवर बलिमहोत्सवात मंथन

८ नोव्हेंबरला किसान अधिकार अभियानाचा १९ वा वार्षिक महोत्सव

वर्धा/जनमाध्यम

किसान अधिकार अभियानाच्या वतीने रविवार, ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मगनवाडी येथील स्वदेशी भवन परिसरात १९ व्या 'बलिमहोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. यंदा वर्तमान दुष्काळी परिस्थितीत शासन आणि समाजाची जबाबदारी या विषयावर विचारमंथन होणार आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, महिला, गरजू समाजघटक, पाणी, पर्यावरण आणि वन्यजीवांच्या प्रश्नांवर या महोत्सवात चर्चा केली जाणार आहे. प्रबोधनपर गीते, लोकगीते, परिवर्तनवादी पोवाडे आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन हे कार्यक्रमाचे आकर्षण राहणार आहे. यावेळी कृषी उद्योजक इरफान अली यांच्यासह प्रवीण पोकळे, मिलिंद भानसे, राजू लोखंडे, कमलेश डगवार, मंगला बोरजे, ज्ञानेश्वरराव ढगे आणि सुरेशराव लटारे यांचा शेती क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मान करण्यात येणार आहे. डॉ. सचिन पावडे, हरीष इथापे, प्रा. नूतन माळवी, वैभव लहाने आणि अरविंद उपरीकर मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून देवळीच्या नगराध्यक्ष किरण ठाकरे, वर्ध्याचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान अधिकार अभियानचे मुख्य प्रेरक ॲड. अविनाश काकडे राहणार आहेत. संयोजक प्रा. प्रवीण भोयर असून, महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन अभियानचे अध्यक्ष सुदाम पवार यांनी केले आहे.

चाकूने वार करून सावत्र मुलाने वडिलांना धमकांवले

वर्धा- घर खाली करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून सावत्र मुलाने एका ५७ वर्षीय व्यक्तीवर चाकूने वार केल्याची घटना ४ नोव्हेंबर रोजी रात्री २ वाजताच्या सुमारास रेल्वे स्टेशन परिसरात घडली. मोहम्मद अकबर शेख वजीर (५७, रा. बाळे यांच्या मागे, स्टेशन फैल) असे जखमीचे नाव आहे. शेख रिजवान शेख इस्माईल (रा. अटलबिहारी वाजपेयी नगर) असे आरोपीचे नाव आहे. अकबर शेख हे पहिल्या पत्नीसोबत चहा पिऊन घरी परतले असता आरोपी घराजवळ शिवीगाळ करीत होता. घराबाहेर जात असताना आरोपीने हातातील चाकूने त्यांच्या डाव्या खांद्यावर वार केला. यात ते जखमी झाले. आरडाओरड होताच आरोपी पळून गेला. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीसाठी उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु

आदिवासी विकास विभागाकडून वेळापत्रक जाहीर

वर्धा/जनमाध्यम

आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क (अराजपत्रित) पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया ३ सप्टेंबर पासून सुरू झाली. यासंदर्भातील सविस्तर जाहीर सूचना व वेळापत्रक नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर अपर आयुक्तकार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार संपूर्ण पडताळणी प्रक्रिया ५ सप्टेंबर पर्यंत पार पडणार आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या २४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून मुलाखतीशिवाय निवड झालेल्या प्राथमिक शिक्षक- ९२७, माध्यमिक शिक्षक- ४२१ आणि उच्च माध्यमिक शिक्षक- २५२ अशा एकूण १६०० उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. त्यात पेसा क्षेत्रातील ४५९ तर नॉन-पेसा क्षेत्रातील ११४१ उमेदवारांचा समावेश आहे. संबधित उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक अर्हता कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे.

संबंधित उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे, जाहिरातीनुसार लागणारी कागदपत्रे आणि प्रत्येक कागदपत्राची एक साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. निर्धारित केलेल्या दिनांक व वेळेत अनुपस्थित राहिल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. पात्र उमेदवारांची सविस्तर यादी https://tribal.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील रिक्तपदांची भरती प्रक्रिया वेगाने सुरू आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून व्यावसायिक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. या उमेदवारांच्या शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रे पडताळणीचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार उमेदवारांनी निर्धारित केलेल्या ठिकाणी, दिनांक व वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

समृद्धी महामार्गावर कारला धडक

सिंदी रेल्वे- समृद्धी महामार्गावर अचानक यू-टर्न घेणाऱ्या कारला धडक बसल्याने स्कॉर्पिओ वाहन रस्त्याच्या मधील दुभाजकात घुसून अपघात झाला. या घटनेत महिलेच्या हाताला मुकामार लागला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले. हा प्रकार ३ नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास घडला. हरिशंकर ऊर्फ मुन्ना बलकरण पांडे हे पत्नी ममता आणि चालक अतुल कोटेकर यांच्यासह नागपूरहून पुलगावकडे स्कॉर्पिओने जात होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

घरगुती स्वयंपाकासाठी उत्साही व कल्पक व्यक्ती पाहिजेत

Personal Cook / Home Chef पाहिजे.

अनुभव :

विशेष अट :

वेतन :

संपर्क:

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM KAMRUN BI SHAIKH MAHAMMAD
(कमरुनबी शेख महंमद)
(OLD NAME) TO
KAMRUNNISA ABDUL RAZZAQUE
(कमरुन्निसा अब्दुल रज्जाक)
(NEW NAME)

I WILL BE KNOWN BY MY NEW NAME FOR ALL PURPOSE IN FUTURE

ADRESS - NEAR PULL, CHHAYA NAGAR AMRAVATI DIST AMRAVATI 444601
MO NUM - 9370108873

-जाहीर नोटीस-

एस.एस.भिंगारदेव, ०७ वे न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०७)

कि.कि.अर्ज क्र.१२७७/२०२६

अर्जदार- राजकुमार पंडितराव देशमुख
वय ५८ वर्ष, रा.काशिनाथ मंदिर जवळ, आझाद चौक, नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती

गैरअर्जदार- निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रामपंचायत, नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती

ज्या अर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट क्र.०७ मध्ये जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)-३अ प्रमाणे यातील अर्जदार अर्ज दाखल करतो की, अर्जदार यांचे वडिल नामे **पंडीत सोनासा देशमुख** यांचा मृत्यू हा **दि.१०/०९/२०१०** रोजी झाला आहे. अशी नोंद / धरणेचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आंत आपण आपल्या वकिलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०७ यांनी आपले म्हणणे मांडावे.सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास **मा.कोर्ट क्र.०७** पुढील योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशानुसार
सही/-
(क.लिपिक)
०७ वे न्यायालय, क.स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३३१/२०२६
राजेंद्र + दोन वि.निरंक
पुढील ता.०४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :-
1. **Rajendra Yashwantrao Deshmukh**
   Aged about 74 yrs. Occ.- Retired
2. **Rahul Rajendra Deshmukh**, Aged about 39 yrs.,Occ.-Service
   1 & 2 R/o. Near Dental College
   Mehar Baba Colony, Amravati
3. **Roupika Rajendra Deshmukh**, Aged about 43 yrs. Occ.- Service
   R/o. M-402, Satellite Garden, Phase-2, Filmcity Road,
   Goregao (East) - Mumbai

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **Sandhya Rajendra Deshmukh** हे दिनांक **१७.०३.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Rajendra Yashwantrao Deshmukh + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Rajendra Yashwantrao Deshmukh +2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३३३/२०२६
चित्रा + २ वि.निरंक
पुढील ता.०४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :-
1. **Chita Dilip Rode**, Aged about 68 yrs. Occ.- Household
2. **Pratik Dilip Rode**, Aged about 36 yrs.,Occ.- Service
3. **Dipti Dilip Rode**, Aged about 44 yrs. Occ.- Nil
   Present All 1 to 3 R/o. F-2, First Floor, SSD Park Apartment,
   Near Hariganga Oil Mill, Shankar Nagar, Road, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,मयत **Dilip Narayanrao Rode** हे दिनांक **२३.१२.२०२२** रोजी **नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **Chitra Dilip Rode + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Chitra Dilip Rode + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२८९/२०२६ **ने.ता.०२.१२.२०२६**

१. खुरशीद बी नसीब खान
२. आसीफखा नसीबखा
दोन्ही रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

// वि //

निरंक

ज्याअर्थी **मयत नसीब खान ममरेज खान** यांचा **मृत्यू दि.२१.१२.२०१६** मध्ये **पाटणकर हॉस्पिटल, अमरावती,ता.जि.अमरावती येथे झाला.** मयतांचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२९०/२०२६ **ने.ता.०२.१२.२०२६**

१. गोमाता अशोक भाकरे
२. शशीकांत अशोकराव भाकरे, दोन्ही रा.जळू, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
३. मंजुळा विजय अळसपुरे, रा.घारफळ, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
४. रेखा सुधीर मानके रा.दुघोरा, ता.कारंजा, जि.वाशिम

// वि //

निरंक

ज्याअर्थी **मयत अशोक बापुराव भाकरे** यांचा **मृत्यू दि.१९.०४.२०२५** मध्ये **जळू, , ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ हा मुलगा, २ हा मुलगा असून अर्जदार क्र. ३ व ४ हया मुली आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

प्रो.नं.२७७७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०४.११.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./४३०/२०२६ दिनांक ३०.११.२०२६

जाहीर नोटीस

अर्जदार -
१. शोभा रमेशचंद्र खेतान, वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम
२. विक्रम रमेशचंद्र खेतान, वय ४१ वर्षे, धंदा - व्यापार
३. वरद रमेश खेतान, वय ४२ वर्षे, धंदा - व्यापार
४. कपिल रमेश खेतान, वय ४० वर्षे, धंदा - व्यापार
सर्व रा.गांधी नगर, बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रमेश मदनलालजी खेतान** हे दिनांक **१३.०४.२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.२८७/२०२६ ने.ता.०२.१२.२०२६

अर्जदार : १. बानोबी साहेब खा
२ फिरोज खान साहेब खान
३. जमीर खा साहेब खा
सर्व रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावता

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी **मयत मलीन किंगदेश भोसले** यांचा मृत्यू दि.**१७.०३.२०२६** रोजी नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३४७/२०२६
शैलेंद्र -वि- निरंक
पुढील ता.०८.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. शैलेंद्र पुंडलिकराव चवरे
वय ५३ वर्षे, कामधंदा - मजुरी
रा.रुक्मिणी नगर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **इंदुबाई सखाराम दुर्गळे** हे दिनांक 08.05.2021 रोजी **रेवसा, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शैलेंद्र पुंडलिकराव चवरे** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शैलेंद्र पुंडलिकराव चवरे** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

वि.ए.बी.कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रे. जि.अमरावती यांच्या न्यायालयात (कोर्ट नं.०१)
कि.कि.अर्ज क्रमांक १२५०/२०२६

अर्जदार : सविता अशोक शेंडे
वय ३६ वर्षे, रा.भीम टेकडी जवळ, बेनोडा, अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
महानगरपालिका, अमरावती ता. जि.अमरावती

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट नं.०१ मध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३(३)(अ) प्रमाणे यातील अर्जदार **सविता अशोक शेंडे** यांनी **सविता अशोक शेंडे** यांच्या जन्माची नोंद दिनांक **२६.०९.१९९०** रोजी झाली आहे. अशी नोंद करण्याचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तकार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत आपण आपल्या वकीलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं.०१ यांनी आपले म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तकार न आल्यास मा.कोर्ट नं.०१ योग्य तो हुकूम काढतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशान्वये,
कनिष्ठ लिपिक
सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
अमरावती

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२८८/२०२६ **ने.ता.०२.१२.२०२६**

१. प्रेमराज भिमराव इंगोले, रा.छांगाणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. विनायक भिमराव इंगोले, रा.अडगांव खुर्द, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
३. छाया ओमप्रकाश चौधरी, रा.बन्सी, ता.जि.यवतमाळ
४. दिलीप भिमराव इंगोले (मयत)
४- अ. सुजाता दिलीप इंगोले
४- ब.श्रेया दिलीप इंगोले दोन्ही रा.यावर्डी, ता.जि.वाशिम

// वि //

निरंक

ज्याअर्थी **मयत भिमराव नारायण इंगोले** यांचा **मृत्यू दि.२५.०३.२००६** मध्ये **अडगांव खुर्द, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे पत्नी नामे **सुमित्रा भिमराव इंगोले** यांचा **मृत्यू दि. ०३.११.२०२४** मध्ये अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. मयतांचे **अर्जदार क्र.१ व २ ही मुले असून अर्जदार क्र. ३ ही मुलगी आणि अर्जदार क्र.४ -अ आणि ४- ब ही सून व नातु आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ३१ ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

माझी वसुंधरा अभियान ७.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अंतर्गत
जाहीर सूचना
प्लास्टिक कचरा व्यवस्थापन बाबत सूचना

माझी वसुंधरा अभियान ७.० व स्वच्छ सर्व्हेक्षण २०२६ अंतर्गत शहरातील सर्व नागरिकांना, व्यावसायिकांना याद्वारे कळविण्यात येते की, केंद्र शासनाचे पर्यावरण विभागाने प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रथम व द्वितीय सुधारणा नियम २०१६ दिनांक १२.०८.२०२१ अन्वये सिंगल यूज प्लास्टिक वस्तुंना पूर्णतः बंदी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पॅकेजिंग मटेरियल प्लास्टीक ६० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरी बॅगवर बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन अधिसूचना पर्यावरण विभाग प्लास्टिक व थर्माकोलपासून करण्यात आलेल्या अविघटनशील वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियम करण्याकरीता अधिसूचना दिनांक २३.०६.२०१८ पासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे.

शहरातील सर्व नागरिकांना, व्यावसायिकांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियम अधिसुचनेनुसार कठोर अमलबजावणी शहरात सुरु करण्यात आली असून सिंगल यूज प्लास्टिकचा वापर करणाऱ्या नागरिक व व्यावसायिकांवर प्रथम प्रसंग रु.५०००/- व दुसरा प्रसंग १००००/- व तिसरा प्रसंग २५०००/- रु. दंड आकारण्यात येइल, याची नोंद घ्यावी

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद,
धामणगांव रेल्वे.

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील

किरकोळ (R.M.J.C.) क्र.२५७/२०२६ ने.ता.०७.१२.२०२६

अर्जदार : १. मेंबेशा मलीन भोसले
२ दिपेश मलीन भोसले
दोन्ही रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी **मयत साहेब खा ममरेज खान** यांचा मृत्यू दि.**२१.१२.२०२३** रोजी नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ व ३ ही मुले आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३१ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२३०/२०२६
Kamal Wd/o Vilas PATHARE + 3 -**वि- निरंक**
पुढील ता.१८.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. kAMAL wd/o Vilas Pathare, Age 68 Yrs. Occu.: Housewife
2. Priti Wd/o Shamrao Kale, Age 46 Yrs. Occu.: Housewife
3. Vishal S/o Vilasrao Pathare, Age 41 Yrs. Occu.: Agriculturist
4. Vivek S/o Vilasrao Pathare Age 38 Yrs. Occu.: Agriculturist
   All R/o Kathora Bk., Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vilas @ Ramvilas Narhari Pathare हे दिनांक 30.05.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kamal Wd/o Vilas Pathare+3 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kamal Wd/o Vilas Pathare+3 - Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२३२/२०२६
Manohar S/o Bhimrao Mahalle+6 -**वि- निरंक**
पुढील ता.१९.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Manohar S/o Bhimrao Mahalle, Age 76 Yrs. Occu.: Agriculturist
2. Rekha D/o Bhimrao Mahalle, Age 52 Yrs. Occu.: Housewife
3. Shobha W/o Santoshrao Gadhave, Age 79 Yrs. Occu.: Housewife
4. Manda W/o Tryambakrao Burghate, Age 55 Yrs. Occu.: Housewife
5. Vasundhara W/o Gangadhar Mahalle, Age 87 Yrs. Occu.: Housewife
6. Sachin S/o Gangadhar Mahalle, Age 42 Yrs. Occu.: Agriculturist
7. Roshana D/o Dhiraj Wankhade, Age 40 Yrs. Occu.: Housewife
   All R/o Kathora Bk., Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Panchafulabai Bhimraoji Mahalle हे दिनांक 28.04.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Manohar S/o Bhimrao Mahalle + 6 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Manohar S/o Bhimrao Mahalle + 6 - Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२८०/२०२६
Riyaz Khan S/o Hameed KLhan + 9 - Vs-
Saleha Anjum Wd/o Umar Khan + 2
पुढील ता.२५.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Riyaz Khan S/o Hameed Khan, Aged about 58 Yrs. Occu.: Business
2. Ejaz S/o Hamid Kha, Aged about 52 Yrs. Occu.: Business
3. Ahefaz Khan S/o Hamid Khan, Aged about 51 Yrs. Occu.: Business
4. Muballig Khan S/o Hameed Kham, Aged about 50 Yrs. Occu.: Business
5. Iliyas Khan S/o Hameed Khan, Aged about 48 Yrs. Occu.: Business
6. Shriraz Khan S/o Hamid Khan, Aged about 41 Yrs. Occu.: Business
7. Shahebaz Khan S/o Hamid Khan, Aged about 40 Yrs. Occu.: Business
   Appli.No.1 to 7 R/o Chhaya Nagar & Zakir Colony, Amravati
8. Nafeesa Tarannum W/o Mohammad Salim,
   Aged about 53 Yrs. Occu.: Homemaker
   R/o Bagwa Pura, Borgaon Manju, Dist. Akola
9. Nursat Ara W/o Abdul Jameel, Aged about 47 Yrs. Occu.: Homemaker
   R/o Darga Chowk, Mangrul Pir, Washim
10. Firdox Anjum W/o Mohammad Irswhad,
   Aged about 44 Yrs. Occu.: Homemaker
   R/o Saudagar Pura, Washim

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार :
1. Saleha Anjum Wd/o Umar Khan, Aged about 40 Yrs. Occu.:Homemaker
2. Fuzail Khan S/o Umar Khan, AGe about 10 Yrs. Minor
3. Faiz Khan S/o Umar Khan, Age about 8 Yrs. Occu.: Minor
   R/o C/o Umar Khan (Furniture Wale) Near Aksa Masjid, Chaya Nagar, Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Hamid Khan S/o Majid Khan हे दिनांक 28.10.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. Faimeeda Bano W/o Hameed khan हे दिनांक 06.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Riyaz Khan S/o Hameed Khan + 9 -Vs- Saleha Anjum Wd/o Umar Khan +2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Riyaz Khan S/o Hameed Khan + 9 -Vs- Saleha Anjum Wd/o Umar Khan +2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अमरावती
(प्रधानमंत्री ग्राम सडक योजना)
इच्छुक कंत्राटदारांना सुचना NIT No.03/2026-27

प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत सन २०२६-२७ मधील अमरावती जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातील रस्त्याचे परिवेक्षणाकरीता भाडेतत्वावर वाहन (मारुती सुझूकी कंपनी बनावटीची स्विफ्ट डिझायर) घेणेबाबत इच्छुक व पात्र पुरवठादार यांचेकडून ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. कामाची निविदा दि.०६.११.२०२६ रोजी १२.०० वाजेपासून दि.१६.११.२०२६ सायं.५.०० वाजेपर्यंत .... या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी इच्छुक व पात्र कंत्राटदारांनी विदा स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे.

टिप - यापुढील सर्व आवश्यक सूचना/शुध्दीपत्रक हे ऑनलाईन वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

कार्यकारी अभियंता,
प्रधानमंत्री ग्राम सडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अमरावती

(वि.मा.का.अम./जाही./६०३/२०२६-२०२७)

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२४८/२०२६
Sunil Narhar Pathak (Son)& Others -Vs-Nil
पुढील ता.११.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Sunil Narhar Pathak (Son), Age 58 Yrs. Occu.: Retired
   R/o B-7, Eknathpuram Near Shankar Nagar, Amravati.
2. Sanjay Narhar Pathak (Son), Age 63 Yrs. Occu.: Retired
   R/o Flat No.08, Type-A Building Sara Elite, Gut No.171, Codco Waluj Chhatrapati Sambhaji Nagar (Aurangabad)
3. Nitin Narhar Pathak (Son), Age 64 Yrs. Occu.: Retired
   R/o 301, Sonali Apartment, Suraj Nagar, Near Shankar Nagar, Near Dr.Arora's Hospital, Amravati

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Vijaya Narhar Pathak हे दिनांक 10.03.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Narhar Mahadeorao Pathak हे दिनांक 28.12.2019 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sunil Narhar Pathak (Son & Others) - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sunil Narhar Pathak (Son & Others) - Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२७७/२०२६
सुलोचना अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०२.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Sulochana Sheshraoji Mankar (W/o Sheshrao Manakar),
   Age 71 Yrs. Occu.: Household
   R/o Sutgirni Road, T.T.Nagar, Amravati.
2. Archana Guddu, Age 51 Yrs. Occu.:Household
   R/o Kanuvai, Somayampalaya Combatore, Tamilnadu-641108
3. Yogita Lalit Raut, Age 43 Yrs. Occu.: Household
   R/o Lalit Sukhdeorao Raut, A-903, Aurum Vrundavan, Adarsha Nagar, Behind BU Bhandari Skyline, Dighi, Pune City, Po.Dighi Camp, Dist.Pune

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sheshrao Marotrao Mankar हे दिनांक 01.03.2015 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Sulochana Sheshraoji Mankar+2 - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sulochana Sheshraoji Mankar+2 - Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२८६/२०२६
Dnyaneshwari Avinash Sawale -**वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Dnyaneshwari Avinash Sawale (After Marriage) Dnyaneshwari Bhanudas Patke,
   Age 41 Yrs. Occu.: Household
   R/o Near Piyush Photo Studio Kishor Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Bhanudas Zyabuji Patake हे दिनांक 28.04.2013 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Vimla Bhanudas Patke हे दिनांक 02.06.2019 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Dnyaneshwari Avinash Sawale - Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Dnyaneshwari Avinash Sawale - Vs- Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



कै.अण्णासाहेब वैद्य स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

परतवाडा- भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कै. अण्णासाहेब वैद्य स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या परिसरात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनिल एस. खांडेकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.दयाश्री कोकाट उपस्थित होत्या.तसेच डॉ.भागवत, प्रा.खांडेकर, डॉ.सगणे, शर्मा, मेटकर,गावंडे, जाधव, दंडाळे, डांगे, महल्ले, घोगे,दुर्गे, धानोरकर, चेतन, आकाश इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

संविधान सन्मान स्पर्धा परीक्षा २९ नोव्हेंबरला

तिवसा- भारतीय संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये, सामाजिक समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता या घटनात्मक तत्त्वांचा समाजातील सर्व स्तरांपर्यंत प्रसार व्हावा, तसेच नागरिकांमध्ये संविधानविषयक जागरूकता निर्माण व्हावी, या व्यापक सामाजिक व शैक्षणिक उद्देशाने प्रस्तावित लोकजागर फाउंडेशन बहुउद्देशीय संस्था आणि संविधान सन्मान समन्वय कृती समिती, अमरावती (तिवसा) यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान सन्मान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा रविवार २९ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.या स्पर्धेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे स्पर्धा दोन स्वतंत्र वयोगटांत आयोजित करण्यात येणार आहे. पहिल्या वयोगटात १० ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना, तर दुसऱ्या वयोगटात १७ वर्षे व त्यावरील व्यक्तींना सहभागी होता येणार आहे.दोन्ही वयोगटांसाठी आकर्षक रोख पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. पहिल्या वयोगटासाठी प्रथम पारितोषिक ५,००० रुपये, द्वितीय पारितोषिक ३,००० रुपये आणि तृतीय पारितोषिक १,५०० रुपये असेल. दुसऱ्या वयोगटासाठी प्रथम पारितोषिक १०,००० रुपये, द्वितीय पारितोषिक ५,००० रुपये आणि तृतीय पारितोषिक २,५०० रुपये असेल. अशा प्रकारे दोन्ही वयोगटांतील विजेत्यांना एकूण २७,००० रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात येईल.

माहेरवासी संघाचे ५९ वे स्नेहसंमेलन १० नोव्हेंबरला

तिवसा- ज्ञानार्जन तथा धनार्जन, संशोधन अथवा संरक्षण या कार्यासाठी ज्यांना जन्मभूमी सोडून कर्तव्यावर जावे लागते अशांना एकत्रित करून जगावेगळे जग जगा हा संदेश देणाऱ्या स्व.ना.सी.पाटील यांनी स्थापन केलेल्या मोझरी येथील माहेरवासी संघाचे ५९ वे स्नेहसंमेलनाचे बलिप्रतिपदेला दि.१० नोव्हेंबर रोजी हनुमान देवस्थान येथे आयोजित केले आहे. या कार्यक्रमात प्रा.शिवाजीराव कुचे (राष्ट्रीय प्रेरक वक्ता) यांचे व्यक्तीमत्व विकासावर व्याख्यान आयोजित केले आहे. प्रा. कुचे यामध्ये विचार, भावना आणि वर्तनामध्ये सकारात्मक बदल घडविण्याचे तंत्र समजाऊन सांगतील. तसेच डॉ. ऋचा राजेंद्र हरणे हीने एम.बी.एस.ची पदवी प्राप्त केल्याबद्दल, शाहु संजय देशमुख याची हवाईदलात पायलट म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल तसेच सारीका सुरेशसिंग ठाकुर यांनी इंग्रजी विषयात पि.एच.डी. प्राप्त केल्याबद्दल त्यांचा या माहेरवासी संघात सत्कार आयोजित केला आहे. माहेरवासी संघाच्या सभासदांनी या स्नेहसंमेलनाकरिता उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष माधुरी निमकर, उपाध्यक्ष डॉ. दीपाली ठोसर, सचिव स्नेहल पाचघरे सहसचिव किरण कडू व व्यवस्थापक गणेश उमप यांनी केले आहे.



शालेय पोषण आहाराची नियमित तपासणी

अंजनगाव बारी- विद्यार्थ्यांना सकस, पौष्टिक व दर्जेदार आहार मिळावा, यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, अंजनगाव बारी येथे शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष दिले जात आहे. अंजनगाव बारी केंद्राचे केंद्रप्रमुख प्रवीण धाडसे तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा स्नेहा पोकळे यांच्याकडून आहाराची नियमित तपासणी व पाहणी केली जाते. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा स्नेहा पोकळे या स्वतः शाळेला भेट देऊन आहार शिजविण्याची पद्धत, धान्याची गुणवत्ता, भाजीपाला तसेच स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची पाहणी करतात. तिखट, मीठ, हळद व तेल यांसारख्या वस्तूंच्या पाकिटांवरील मुदत संपण्याची तारीख (एक्सपायरी डेट) तपासली जाते. विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आहार मिळावा, यासाठी त्या जातीने लक्ष देत आहेत.मुख्याध्यापिका विजया झाडे तसेच शाळेतील सर्व शिक्षकही विद्यार्थ्यांच्या आहाराबाबत जागरूक असून, शाळेत येणाऱ्या पालकांनाही पोषण आहाराची चव चाखण्यासाठी दिली जाते. त्यामुळे पालकांकडूनही समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, गावातील साहेबराव राऊत व प्रतिनिधी पवन इंगोले यांनी शाळेला आकस्मिक भेट देऊन पोषण आहाराची चव घेतली. यावेळी आहार चविष्ट, रुचकर व समाधानकारक असल्याचे त्यांनी कौतुक केले. मुख्याध्यापिका, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक व पालक यांच्या सामूहिक सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार पोषण आहार मिळत असून, हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरत आहे.



नारायणराव बोके यांचे निधन

कुऱ्हा - तिवसा तालुक्यातील वरखेड (बोके) ह.मु.न्यु गणेश नगर अमरावती अशोक शिक्षण संस्थान अशोक नगर चे संचालक तथा प्राध्यापक हर्षल नारायणराव बोके यांचे वडील नारायणराव आनंदराव बोके यांच्या वयाच्या ७७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले एक मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

कमी पावसामुळे वाढणार शेतीतील थकीत कर्ज

केअरएज रेटिंग्जचा अंदाज; मार्च २०२८ पर्यंत प्रमाण ५.६ टक्क्यांवर

मुंबई- यंदा मॉन्सूनचा पाऊस कमी झाला. त्याचा फटका बँकांच्या शेतीकर्ज वसुलीला बसण्याची शक्यता आहे. खरिपासाठी घेतलेली काही पीककर्जे वेळेत फेडली जाणार नाहीत. त्यामुळे पुढील दीड वर्षात शेतीतील थकीत कर्जे (एनपीए) वाढतील, असा अंदाज केअरएज रेटिंग्जने वर्तवला आहे.

केअर रेटिंग्ज लिमिटेड (केअरएज रेटिंग्ज) ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची पतमानांकन संस्था आहे. संस्थेने २१ ऑक्टोबर रोजी हा अहवाल प्रसिद्ध केला. व्यापारी बँकांच्या शेतीकर्जाचा आढावा त्यात घेतला आहे.

जून २०२६ अखेर बँकांची १.४१ लाख कोटी रुपयांची शेतीकर्जे थकीत होती. एकूण शेतीकर्जाच्या तुलनेत हे प्रमाण ५.११ टक्के आहे. उद्योग, सेवा आणि किरकोळ कर्जांपेक्षा हे प्रमाण खूप जास्त आहे. यंदा जून ते सप्टेंबरमध्ये सरासरीच्या ८७ टक्केच पाऊस पडला. २०१५ नंतरचा हा सर्वांत कमी पाऊस आहे. ज्या राज्यांत बँकांनी सर्वाधिक शेतीकर्ज दिले आहे, तिथेच पाऊस जास्त कमी पडला. तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र आणि केरळमध्ये २० ते ३० टक्के कमी पाऊस झाला. देशातील एकूण शेतीकजपैकी सुमारे ४८ टक्के कर्ज या पाच राज्यांत आहे. महाराष्ट्राने ३५८ पैकी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाने ही दुष्काळ जाहीर केला आहे. मार्च २०२७ पर्यंत थकीत कर्जाचे प्रमाण ४.६ ते ४.८ टक्क्यांपर्यंत खाली येईल. शेतीकर्ज वेगाने वाढत असल्याने आणि बँका जुनी थकीत कर्जे निर्लेखित (राइट ऑफ) करत असल्याने ही घट दिसेल. त्यानंतर मात्र मार्च २०२८ पर्यंत हे प्रमाण ५.३ ते ५.६ टक्क्यांवर जाईल. थकीत कर्जे १.९ ते २ लाख कोटी रुपयांवर पोहोचतील.

पीककर्ज दोन हंगाम थकले तरच ते एनपीए ठरते. त्यामुळे कमी पावसाचा परिणाम बँकांच्या हिशेबात उशिरा दिसेल. तो मुख्यतः २०२७ च्या उत्तरार्धात दिसेल. कमी पावसामुळेच हे प्रमाण ०.७ ते ०.८ टक्का वाढेल. कर्जमाफीमुळेही थकबाकी वाढते. सरकार बँकेला पैसे देईपर्यंत कर्ज शेतकऱ्याच्या नावावर थकीतच राहते. माफीच्या अपेक्षेने काही कर्जदार परतफेड थांबवतात. महाराष्ट्राने जून २०२६ मध्ये ३६,५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली आहे. उत्तर प्रदेश, पंजाबमध्ये २०२७ च्या सुरुवातीला निवडणुका आहेत. तिथे नवी कर्जमाफी येण्याची शक्यता गृहीत धरली आहे.

'दुष्काळी भागातील कर्जाचे पुनर्गठन केल्यास फटका थोडा कमी होऊ शकतो. मात्र राज्यांच्या नव्या कर्जमाफीची जोखीम मोठी आहे. आतापर्यंत कर्जमाफीमुळेच शेतीतील थकीत कर्जे सर्वाधिक वाढली आहेत,' असे केअरएज रेटिंग्जचे वरिष्ठ संचालक विनीत जैन यांनी सांगितले.

रब्बी पीक खराब आले, कर्जमाफी मोठी झाली, तर हे प्रमाण ६.१ ते ६.४ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. रब्बी चांगले आले तर ते ४.७ ते ४.९ टक्क्यांवर राहील. सर्वाधिक भार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर पडेल, असे संस्थेचे संचालक सौरभ भालेराव यांनी सांगितले.

बँकांची थकीत शेतीकर्जे

कालावधी	थकीत कर्जाचे प्रमाण	थकीत रक्कम
जून २०२६ (प्रत्यक्ष)	५.११ टक्के	१.४१ लाख कोटी रुपये
मार्च २०२७ (अंदाज)	४.६ ते ४.८ टक्के	१.४७ ते १.५३ लाख कोटी रुपये
मार्च २०२८ (अंदाज)	५.३ ते ५.६ टक्के	१.९ ते २ लाख कोटी रुपये

क्यूएस दक्षिण आशिया विद्यापीठ क्रमवारीत अमरावती विद्यापीठाला स्थान

कुलगुरू बारहाते यांच्या मार्गदर्शनात आयक्युएसीचे संचालक डॉ.संदिप वाघुळे यांच्या प्रयत्नांना यश

अमरावती/का.प्र.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय शैक्षणिक क्षेत्रात आपल्या प्रगतीचा आलेख उंचावत क्यूएस दक्षिण आशिया विद्यापीठ क्रमवारी २०२७ मध्ये ३२४ वे स्थान प्राप्त केले आहे. मागील वर्षी २०२६ मध्ये विद्यापीठाने ३३० वे स्थान मिळविले होते.यंदा सहा स्थानांची सुधारणा नोंदवित विद्यापीठाने विदर्भाच्या शैक्षणिक शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. यापूर्वी क्यूएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ मध्ये विद्यापीठाने आशियातील १००१ ते ११०० या गटात स्थान मिळविले होते. या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे विद्यापीठाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक ओळख अधिक दृढ होत आहे.

क्यूएस ही जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित उच्च शिक्षण क्रमवारी संस्था असून विद्यापीठांचे मूल्यमापन शैक्षणिक प्रतिष्ठा, रोजगारदात्यांमधील प्रतिष्ठा, संशोधनाचा प्रभाव, आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्य, प्राध्यापक-विद्यार्थी गुणोत्तर आणि प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रता अशा विविध निकषांच्या आधारे केले जाते. या निकषांमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने काही महत्त्वपूर्ण बाबींमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



विद्यापीठाला प्राध्यापकांच्या पीएच.डी. पात्रतेच्या निकषात ९२.२ गुण, प्रति प्राध्यापक संशोधन प्रकाशनांच्या निकषात ७३.२ गुण, आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्कमध्ये २६.१ गुण, तर प्रति संशोधन लेख उद्धरणांच्या निकषात २५.९ गुण प्राप्त झाले आहेत. विशेषतः प्राध्यापकांची उच्च शैक्षणिक पात्रता आणि संशोधन प्रकाशनांची उत्पादकता ही विद्यापीठाची जमेची बाजू ठरली आहे.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, संस्थात्मक विकास आणि आंतरराष्ट्रीय मानांकनासाठी विविध महत्त्वपूर्ण उपक्रम राबविलेत. या संपूर्ण प्रक्रियेत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी नियोजन, समन्वय, गुणवत्ता वृध्दीच्या उपक्रमांची अंमलबजावणी आणि संस्थात्मक कामगिरीच्या नियमित मूल्यमापनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. विशेषतः गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता आणि संस्थात्मक कामगिरीमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या या यशामागे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे दूरदर्शी नेतृत्व, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांचे नियोजनबध्द व समन्वयात्मक योगदान, प्राध्यापक व संशोधकांचे संशोधनातील योगदान, अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता व जिद्द यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, संशोधक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि संलग्नित महाविद्यालयांचे अभिनंदन केले. विद्यापीठाला जागतिक स्तरावर अधिक प्रतिष्ठित स्थान मिळवून देण्यासाठी संशोधनाची गुणवत्ता, आंतरराष्ट्रीय सहकार्य, उद्योगांशी समन्वय आणि शैक्षणिक उत्कृष्टता या क्षेत्रांत अधिक जोमाने प्रयत्न करण्याचा संकल्प कुलगुरूंनी व्यक्त केला.

स्व. रामनाथजी रामगोपाल लाहोटी यांच्या जयंती निमित्ताने निबंध



मोर्शी - श्री. शिवाजी शिक्षण संस्थे अंतर्गत, श्री. आर. आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी येथे दानदाते रामनाथजी राम गोपाल लाहोटी यांच्या जयंतीनिमित्ताने 'निबंध स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन .चौधरी यांचे विशेष मार्गदर्शन या निमित्ताने लाभले. कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.अतुल वानखडे तसेच विज्ञान विभाग प्रमुख,प्रा. विनोद सावरकर व कला, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राहुल बेहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर स्पर्धेचे आयोजन डॉ. दिपाली चिखले यांनी केले. ज्ञानकार्यासाठी जमीन दान देणाऱ्या दानदाते रामनाथजी रामगोपाल लाहोटी यांच्या जयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या महत्ते बरोबरच दान महत्तेची ही जाण व्हावी. तसेच दानदाते रामनाथजी रामगोपाल लाहोटी यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी या हेतूने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्ञानाची धरुनी कास करू व्यक्तिमत्त्वाचा विकास, शिक्षणातून समृद्धतेकडे या विषयावर या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.या निबंध स्पर्धेला कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्ह्यातील १०२८ गावांना पाणीटंचाईची झळ

३२ कोटींच्या ११८८ उपाययोजना; भूजल पुनर्भरणासाठी १२ कोटींची कामे

अमरावती/का.प्र.

अपुऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील जलस्त्रोतांवर परिणाम झाला असून, एक हजार २८ गावांमध्ये संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता ३२.९७ कोटी रुपयांच्या १,१८८ उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत. तसेच भूजलपातळी वाढविण्यासाठी १२.८४ कोटी रुपयांची पुनर्भरणाची कामे करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी पत्रकार परिषदेत संभाव्य पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा मांडला. यंदा 'एल निनों'च्या प्रभावामुळे जिल्ह्यात सरासरी पर्जन्यमानात ४४ टक्के तूट नोंदविण्यात आली आहे. अपेक्षित पर्जन्यमानाच्या तुलनेत प्रत्यक्षात ४८२ मिलिमीटर पाऊस झाला. त्यामुळे जलस्त्रोत पूर्ण क्षमतेने भरू शकले नाहीत. सध्या सिंचन प्रकल्पांमध्ये ५५ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्यापैकी १० टक्के साठा पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. पाणीपुरवठ्यात कपात करण्याबाबत संबंधित यंत्रणांना नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पाणीटंचाई निवारणासाठी टँकरद्वारे



पाणीपुरवठा, खासगी विहिरींचे अधिग्रहण, नळयोजनांची दुरुस्ती, विंधन विहिरींची दुरुस्ती, नवीन विंधन विहिरींची निर्मिती आणि तात्पुरत्या नळयोजना कार्यान्वित करण्यावर भर दिला जाणार आहे. घटलेली भूजलपातळी लक्षात घेता पुनर्भरणासाठी रिचार्ज शाफ्टची कामेही हाती घेण्यात येणार आहेत.

चाऱ्याचीही तूट

जिल्ह्यात आठ लाख ४७ हजार १३९ पशुधन असून, त्यासाठी दरमहा ८८ हजार ४४१ मेट्रिक टन चाऱ्याची गरज आहे. ऑक्टोबर ते जून २०२७ या कालावधीत सात लाख ९५ हजार ९६९ टन चारा आवश्यक आहे. सध्या १०० दिवस पुरेल एवढाच चारा उपलब्ध असून, एक लाख ७३ हजार ९७९ टनाची तूट अपेक्षित आहे. ही तूट भरून काढण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

खरीप हंगामातील तूर व कापूस तसेच रब्बी पिकांच्या सिंचनासाठी उपलब्ध जलस्त्रोतांतून पाणी देण्याच्या दृष्टीने १२ तास वीजपुरवठा करण्याचे आदेश महावितरणला देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील दहा तालुक्यांत १२ तास वीजपुरवठा होत असून, चार तालुक्यांतील पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नादुरुस्त फीडर ४८ तासांत दुरुस्त करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. पत्रकार परिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी काकडे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीकांत उमप, कृषी विभागाचे उपसंचालक वरुण देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नगराध्यक्ष प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्या पुढाकारातून वसतिगृहाचा मार्ग प्रकाशमय

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मार्गी; दिलेल्या आश्वासनाची केली पूर्तता

चांदूर रेल्व/वार्ताहर

शहरातील दसरा मैदानापासून शासकीय मुला-मुलींच्या वसतिगृहापर्यंत जाणारा मार्ग आता स्ट्रीट लाईटच्या प्रकाशाने उजळून निघाला आहे. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला हा प्रश्न नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांच्या पुढाकारातून मार्गी लागला आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना मिळालेली ही एक अनोखी भेट ठरली आहे.

शासकीय मुला-मुलींच्या वसतिगृहाच्या स्थापनेपासूनच या मार्गावर प्रकाशव्यवस्था करण्याची मागणी सातत्याने विविध लोकप्रतिनिधी व संबंधित



अधिकाऱ्यांकडे करण्यात येत होती. मात्र, अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित होता. वसतिगृहात ग्रामीण भागातील गोरगरीब, आदिवासी तसेच अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनी वास्तव्यास आहेत. रात्रीच्या वेळी वसतिगृहात ये-जा करताना त्यांना अंधाराचा सामना करावा लागत होता. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या प्रसंगी नगरसेवक अरिहंत गेडाम, नगरसेविका निलोफर शेख, जय हिंद क्रीडा मंडळाचे सदस्य राजिक शेख, पंकज वानखडे, रवि दीक्षित, कंत्राटदार प्रतीक इंगळे, नगरपरिषदेच्या अभियंता कीर्ती जावडेकर यांच्यासह प्रभाग क्रमांक ९ मधील नागरिक उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल नागरिकांनी नगराध्यक्षांच्या या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत व अभिनंदन केले. तसेच वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनीही नगराध्यक्षांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

अरुणोदय इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी विभागीय क्रीडा स्पर्धेत चमकले



अमरावती - वि.म.वि. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विभागीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.विद्यार्थी अमन राझीक शेखची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत निवड झाली. तसेच श्रेयस शैलेश बिसने याने विभागीय स्केटिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यस्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेसाठी निवड,या दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांचे अरुणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी संस्थेच्या सचिव डॉ. भारती वसंत लुंगे पाटील, अरुणोदय ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका नीता काळमेघ, कार्यालयीन अधीक्षिका रेखा राऊत,प्री-प्रायमरी विभागाच्या प्रमुख ज्योत्स्ना इंगोले तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि शाळेतील शिक्षकवृंदांना दिले. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मुथूट फिनकॉर्प घोटाळ्यात चार आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल

ऑडिट रिपोर्ट अभावी गैरव्यवहाराचा नेमका आकडा अस्पष्ट

अमरावती/प्रतिनिधीः-
अमरावती शहरातील विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्प शाखेत उघडकीस आलेल्या सोन्यासह रोख रकमेच्या हेराफेरी प्रकरणात पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊन तीन महिने उलटले तरी कंपनीचा अंतिम ऑडिट रिपोर्ट पोलिसांना प्राप्त न झाल्यामुळे ग्राहकांचे नेमके किती सोने गायब झाले आणि घोटाळ्याची एकूण आर्थिक उलाढाल किती आहे, याचा अधिकृत व प्रमाणित आकडा अद्याप अस्पष्टच आहे.

आरोपपत्र दाखल होणे हे तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात असले, तरी यामुळे घोटाळ्याचा संपूर्ण हिशोब समोर आलेला नाही. पोलिसांकडे आता पर्यंत ग्राहकांच्या तक्रारींच्या आधारावर (पान २ वर)



त्या मालमत्तांचीही चौकशी-

तपासादरम्यान आरोपी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर खरेदी केलेल्या काही मालमत्तांबद्दल माहिती समोर आली होती. पोलिसांनी संबंधित मालमत्तांची कागदपत्रे जप्त करून त्यांची चौकशी केली. या मालमत्ता कथित घोटाळ्याच्या रकमेतून खरेदी केल्या गेल्या आहेत का, की त्यामागे इतर आर्थिक स्रोत आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याबद्दलचा निष्कर्ष तपास पूर्ण झाल्यानंतरच समोर येईल.

ऑडिट रिपोर्टअभावी आकडा अस्पष्ट

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा कंपनीच्या अंतिम ऑडिट रिपोर्टचा आहे. पोलीस तपासादरम्यान कंपनीच्या गहाण ठेवलेल्या सोन्याची, ग्राहकांच्या तक्रारींची आणि इतर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारावर आर्थिक अनियमिततांचे आकलन करण्यात आले, परंतु शाखेतील एकूण किती सोने गहाण होते, किती सोने गायब झाले आणि कंपनीला प्रत्यक्षात किती आर्थिक नुकसान झाले, हे स्पष्ट होण्यासाठी अंतिम ऑडिट रिपोर्ट आवश्यक आहे.ही विस्तृत ऑडिट रिपोर्ट आतापर्यंत पोलिसांना मिळालेली नाही.

जिल्ह्यात अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांसाठी ४४ कोटी निधी मंजूर

जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आदेश जारी

अमरावती/प्रतिनिधीः-
माहे जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांसाठी मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्णयानुसार, ४४ कोटी २१ लाख ३३ हजार रुपये निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबतचे अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबत मंगळवार,३ नोव्हेंबर रोजी अधिकृत आदेश जारी करण्यात आले. अतिवृष्टीमुळे व पुरामुळे जिल्ह्यातील अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, अंजनगाव सुर्जी, धामणगाव रेल्वे, धारणी, चिखलदरा, मोर्शी आणि तिवसा (पान २ वर)

-३७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना होणार लाभ



या तालुक्यांमधील एकूण ४०,९५७.१२ हेक्टर आर क्षेत्रावरील शेतीपिकांचे नुकसान झाले असून एकूण ३७ हजार १५ शेतकरी बाधित झाले.

शासनाद्वारे मंजूर मदत निधीतून अंजनगाव सुर्जी आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यांमधील बाधित शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ३२ बाधित शेतकऱ्यांच्या ७.४५ हेक्टर क्षेत्रावरील (पान २ वर)

अमरावतीत मुख्य बाजारपेठेत वाहतूक कोंडी

इतवारा ते रविनगर मार्गावर वाहनांच्या रांगा

अमरावती/प्रतिनिधीः-
दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील मुख्य बाजारपेठेत नागरिकांची खरेदीसाठी मोठी गर्दी उसळली आहे. इतवारा बाजार, जवाहर गेट, गांधी चौक, राजकमल चौक, अंबा गेट ते रविनगर या सर्वच प्रमुख रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने शहरात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. सणाच्या तोंडावर तासंतास वाहतुकीत अडकून पडावे लागत असल्याने नागरिक व वाहनधारक त्रस्त झाले आहेत. प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करून वाहतूक सुरळीत करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. बाजारपेठेतील मुख्य (पान २ वर)



वरुडा एक्सप्रेस हायवेवर भीषण अपघात

एकाचा मृत्यू, दुसरा गंभीर -भरधाव दुचाकीने म्हशीला उडवले

अमरावती/प्रतिनिधीः-
बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत वरुडा सुपर एक्सप्रेस महामार्गावर बुधवारी रात्री झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला, तर मोटार सायकल चालक गंभीररित्या जखमी झाला.भरधाव दुचाकीने म्हशीला उडवल्याने हा अपघातात झाला. या अपघातात म्हैसही जागीच ठार झाली. अपघातानंतर घटना स्थळावरून जाणाऱ्या लोकांनी संवेदनशीलता दाखवत जखमींची मदत केली आणि त्यांना रुग्णालयात दाखल केले. माहिती मिळताच बडनेरा पोलीस स्टेशनचे पीएसआय सावरकर घटनास्थळी पोहोचले आणि पंचनामा केला. योगेश भारत बालूने (वय ३२, रा. लोणी टाकळी, ता. नांदगाव खंडेश्वर) असे अपघातात मृत तरुणाचे नाव आहे तर गौरव देवराव विरुळकर(लोणी टाकली) जखमी आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहे.



माहिती नुसार बुधवार ४ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ८.२० वाजता नवी वस्ती बडनेरा येथील रहिवासी (पान २ वर)

तिर्थक्षेत्र विकास आरखडयातील २० कोटींहून अधिक दूरुस्ती कामांना मंजुरी

मोझरी,कौंडण्यपूर आणि वलगाव विकास आराखडयांचा समावेश

अमरावती/प्रतिनिधीः-
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी,श्री.क्षेत्र कौंडण्यपूर आणि श्री.संत गाडगेबाबा वलगाव तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत २० कोटी १९ लाख ८५ हजार रुपयांच्या अत्यावश्यक दुरुस्ती कामांच्या प्रस्तावास राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मंजुरी दिली आहे.

मोझरी,कौंडण्यपूर आणि वलगाव येथील तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत उभारण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चाधिकार समितीची बैठक पार पडली. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, नियोजन विभागाच्या सह सचिव गीतांजली बाविस्कर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सचिन चिवटे बैठकीत उपस्थित होते.

या बैठकीत तीनही तिर्थक्षेत्र विकास आराखडयातील काम पूर्ण झालेल्या इमारतींच्या दुरुस्ती कामांचे व हस्तांतरणाबाबत अमरावती विभागीय आयुक्तांना सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार सादर प्रस्तावानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी तिर्थक्षेत्र विकास आरखडयांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी (पान २ वर)

सावंगा विठोबात माकडांचा हैदोस

-भाविकांसह ग्रामस्थ त्रस्त

-संस्थानलाच उपाययोजनांच्या सूचना देत वनपालांचे पत्र

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-
तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र सावंगा विठोबा येथे मागील काही दिवसांपासून माकडांचा हैदोस वाढला असून ग्रामस्थांसह मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. माकडांच्या वाढत्या उपद्रवामुळे महिला, लहान मुले, शेतकरी आणि वृद्ध नागरिक त्रस्त झाले असताना या समस्येवर ठोस उपाययोजना करण्याऐवजी वन विभागाने संस्थानलाच उपाययोजनांच्या सूचना देणारे पत्र पाठविल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

सावंगा विठोबा येथील माकडांच्या वाढत्या उपद्रवाबाबत ग्रामस्थांनी वन विभागाकडे लेखी तक्रार करून तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. त्यानंतर वन विभागाच्या वतीने वनरक्षक मालखेड, पोलीस पाटील सावंगा विठोबा तसेच तक्रारदार यांच्या उपस्थितीत गावाची पाहणी करण्यात आली. या पाहणीत गावामध्ये अंदाजे ५० ते ६० माकडांचा वावर असून त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे वन विभागाने स्वतःच्या पत्रात नमूद केले आहे.

मात्र, या पाहणीअंती वन विभागाने माकडांचा उपद्रव रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याऐवजी श्री विठोबा संस्थानला पत्र (पान २ वर)

विनयभंग प्रकरणात सिंधुताई सपकाळ यांच्या मानसपुत्राचा जामीन फेटाळला

अमरावती/प्रतिनिधीः- वसतीगृहातील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्या प्रकरणी येथील स्थानिक न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. अरुण सिंधुताई हरबाजी सपकाळ असे जामीन अर्ज फेटाळलेल्या आरोपीचे नाव आहे. चिखलदारा येथील वसतीगृहातील अल्पवयीन मुलगी १७ ऑक्टोबर रोजी स्वयंपाक करीत होती. दरम्यान वसतीगृहा चा सचिव सिंधुताई सपकाळ यांचा मानसपुत्र अरुण सपकाळ स्वयंपाक घरात आला आणि मुलीसोबत त्याने अश्लिल चाळे केल्याचा आरोप आहे. घाबरलेल्या मुलीने घडलेला सर्व प्रकार आई-वडिलांना सांगितला. दुसऱ्याच दिवशी तिचे आई-वडील वसतीगृहात पोहचले आणि संपूर्ण प्रकार ऐकल्यानंतर १९ ऑक्टोबर रोजी त्यांनी चिखलदरा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी अरुण सपकाळ विरुध्द विनयभंग, पोक्सो आणि अक्ट्रॉसीटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. तेव्हापासून सपकाळ चिखलदऱ्यातून पसार आहे. दरम्यान त्याच्या वकीलाने जामीनाकरीता येथील न्यायालयात अर्ज दाखल केला होता. बुधवारी संबंधित अर्ज न्यायालयाने युक्तिवाद ऐकून फेटाळून लावला. चिखलदरा पोलीस अरुण सपकाळच्या शोधात आहेत.

पूर्णा नदीकाठी इसमाचा संशयास्पद मृत्यू

बेलोरा/प्रतिनिधीः-
चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पिंपरी पूर्णा येथे पूर्णा नदीच्या काठावर एका ४० वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आला. विजय दादाराव विसे (वय ४०, रा. पिपरी पूर्णा) असे मृत इसमाचे नाव असून, आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास त्यांचा मृतदेह नदीकाठी दिसून आला. प्राप्त माहितीनुसार, विजय विसे यांचा मृतदेह पूर्णा नदीच्या काठावर आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. मात्र, त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.



शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण समोर येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

या प्रकरणाची नोंद घेत चांदूरबाजार पोलीस स्टेशनचे ठाणेदार आधारसिंह सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल रोशन चव्हाण व आकाश व्यवहारे पुढील तपास करीत आहेत.

दिवाळीच्या पणत्यांसोबत वंचितांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

विसावा वृद्धाश्रमाला किराणा साहित्य; निराधार व दिव्यांगांना नवीन कपडे अन् फराळाचे वाटप

VIDA चा माणुसकीचा दीपोत्सव! -'शेअर अँड स्माईल' उपक्रमाचा १२ वर्षांचा अखंडित प्रवास

परतवाडा/प्रतिनिधीः-
दिवाळीचा आनंद केवळ स्वतःच्या घरापुरता मर्यादित न ठेवता, समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या आयुष्यातही आनंदाचा प्रकाश निर्माण व्हावा, या उदात्त हेतूने अमरावती येथील 'व्हिजन इन्टेग्रिटी डेव्हलपमेंट असोसिएशन' (VIDA) च्या वतीने यंदाही 'शेअर अँड स्माईल' हा सामाजिक उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. सलग १२ व्या वर्षी राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून निराधार वृद्ध, निराश्रित, महिला आणि दिव्यांग (पान २ वर)



'दिव्याने दिवा पेटतो आणि आपला आनंद इतरांसोबत वाटल्याने तो द्विगुणित होतो, याच विचारातून २०१५ मध्ये सुरू झालेला 'शेअर अँड स्माईल' उपक्रम आज सलग १२ व्या वर्षीही अखंडितपणे सुरू आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून दानशूर व्यक्तींनी दाखविलेला विश्वास, आर्थिक व वस्तूरूपाने केलेले सहकार्य आणि स्वयंसेवकांची सेवाभावी वृत्ती यामुळेच हा माणुसकीचा प्रवास यशस्वी होत आहे. गरजूंच्या चेहऱ्यावरील हास्य हेच आमच्या कार्याचे खरे समाधान असल्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रितेशकुमार वाघमारे यांनी सांगितले.

अवैध दारू वाहतूक आणि गुटखा साठवणुकीवर एलसीबीची कारवाई

१.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त, एक आरोपी फरार

अमरावती/प्रतिनिधीः-
अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला आहे. ऑपरेशन कवचअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमासह प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा घरात बाळगणाऱ्या दोघांवर कारवाई केली. या तीन कारवायांमध्ये एकूण १ लाख २५ हजार १८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या (पान २ वर)



परतवाडा, मोर्शी आणि गौरखेडा परिसरात धाड

पत्नी माहेरी गेल्यानंतर पतीची आत्महत्या

-सर्फाबाद येथील घटना

चांदूरबाजार/प्रतिनिधीः-
पत्नी माहेरी गेल्यानंतर ३५ वर्षीय पतीने आपले जीवन संपवले. आशिष भास्करराव वानखडे, रा. सर्फाबाद असे मृत तरुणाचे नाव आहे. ही घटना बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

माहितीनुसार, आशिष यांची पत्नी माहेरी गेली होती. त्यामुळे ते घरी एकटेच होते. बुधवारी त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. त्यानंतर ते घरातच पडून होते. ही बाब शेजाऱ्यांच्या लक्षात आली. त्यानंतर त्यांचे काका रावसाहेब वानखडे यांनी तातडीने ऑटोमधून त्यांना ग्रामीण रुग्णालय, चांदूर बाजार येथे दाखल केले. (पान २ वर)



सोन्याची चेन गहाण ठेवण्याच्या नावावर लंपास

शहरात महिलांना लक्ष्य करणारी टोळी सक्रिय

अमरावती/प्रतिनिधीः-
गोपाल नगर डी-मार्टजवळ महिलेची बुधवारी दिवसा अज्ञात भामटयाने ५२ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन गहाण ठेवण्याच्या बहाण्याने पळवून नेली. राजापेठ पोलिसांनी बीएनएस कलम ३१८ (४) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, आरोपीचा शोध सुरू केला आहे. अशा प्रकारच्या बदमाशांची टोळी शहरात सक्रिय असल्याची चर्चा आहे. शहरातील एका वृद्ध महिलेच्या तक्रारीनुसार, ती एकटीच पायी जात होती. सुपर टाइल्स गोपाल नगरजवळ एक अज्ञात व्यक्ती तिच्याजवळ आला. सुमारे ४० वर्षांचा हा व्यक्ती लाल रंगाच्या टू-व्हीलरवर आला होता. महिलेच्या नातेवाईकांना ओळखत असल्याचे सांगून त्याने तिला आपल्या टू-व्हीलरवर बसवले. (पान २ वर)

-गोपाल नगर डी-मार्टजवळ घटना

काही इतर महिलांसोबतही अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत.६८ वर्षीय महिलेने